पुणे, बुधवार, ११ डिसेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 15 • वर्ष ४ थे, अंक १५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com | Beyond The News



मंत्रीपद मिळाले तर आनंदच आहे
दिलीप वळसे पाटील यांची प्रतिक्रिया P९



ओला, उबेरने बसवला 'सर्वोच्च' आदेश धाब्यावर P३



पुणेरी पलटणचा बाद फेरीचा मार्ग खडतर १२



जगदीप धनखड यांच्याविरोधात अविश्वास ठराव P८

## » At a Glance

### हिवाळी अधिवेशन पुढच्या सोमवारपासून

**मुंबई :** राज्यात तीन दिवसीय विशेष अधिवेशन पार पडल्यानंतर आता हिवाळी अधिवेशनास लवकरच सुरूवात होणार आहे. यातच आता राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सोमवार, दि. १६ ते शनिवार, दिनांक २१ डिसेंबर या कालावधीत होणार आहे.मुंबईत येथे विधानभवनात विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. » पान ७ वर

### घटनेचे राजकारण करू नये: टिळेकर

**पुणे :** पुण्यातील हडपसर येथील भाजपाचे विधान परिषद आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश सातबा वाघ यांचं अपहरण करून हत्या करण्यात आल्याची घटना सोमवारी घडली. या घटनेनंतर विरोधकांकडून सरकारवर जोरदार टीका केली जातेय. त्यातच आता आमदार योगेश टिळेकर यांनी प्रतिक्रिया दिली असून, यात राजकारण न करता पोलीस आपलं काम करत आहेत. सामान्य माणूस असो » पान ७ वर

# मतांमध्ये फेरफार नाही!

## विरोधकांचा आरोप निवडणूक आयोगाने फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये विरोधकांनी केलेल्या मतांमध्ये फेरफार केल्याचा आरोप मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्टपणे फेटाळून लावला आहे. व्हीव्हीपॅट (व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल) आणि ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) यांच्या डेटामध्ये कोणतीही तफावत आढळून आलेली नाही. आम्ही प्रत्येक मतदान केंद्रावर ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची जुळवाजुळव केली असून सर्व निकाल अचूक असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने करण्यात आली असून कोणत्याही प्रकारचा गोंधळ होण्याची शक्यता नाही, असे आयोगाने स्पष्टपणे सांगितले आहे.

सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांनुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पाच मतदान केंद्रांच्या व्हीव्हीपॅट स्लिपची मोजणी करून त्यांची ईव्हीएममधील क्रमांकांशी जुळवाजुळव करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले की, २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील ५ यादृच्छिकपणे निवडलेल्या मतदान केंद्रांच्या व्हीव्हीपॅट स्लिपची मोजणी, मतमोजणी पर्यवेक्षक आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर मतमोजणी करण्यात आली.

**» वाद ईव्हीएमचा**

त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघातील १४४० व्हीव्हीपॅट युनिटच्या स्लिप काउंटची संबंधित कंट्रोल युनिटच्या आकडेवारीशी जुळवाजुळव करण्यात आली आहे. संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून (डीईओ) मिळालेल्या माहितीनुसार, व्हीव्हीपॅट स्लिप मोजणी आणि ईव्हीएम कंट्रोल » पान ७ वर

### विरोधकांचा आक्षेप

• मतदानादरम्यान ईव्हीएममध्ये छेडछाड करण्यात आली असून व्हीव्हीपॅट स्लिपशी मतांची जुळवाजुळव होत नसल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला होता. या आरोपांच्या आधारे त्यांनी निवडणूक आयोगाकडे निष्पक्ष चौकशीची मागणी केली. मात्र, निवडणूक प्रक्रियेदरम्यान सुरक्षेच्या सर्व उपाययोजनांचे पालन करण्यात आल्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र विधानसभेच्या ९५ मतदारसंघांतील १०४ उमेदवारांनी निवडणूक आयोगाकडे ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटडेटाची पडताळणी आणि जुळवाजुळव करण्याची मागणी केली होती. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, ३१ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या ९५ विधानसभा मतदारसंघातून फेरपडताळणी मागविण्यात आली होती.



### पुण्यात पुन्हा हुडहुडी!

**पुणे :** राज्यात पुन्हा एकदा थंडी जाणवू लागली आहे, गेल्या आठवडाभरात राज्यातील अनेक शहरांमध्ये उष्णता, अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरण असं संमिश्र वातावरण दिसून आलं. मात्र, आता पुन्हा राज्यात गारठा वाढू लागला आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे कमाल आणि किमान तापमानात पुन्हा घट होताना दिसत आहे. पुणे आणि मुंबईच्या तापमानातही मोठी घसरण झाली आहे.उत्तर महाराष्ट्रात देखील गारठा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गारठा वाढल्यामुळे नागरिक ठिकठिकाणी शेकोट्या पेटवत आहेत, तर पुढील दहा दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रात गारठा आणखी वाढू शकतो. पुढील ५ दिवसात पुण्यात आणखी हुडहुडी भरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुण्यात आज १२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. तर येत्या काही दिवसात पुण्याचे तापमान आणखी घसरून दहा अंशावर जाण्याची शक्यता आहे. मुंबईतही पुढील काही दिवसांत थंडी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

पुणे शहरात उत्तर भारतातून शीतलहरी सक्रिय होत आहेत. त्यामुळे पहाटेच्या तापमानात » पान ७

# मुख्यमंत्री फडणवीस-अदानी भेटीने खळबळ

## धारावी प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर महत्त्व



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अदानी उद्योग समुहाचे संस्थापक तथा उद्योगपती गौतम अदानी यांनी सागर बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. महायुतीचं सरकार पुन्हा स्थापन झाल्यानंतर गौतम अदानी यांनी प्रथमच मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली.

आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीच्या पुनर्वसनाचा प्रकल्प अदानी ग्रुपकडून केला जात आहे. या प्रकल्पाला उद्धव ठाकरे आणि काँग्रेसनं कडाडून विरोध केला आहे. दुसरीकडं संसदेतदेखील अदानींच्या प्रकरणावरून विरोधक प्रश्न उपस्थित करत आहेत. अशा परिस्थितीत गौतम अदानी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या झालेल्या भेटीबाबत तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.

गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेतील न्यायालयात आरोप करण्यात आले. हे आरोप अदानी यांनी फेटाळले आहेत. असं असलं तरी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अदानींवरील आरोपांची चौकशी करून अदानी यांच्या अटकेची मागणी केली. या मुद्द्यावरून संसदेत रोज गदारोळ होत आहे. काँग्रेसच्या सरचिटणीस तथा खासदार प्रियांका गांधी-वड्रा या मंगळवारी संसदेत पोहोचल्या. तेव्हा त्यांच्यासोबत एक बॅग होती. त्या बॅगवर » पान ७ वर

# आता लक्ष्य सभापतीपद

## महायुतीमधील घटक पक्षांच्यातच पदासाठी रस्सीखेच...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भाजपाने विधानसभेच्या अध्यक्षपदावर राहुल नार्वेकरांची वर्णी लावल्यावर आता विधान परिषदेचे सभापती पद मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केलेत. परंतु या पदावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याचबरोबर उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांचाही डोळा आहे. विधानसभेचे अध्यक्षपद भाजपाकडे गेल्यानंतर विधान परिषदेचे सभापतीपद आपल्याकडे खेचण्यासाठी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यात स्पर्धा सुरू झालीय. तर या दोघांच्या भांडणात विधानसभा अध्यक्षपदाबरोबर विधान परिषद सभापतीपद आपल्याकडेच ठेवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विशेष रणनीती आखत आहेत. परंतु या पदावरून तिघांमध्ये मोठ्या प्रमाणात रस्सीखेच सुरू झाली असून, सहजासहजी या पदावर तोडगा निघण्याची चिन्हं कमी आहेत.

महायुतीत भाजपा मोठा भाऊ असल्याने साहजिकच विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपाने राहुल नार्वेकरांची सलग दुसऱ्यांदा विधानसभा अध्यक्षपदावर नियुक्ती केलीय. यानंतर भाजपाने पुन्हा विधान परिषद सभापती पदावरसुद्धा आपला दावा केलाय. या पदासाठी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने धनगर समाजाचे विधान परिषदेचे सदस्य राम शिंदेंच्या नियुक्तीला संमती दर्शवली असल्याची चर्चा आहे. मागच्या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राम शिंदे यांच्या नियुक्तीला संमती दिली होती. कर्जत-जामखेड मतदारसंघातून यंदा विधानसभेच्या निवडणुकीत शरद पवार गटाचे रोहित पवार यांनी निसटत्या मताने राम शिंदे यांचा पराभव केला होता. » पान ७ वर


### रिक्त जागांची संख्या ३३

• यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचे विधान परिषद सदस्य चंद्रशेखर बावनकुळे, गोपीचंद पडळकर, प्रवीण दटके आणि रमेश कराड हे विजयी झालेत. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे शिवसेनेकडून आमशा पाडवी आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे राजेश विटेकर यांचाही विजय झालाय. अशा परिस्थितीत आता विधान परिषदेच्या आणखी ६ जागा रिक्त झाल्याने एकूण रिक्त जागांची संख्या ३३ झालीय.



### सीमाप्रश्नी मुख्यमंत्री मार्ग काढतील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र आणि कर्नाटक मधील सीमावाद पुन्हा एकदा चिघळताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जातीने लक्ष घालून समन्वयातून मार्ग काढतील आणि मराठी भाषिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेतील, असा विश्वास व्यक्त केला. ते पत्रकारांशी बोलत होते.

दरेकर म्हणाले की, विरोधकांना सर्वप्रथम लाज वाटली पाहिजे. ज्या विरोधी पक्षात काँग्रेस आहे त्या काँग्रेसचे सरकार » पान ७ वर

# मुंबईतल्या घटनेत बसचालक खोटे बोलतोय? तज्ज्ञांचा तर्क

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बसचे ब्रेक फेल गेल्याने अपघात घडला, असा दावा बसचालक संजय मोरे याने केला आहे. मात्र, इलेक्ट्रिक बसचे ब्रेक कधीच फेल होत नाहीत असा तर्क तज्ज्ञांनी काढला आहे. त्यामुळे आता बसचालक खोटे तर बोलत नाही ना?, असा प्रश्नही आता उपस्थित केला जाऊ लागला आहे. सोमवारी (दि. ९) रात्री कुर्ल्यात भरधाव बेस्ट बसने अनेकांना चिरडले. बसचालक संजय मोरेची नियुक्ती १ डिसेंबर रोजीच झाली होती. या बेस्ट बसचालकाला कंत्राटावर घेतले होते. त्याला यापूर्वी बस चालवण्याचा अनुभव नव्हता. या अपघातानंतर » पान ७ वर



आरोपीवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

मुंबईतील कुर्ला पश्चिम रेल्वेस्थानकाजवळील आंबेडकर नगर येथे सोमवारी रात्री बसचा भीषण अपघात झाला. या बसने रस्त्यावरुन चालणाऱ्या लोकांना व वाहनांना चिरडले. या अपघातात एकूण ४९ जण जखमी तर, ७ जणांचा मृत्यू झाला आहे. या बेस्ट बसचा चालक संजय मोरे ( वय ५४ ) याची बसचालक म्हणून १ डिसेंबर रोजीच नियुक्ती झाली होती. या बसचालकाला » पान ७ वर

### धनगर समाजाला बदनाम करण्याचा पवारांचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नातेपुते :** लोकशाही प्रक्रियेतून निवडणूक घेतली जाते. त्याच्या विरोधात महाराष्ट्रातील धनगर समाज आहे, असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न शरद पवार यांच्याकडून सुरू आहे. त्यामुळे मारकडवाडी येथील धनगर समाजाला ईव्हीएमविरोधात पुढे करण्यात आले आहे, असा आरोप भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी आज (दि.१०) मारकडवाडी येथे केला. यावेळी आमदार सदाभाऊ खोत उपस्थित होते.

आ. पडळकर म्हणाले की, येथील काही बांधवांचे फोन आम्हाला आले आणि त्यांनी असे सांगितले की, मारकडवाडीतून एकच बाजू महाराष्ट्रासमोर जात आहे. मारकडवाडीतील लोकांना बॅलेट पेपरवर मतदान हवं » पान ७ वर

## नमस्ते सूर्यनारायणा

विजयकुमार हरिश्चंद्रे



» **जेजुरी :** दोन दिवसांत थंडीचा कडाका वाढला असून, अशा वेळी सुर्योदय होताच किरणांनी न्हाऊन गेलेल्या जेजुरीच्या ऐतिहासिक गडाचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते.

### कोलकाता प्रकरणी सर्वोच्च दखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील सरकारी आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी सुप्रीम कोर्टाने स्वत:हून याचिकेवर आज (दि.१०) सुनावणी घेतली. दरम्यान न्यायालयाने या घटनेतील खटल्याची स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल टास्क फोर्सला १२ आठवड्यांच्या आत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने आता आपण केंद्रीय कायदा वगैरे विषय हाताळू शकत नाही. पण या खटल्यातील स्टेप बाय स्टेप जायचं आहे, असे स्पष्ट केले. न्यायालयासमोर या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाला अपडेट देताना वकील वृंदा ग्रोव्हर » पान ७ वर

# बांगलादेशाची परिस्थिती पाकसारखी करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** बांगलादेशात हिंदू व अल्पसंख्याकांवर घडत असलेल्या अत्याचाराविरोधात आता संपूर्ण भारत आवाज उठवत आहे. राष्ट्रीय मानव अधिकार दिनाच्या निमित्ताने जयस्तंभ, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे विश्व हिंदू परिषदेने बांगलादेशात घडणाऱ्या घटनेप्रकरणाविरोधात मंगळवारी धरणे आंदोलन केले. या आंदोलनामध्ये रत्नागिरी शिवसेना आमदार उदय सामंत उपस्थित होते. त्यांनी बांगलादेशात भारतीय अल्पसंख्यांकांवर जो अन्याय होत आहे तो निषेधार्ह असल्याचे सांगून केंद्रसरकारकडे बांगलादेशची परिस्थिती पाकिस्तानसारखी करण्याची मागणी केली.



राष्ट्रीय मानव अधिकार दिनाच्या निमित्ताने मंगळवारी ठिकठिकाणी आंदोलने केली जात आहेत. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारावर राज्याराज्यात निदर्शने होत आहेत. प्रत्येक ठिकाणी आंदोलने, मुक मोर्चे काढून या गोष्टीचा निषेध करण्यात येत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील जयस्तंभ, जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर विश्व हिंदू परिषदेने धरणे आंदोलन केले आहे. यामध्ये बांगलादेश करत असलेल्या अत्याचाराचा निषेध केले गेला. याठिकाणी शिवसेना आमदार उदय सामंतदेखील उपस्थित होते. "हे आंदोलन हे केवळ बांगलादेशातील हिंदूंच्या अस्तित्वाचे आंदोलन नसून ते आपल्यादेखील अस्तित्वाचे आंदोलन असल्याचे," उदय सामंत यांनी सांगितले.

# उत्पन्न काहीच नाही, मात्र खर्च कोट्यवधींचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारने दिलेल्या मिळकतकर वसुलीच्या निर्णयामुळे तसेच दोन गावांतील बांधकाम परवानगीचे अधिकार देखील काढून घेतल्याने पालिकेला आर्थिक फटका बसत आहे. या गावातून उत्पन्न मिळत नसले तरी या गावात आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी महापालिकेवरच असल्याने तेथे महापालिका प्रशासनाला खर्च करावा लागत आहे. या गावांच्या विकासासाठीचा भार महापालिकेलाच उचलावा लागत असल्याने उत्पन्न काहीच नाही, मात्र खर्च कोट्यवधींचा अशीच काही स्थिती महापालिका प्रशासनाची झालेली आहे. राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आल्याने या गावांबाबत आणि तेथे देण्यात आलेल्या मिळककराच्या स्थगितीवर सकारात्मक निर्णय घेत राज्य सरकारने पालिकेच्या तिजोरीवर पडणारा भार कमी करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत म्हणून मिळकत कर, बांधकाम परवानगी, पाणीपट्टी याकडे पाहिले जाते. महापालिकेच्या नऊ हजार कोटी रुपयांच्या » पान ७ वर

### मिळकतकर वसुलीला ब्रेक

• गावांमधून मिळणाऱ्या मिळकतकराच्या वसुलीसाठी स्थगिती देण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर या गावातील बांधकामांना परवानगी देण्याचा अधिकार देखील महापालिकेकडून काढून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे येथील बांधकामांवर महापालिकेचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. ही दोन्ही गावे वगळता अन्य नऊ गावांतील मिळकतकर वसुलीला ब्रेक लावण्यात आलेला आहे. या गावांमध्ये महापालिकेची एक हजार २०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. तर फुरसुंगी आणि उरुळी देवाची या गावातून पालिकेला मिळकतकरापोटी २५० ते ३०० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. मात्र राज्य सरकारच्या आदेशामुळे सध्या तरी महापालिकेला या उत्पन्नापासून वंचित रहावे लागत आहे.

### सुविधांसाठी पालिकेची जबाबदारी

• १) नागरिकांना रस्ते, पाणी या पायाभूत सुविधा देण्याबरोबरच तेथील घनकचऱ्याचे व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन करणे
• २) गावांमधील अतिक्रमणे दूर करणे,
• ३) रस्त्यांसाठी जागा ताब्यात घेणे,
• ४) मुलांना खेळण्यासाठी उद्याने, खेळांची मैदाने तयार करणे,
• ५) प्राथमिक आरोग्याच्या सोयीसाठी रुग्णालय सुरू करणे,

**Shrinath Shikshan Prasarak Mandal**
Gat No. 37/1 & 37/2, Kondhapuri, Tal. Shirur, Dist. Pune – 412209
Phone: 08669912745 / 020 - 25431001 Web: www.sspm.co.in
'' तमसो मा ज्योतिर्गमय ''

**SSC Board : ADMISSIONS OPEN : 2025-26**

**R. M. Dhariwal Sinhgad Spring Dale School**
Kondhapuri, Tal. Shirur, Dist. Pune – 412209
(Affiliated to Maharashtra State S.S.C. Board & Recognized by Govt. of Maharashtra)
Gat No. 37/1 & 37/2, Kondhapuri, Tal. Shirur, Dist. Pune – 412209
Phone: 08669912745 / 020 - 25431001
| Pre-Primary | Primary | Secondary |
Principal: Mrs. Smita Gawade [09284598996]
Email: viceprincipal.rmdssdsk@sinhgad.edu / office15rmdssdsk@sinhgad.edu

**Admission Procedure** : Prospectus and prescribed application form can be obtained from the school office between 10.00 am and 02.00 pm on all working days at payment of Rs. 500/- in cash. Parents desirous of having additional information shall contact in the school office.
**Salient Features:** • Holistic approach to ensure overall development of the students • Spacious & well furnished classrooms • Well equipped Lab & Library • Activities like Music, Art, Cricket, Throw ball, & Athletics are conducted • Especially designed play area with modern play equipments • Spacious play ground • Highly qualified & experienced staff.
**Note :-** Sinhgad Institutes has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted under Shrinath Shikshan Prasarak Mandal. The parents are advised to remain in touch with the School Principal / Authorized School Staff only.

*Subject to Pune Jurisdiction only
Dr. (Mrs.) Sunanda M. Navale, Secretary
Prof. M. N. Navale, President

## ७६४ कर्मचारी, अधिकाऱ्यांनी केली 'साफसफाई'

# बापरे...! २४ टन कचरा अन राडारोडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महापालिकेच्या सहा विभागांचे ७६४ कर्मचारी, अधिकारी एकाच वेळी रस्त्यावर उतरून पुणे महानगरपालिकेने सुरू केलेल्या 'सर्वंकष स्वच्छता' मोहिमेच्या पहिल्या दिवशी शहरातील दोन प्रभागांतून २४ टन कचरा, १६ टन राडारोडा यांसह बेकायदा जाहिरात फलक, बॅनर काढण्यात आले.

पुणे स्टेशन परिसर, तसेच ताडीवाला रोड, बंडगार्डन परिसरातील प्रभाग क्रमांक २० आणि २१ मध्ये ही स्वच्छता करण्यात आली.

महापालिकेतील घनकचरा, विद्युत, पथ, आकाशचिन्ह, अतिक्रमण, तसेच उद्यान विभागातील कर्मचारी यामध्ये सहभागी झाले होते. अलंकार चौक ते पोलीस आयुक्तालय चौक, बंडगार्डन पाणीपुरवठा चौक ते जहांगीर चौक, तसेच रुबी हॉल हॉस्पिटल ते सिटी पॉइंट चौक या रस्त्यावर महापालिकेच्या वतीने पहिल्या टप्प्यात ही स्वच्छता करण्यात आली. शहरातील परिमंडळनिहाय (झोन) ही मोहीम राबविली जाणार आहे. त्याची सुरुवात झाली आहे.

मोहिमेच्या पहिल्या दिवशी प्रभाग क्रमांक २० मध्ये ६ टन, तर प्रभाग २१ मध्ये १० टन राडारोडा उचलण्यात आला. ओला, सुका, गार्डन वेस्ट असा २४ टन कचरा दोन्ही प्रभागांतून उचलण्यात आला. याबरोबरच रस्त्यावर बेवारस, नादुरुस्त असलेली वाहने, वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या हातगाड्या, लोखंडी स्टॉल, पथारी, तसेच इतर अडथळा ठरणाऱ्या गोष्टी हटविण्यात आल्या. बेकायदा पद्धतीने लावण्यात आलेले ३५ जाहिरात फलक, १२३ फलक काढले. बंडगार्डन ते प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दोन्ही बाजूंना ४२ झाडांच्या धोकादायक फांद्या कापण्यात आल्या. पथ विभागाच्या वतीने १३० चौरस मीटर रस्त्याची डागडुजी आणि २५ चौरस मीटर पदपथाची दुरुस्ती करण्यात आली.

पालिकेतील महत्त्वाच्या विभागांचे कर्मचारी एकत्र आणि एकाच दिवशी रस्त्यावर उतरल्यास मोठ्या प्रमाणात त्याचा फायदा शहर स्वच्छ करण्यासाठी होऊ शकतो.

> महापालिका आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार, प्रभाग क्रमांक २० आणि २१मध्ये 'सर्वंकष स्वच्छता' करण्यात आली. सहा विभागांचे पावणेआठशे कर्मचारी एकाच वेळी रस्त्यावर उतरले होते. सध्या परिमंडळ एकमध्ये ही मोहीम सुरू आहे.
>
> — संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा विभाग

# पालिकेच्या शाळांवर तिसऱ्या डोळ्याची नजर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शहरात महापालिकेच्या सुमारे २८० हून अधिक शाळा असून त्या शहरातील सुमारे दीडशे इमारतींमध्ये भरतात. तर काही शाळांना मोठी मैदाने आहेत. तेथे सुरक्षा रक्षक नेमण्यात आले असले तरी त्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे शाळांच्या परिसरात कचरा टाकणे, शाळेतील साहित्य चोरणे, मैदानात रात्रीच्या वेळी मद्यपी तसेच नशेखोरांचा वावर असणे, गुन्हेगारी कृत्य करणे अशा प्रकारांचा समावेश आहे. त्यामुळे शाळांचे नुकसान टाळणे तसेच हे गैरप्रकार रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून शाळांमधे सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत.

शहरातील महापालिका शाळांच्या इमारती तसेच शाळांच्या परिसराच्या सुरक्षेसाठी शहरातील पालिकेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. त्यासाठी तीन कोटी रुपयांचा निधी वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्थायी समितीच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

त्याबाबत महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून महापालिका आयुक्तांकडे मागणी करण्यात आली होती. तर, आयुक्तांनी विद्युत विभागाने सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, विद्युत विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याचे कळविले होते.

**● हायड्रो उर्जा प्रकल्प रद्द**

शाळांच्या सुरक्षेचे प्राधान्य लक्षात घेता महापालिकेने शहरात हायड्रो उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अंदाजपत्रकात १२ कोटींची तरतूद केली होती. हा प्रकल्प होणार नसल्याने या निधीतून तीन कोटींचा निधी शाळांना सीसीटीव्ही बसविण्यासाठी वर्गीकरणाद्वारे देण्यात आला आहे. महापालिका प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे शाळा परिसरात येणारा विद्यार्थी अधिक सुरक्षित राहाण्याची शक्यता आहे.

## पुण्यात काय घडतंय...

### 'आदिअष्टकम' नृत्य कार्यक्रम



- **आयोजक :** भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रम
- **सादरकर्ते :** 'नाद रूप',शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था आणि डॉ.उषा आर.के. (मॉस्को)
- **सहभाग :** वर्षा दासगुप्ता, अस्मिता ठाकूर, मुकेश गंगाणी, अमीरा पाटणकर, अवनी गद्रे
- **संयोजक :** प्रा. नंदकुमार काकिर्डे
- **कुठे :** भारतीय विद्या भवन, सेनापती बापट रस्ता
- **कधी :** रविवार १५ डिसेंबर, सांयकाळी ६.१५
- **शुल्क :** सर्वांसाठी कार्यक्रम खुला

### 'थ्रेड स्टोरी' प्रदर्शनाचे आयोजन



- **प्रदर्शनाचे वैशिष्ट्य :** कापडाच्या तुकड्यांचा पुनर्वापर करीत साकारलेल्या कलाकृत व कथानक अनुभविण्याची संधी
- **प्रदर्शनाचे उदघाटन :** मंगळवार दि. १७ डिसेंबर रोजी, सायं ५ वाजता
- **हस्ते :** पौरवी महाजन, पूनम मेहता, सोनाली ठोसर
- **कुठे :** राजा रवी वर्मा कलादालन, घोले रस्ता, शिवाजीनगर
- **कधी :** बुधवार दि. १८ ते रविवार दि. २२ डिसेंबर सकाळी ११ ते सायं. ६.३० दरम्यान
- **शुल्क :** प्रदर्शन रसिकांसाठी विनामूल्य खुले

### 'संगीत स्वयंवर'चा अनोखा प्रयोग



- **आयोजक :** बालगंधर्व संगीत रसिक मंडळप्रमुख
- **उपस्थिती :** केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रूई युनिव्हर्सलचे सीईओ नकुल देशपांडे, कोहिनूर उद्योग समुहाचे प्रमुख कृष्णकुमार गोयल, सनदी लेखापाल विजयकांत कुलकर्णी आणि उद्योजक श्रीधर प्रभू
- **कुठे :** बालगंधर्व रंगमंदिर, शिवाजीनगर
- **कधी :** रविवार दिनांक १५ डिसेंबर रोजी, स.९.३०

# प्रत्येक मतदारसंघात किमान पन्नास हजार सभासद नोंदणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता पुणे महापालिकेवर सुद्धा भारतीय जनता पार्टीचा भगवा फडकविणार असल्याचे प्रतिपादन शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पुणे शहरात ८ ही मतदारसंघात सदस्य नोंदणी अभियानाचा प्रारंभ होत आहे ह्या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली प्रत्येक मतदारसंघात कमीत कमी ५० हजार सदस्य तसेच प्रत्येक प्रभागात कमीतकमी १० हजार सदस्य नोंदणीचा संकल्प यावेळी करण्यात आला या अभियानाचे प्रमुख म्हणून पुणे शहर सरचिटणीस राघवेंद्र उर्फ बापु मानकर यांची निवड या वेळी करण्यात आली.

या वेळी बोलताना शहराध्यक्ष घाटे म्हणाले ' देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर जनतेने विश्वास दाखवत शाश्वत विकासाला प्राधान्य देत जे प्रेम भारतीय जनता पार्टीला दाखवले आहे सामान्य नागरिक भारतीय जनता पार्टी शी जोडू इच्छित आहे त्यामुळे भारतीय जनता पार्टीने राष्ट्रीय स्तरावर सदस्य नोंदणी अभियान सुरू केले आहे त्याचा एक भाग म्हणून शहरामध्ये सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे ह्या अभियानामध्ये भारतीय जनता पार्टीचा प्रत्येक कार्यकर्ता जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करतील असा विश्वास आहे

या बैठकीला सरचिटणीस पुनीत जोशी, रवींद्र साळेगावकर, वर्षा तापकीर, सुभाष जंगले राघवेंद्र मानकर, प्रमोद कोंढरे , राजेंद्र शिळीमकर, राहुल भंडारे,महेश पुंडे, गणेश कळमकर, सुशील मेंगडे यांच्या सह माजी नगरसेवक शहर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी ऍक्शन मोड वर सदस्य नोंदणी अभियानाने रणशिंग फुंकणार"
>
> —धीरज घाटे, शहराध्यक्ष भाजपा, पुणे.

» राजकीय

# रब्बी पिकांच्या उत्पादनात वाढ होण्याची शक्यता

## यंदा चांगला पाऊस झाल्याने ज्वारी, बाजरी पीक वाढीच्या अवस्थेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** यंदा सुरुवातीपासून झालेल्या पावसामुळे जमिनीत अधिक ओल असल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी उशिराने पेरण्या केल्या आहेत. त्यामुळेरब्बी पिकांच्या क्षेत्रात चांगलीच वाढ झाली असून उत्पादनात वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाच्या सूत्रांनी वर्तवली आहे. यंदा चांगला पाऊस झाल्याने रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पेरलेले ज्वारी पीक वाढीच्या अवस्थेत आहे. काही ठिकाणी कणसाच्या अवस्थेत ज्वारी पीक आले आहे. सध्या ढगाळ वातावरणामुळे थंडी कमीअधिक होत असल्याने ज्वारीवर रोग, किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने शेतकरी योग्य त्या उपाययोजना करत आहेत.

मॉन्सूनोत्तर पावसामुळे रब्बी हंगामात उशिराने रब्बीच्या पेरण्या झाल्या आहेत. आतापर्यंत पुणे विभागात सरासरी सात लाख २० हजार २२७ हेक्टरपैकी ४ लाख ५७ हजार ७७१ हेक्टर म्हणजेच ६४ टक्के पेरण्या झाल्या आहेत. सध्या बागायत भागातील गहू, हरभरा पिके वाढीच्या अवस्थेत असून ज्वारीचे पीक कणसाच्या व वाढीच्या अवस्थेत आहे.

पुणे जिल्ह्यातील पश्चिमेकडील मावळ, मुळशी, भोर, वेल्हा तालुके हे खरिपाच्या पिकांसाठीचे म्हणून ओळखले जातात. त्यामुळे रब्बी हंगामात या तालुक्यांत अत्यंत कमी प्रमाणात पेरणी झाल्याचे दिसून येते. पूर्वेकडील शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, खेड, आंबेगाव, जुन्नर तालुक्यांत रब्बीची मोठ्या प्रमाणात पेरणी झाली आहे. पावसाळ्याच्या अखेरीस बराच काळ वापसा न झाल्यामुळे आणि बऱ्यापैकी पाणी उपलब्ध झाल्यामुळे ज्वारीऐवजी गहू आणि हरभरा पिकांला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिल्याचे दिसून येते.



# शौर्यदिनासाठी सुविधांमध्ये वाढ करा : - राहुल डंबाळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भिमाकोरेगाव शौर्यदिन कार्यक्रमासाठी येणाऱ्या भीम अनुयायांना देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करावी अशी मागणी भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्याकडे केली.

शौर्यदिनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत राहुल डंबाळे यांनी समाजाच्या वतीने भूमिका मांडताना वरील मागणी केली " मागील वर्षीपेक्षा जास्त गर्दी यावर्षी होणार असल्याने त्या तुलनेत सुविधांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर स्तंभाची याही वर्षी सजावट करावी अशी मागणी देखील डंबाळे यांनी केली आहे. महाराष्ट्रातून येणाऱ्या आंबेडकरी अनुयायांना राज्य परिवहन महामंडळाकडून विशेष गाड्या उपलब्ध करून द्याव्यात अशी देखील मागणी यावेळी त्यांनी केली.

**सुविधा पुरविण्याचे स्वागत**

● " ज्येष्ठ नागरिक व इतर अनुयायांच्या सुविधांसाठी एक जानेवारी सोबतच ३१ डिसेंबर रोजी देखील सर्व पायाभूत सुविधा देण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाचे समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले असून यंदाचा उत्सव हा अधिक आनंदात साजरा केला जाईल " असा विश्वास देखील डंबाळे यांनी यावेळी बैठकीत दिला.

» Selected

# पुण्यातील आरोग्य चित्रपट महोत्सवात "अत्तर" दरवळणार

**पुणे :** द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स प्रस्तुत व रुहानी म्युझिक निर्मित आणि रामकुमार शेडगे दिग्दर्शित असलेल्या अत्तर लघुपटाला जगभरातील व देशभरातील गाजलेल्या लघुपट महोत्सवात आता पर्यंत अनेक नामंकने आणि पुरस्कार मिळाले असून पुण्यातील १३ व्या आरोग्य चित्रपट महोत्सवात "अत्तर" लघुपटाची निवड झाली आहे. माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत 'अत्तर' खूप महत्वाची भूमिका बजावत असते. 'अत्तर' जणू माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. याच सुगंधी 'अत्तराची अस्वस्थ करणारी गोष्ट दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांनी मांडली आहे. शनिवारी २० डिसेंबर रोजी सायंकाळी ४.०० वा. लॉ, कॉलेज रोड येथील राष्ट्रीय फिल्म संग्रहालय येथे अत्तर लघुपट दाखवला जाणार असून या लघुपटातील कलाकार मीरा शेडगे, पुरुषोत्तम बाबर, रेवा बर्गे, विनय सोनवणे, रमेश साठे, सिराज कसबे तसेच निर्माते राजू लुल्ला, दिग्दर्शक रामकुमार शेडगे हे उपस्थित राहणार आहेत. तरी चित्रपट रसिक प्रेक्षकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# वॉकिंग प्लाझा' मुळे ' पीएमपी'च्या मार्गात बदल

### सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत होणार बदल

**पुणे :** महापालिकेच्यावतीने बुधवारी पादचारी दिनाचे आयोजन केले आहे. त्या दिनानिमित्ताने लक्ष्मी रस्त्यावर 'वॉकिंग प्लाझा' हा उपक्रम पार पडणार आहे. त्यामुळे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान लक्ष्मी रस्त्यावरून धावणाऱ्या 'पीएमपी' बसच्या मार्गात बदल केला जाणार आहे. यामुळे ५० बसच्या मार्गात बदल होणार आहे.

**मार्ग क्रमांक :** ५५, ५८ व ५९ शनिपार चौकहून अ. ब. चौक, नारायण पेठ, अलका टॉकीज चौकातून आपल्या निर्धारित मार्गाने.

मार्ग क्रमांक : ५७ या मार्गावरील बसेस पुणे स्टेशनकडून नारायण पेठमार्गे अलका टॉकीज चौक, आपल्या निर्धारित मार्गाने.

**मार्ग क्रमांक :** १७४ पुणे स्टेशनकडून एनडीएकडे जाताना सिटी पोस्टपर्यंत नियमित मार्गाने व पुढे उजवीकडे वळून अ. ब. चौक, नारायणपेठ, अलका टॉकीज चौकहून आपल्या निर्धारित मार्गाने.

**मार्ग क्रमांक :** १९७ व २०२ या मार्गावरील बसेस हडपसर येथून कोथरूड डेपो, वारजे माळवाडीकडे जाताना सिटी पोस्टपर्यंत नियमित मार्गाने धावेल. अ. ब. चौक, नारायण पेठमार्गे अलका टॉकीज चौक, आपल्या निर्धारित मार्गाने धावेल.

**मार्ग क्रमांक :** ६८ या मार्गावरील बसेस अप्पर डेपोकडे जाताना नियमित मार्गाने व अप्पर डेपोकडून सुतारदराकडे येताना टिळक रस्त्याने धावेल.

# पत्नीकडे दुर्लक्ष करणाऱ्या पतीला न्यायालयाचा दणका

## पोटगीपोटी पत्नीला दरमहा तीस हजार देण्याचे आदेश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लग्नानंतर पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करत तिला भारतातच ठेवून लंडन गाठत पत्नीकडे दुर्लक्ष करणाऱ्या पतीला न्यायालयाने दणका दिला आहे. पौंडमध्ये कमविणाऱ्या पतीत पोटगी देण्याची कुवत आहे, असे नमूद करत पत्नीला अंतरिम पोटगी म्हणून दरमहा २० आणि घरभाड्यापोटी १० हजार रुपये देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. नीलेश आणि निलांबरी (दोघांचीही नावे बदललेली) असे या जोडप्याचे नाव आहे. विवाह जुळविणाऱ्या एका संकेतस्थळाद्वारे त्यांची ओळख झाली होती. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांनी लग्न केले. लग्नानंतर त्याने पत्नीला लंडनला नेण्याचे वचन दिले होते. परदेशात जाण्यासाठी त्यांनी निलांबरी यांना आयटीमधील चांगल्या पगाराची नोकरी सोडायला लावली.

मात्र लग्नाच्या काही दिवसानंतर शारीरिक तसेच मानसिक त्रास देण्यास सुरवात केली. त्यानंतर, नीलेश हे एकटेच थेट लंडन येथे त्याचा व्यवसाय सांभाळण्यासाठी गेले. लंडनला स्थायिक असल्यामुळे नीलेश पत्नीला सोबत घेऊन जाऊ शकले असते. मात्र त्यांनी पत्नीचा वैयक्तिक व्हिसा काढला. त्यामुळे तो नाकारण्यात आला. पती लंडनला असल्याने निलांबरी या सासरी गुजरातमध्ये राहत होत्या.

त्यावेळी त्यांना पती आणि सासरच्या मंडळींनी अपमानास्पद वागणूक देवून कौटुंबिक हिंसाचार केला. त्यामुळे त्यांनी त्याबाबतचा दावा दाखल करत पतीकडून पोटगी व घरभाडे मिळावे यासाठी ॲड. प्रसाद निकम, ॲड. मन्सूर तांबोळी, ॲड. शुभम बोबडे व ॲड. प्राजक्ता बाबर यांच्यामार्फत न्यायालयात अर्ज केला.

**उत्पन्नाबाबत खोटी माहिती दिली -**

● उत्पन्न लपविण्यासाठी पतीने न्यायालयात त्याची मालमत्ता व दायित्व याची खोटी माहिती दिली. मात्र निलांबरीने व्हिसासाठी सादर केलेली पतीचे कागदपत्र न्यायालयात सादर केले. त्यानुसार त्याचे मासिक उत्पन्न १८ लाख रुपये होते व तो दीड लाख रुपये भाडे भरत असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान नीलेश हे शरीर संबंध ठेवण्यास सक्षम नसून त्यांच्यावर मनोविकाराचे उपचार सुरू असल्याचे वैद्यकीय पुराव्यातून स्पष्ट झाले आहे, असे ॲड. निकम यांनी सांगितले.

या प्रकरणात पती व त्याच्या कुटुंबीयांनी पत्नीवर कौटुंबिक हिंसाचार केले. तसेच लग्नावेळी दिलेले कोणतेही वचन पाळले नाही. पतीने केवळ आपली प्रतिष्ठा राखण्यासाठी हे लग्न केल्याचे समोर आले आहे. तसेच त्याने उत्पन्नाची खोटी माहिती दिली. या सर्व बाबी न्यायालयाच्या निदर्शनात आणून दिल्यानंतर न्यायालयाने पोटगीचा आदेश दिला.

# रेल्वेची 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' मोहिम फत्ते...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पळून आलेल्या मुलांचे समुपदेशन करण्यासाठी रेल्वेकडून 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' हा कार्यक्रम राबविण्यात येतो. याअंतर्गत अशा मुलांची पुन्हा त्यांच्या घरी पाठविले जाते. गेल्या ११ महिन्यांत पुणे विभागात २११ मुले आणि ३५ मुली अशा २४६ मुलांची घरवापसी करण्यात आली आहे.

रेल्वे संरक्षण दलाला (आरपीएफ) रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते'अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे देण्यात आली आहे. रेल्वेस्थानकावर कोणत्या तरी वादामुळे, कौटुंबिक समस्या, चांगल्या आयुष्याच्या किंवा शहराच्या ग्लॅमरच्या शोधात आलेल्या मुलांचा शोध आरपीएफ जवानांकडून घेतला जातो. हे प्रशिक्षित कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात.

**● मुलींचे प्रमाण सर्वाधिक**

जानेवारी ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत सुटका करण्यात आलेल्या मुलांची संख्या १०५३ (७४१ मुलगे आणि ३१२ मुली) होती. तर जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या काळात सुटका करण्यात आलेल्या मुलांची संख्या १०९९ मुलांची (७४० मुले आणि ३५९ मुली) आहे. यंदा मुलींचे प्रमाण गेल्यावर्षीपेक्षा वाढले आहे.

» सामाजिक

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर यांचे प्रतिपादन

# शिक्षणाचा उपयोग समाजासाठी व्हायला हवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शिक्षणाचे माहेरघर म्हणून पुण्याची ओळख आहे. पुण्यात मोठया प्रमाणात तरुणाई शिक्षण आणि व्यवसायासाठी येते. आता विद्यापीठांचे शहर म्हणून देखील पुणे हे नावलौकिकास येत आहे. जगात भारताचे नाव पुढे नेणारे विद्यार्थी पुण्यातून तयार होतील. त्यामुळे आपण घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग केवळ स्वत:साठीच नाही, तर समाजासाठी होणे गरजेचे आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले.

अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टतर्फे पुण्याच्या विविध भागांतील २२५ गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य प्रदान कार्यक्रमाचे आयोजन बुरुड आळी येथे करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ञ व विधीज्ञ ॲड. एस.के.जैन, ज्येष्ठ उद्योजक रमण लुंकड, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे, उद्योजक विजयकुमार मर्लेचा, सामाजिक कार्यकर्ते श्याम मारणे, शाहीर हेमंत मावळे, ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सुर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव आदी उपस्थित होते. वेकिंग इंडिया लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर बालाजी राव व वेकिंग उद्योग समूहाचे संचालक व्यंकटेश राव यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम घेण्यात आला.

ॲड. एस.के.जैन म्हणाले, आजच्या पिढीला वाचनाची आवड लावणे गरजेचे. पुस्तक आधी मोबाईल नंतर असे केले, तरच समाजाचे भले होईल. आई-वडिलांना नमस्कार करुन घराबाहेर पडण्याचे संस्कार लहान मुलांवर होणे गरजेचे आहे.

प्रास्ताविकात निवृत्ती जाधव म्हणाले, चुनाभट्टी, जनता वसाहत, दांडेकर पूल, दत्तवाडी, अप्पर इंदिरानगर, मंगळवार पेठ, जुना बाजार, पर्वती दर्शन, सोमवार पेठ, अरण्येश्वर, गणेश पेठ अशा विविध भागांतील गरजू मुला-मुलांनी शैक्षणिक साहित्याची भेट देण्यात आली. धार्मिकतेतून विधायकतेकडे हे ब्रीद अंगिकारुन ट्रस्ट कार्यरत असून जमा होणारा निधी सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

> मुलांनी मैदानी खेळ खेळणे आवश्यक आहे. तसेच वाचनातून आलेल्या चांगल्या गोष्टींचा अवलंब दैनंदिन जीवनात करायला हवा. भारत हा तरुणांचा देश आहे. आजची पिढीच ख-या अर्थाने देशाला पुढे नेऊ शकते.
>
> — ॲड. एस. के. जैन, ज्येष्ठ विधीज्ञ

#रा

## At a Glance

### ज्येष्ठ नागरिकाचा मोबाईल लंपास

**पुणे :** पादचारी ज्येष्ठ नागरिकाचा मोबाइल संच चोरट्याने चोरून नेल्याची घटना केळकर रस्त्यावरील नारायण पेठ पोलीस चौकीसमोर घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार नारायण पेठेतील एका सोसायटीत राहायला आहेत. जेवण करुन फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले.

### दोन दुचाकींची धडक, दोघे जखमी

**कात्रज :** पुणे-सातारा रस्त्यावरील पद्मावती परिसरात बीआरटी मार्गामध्ये दोन भरधाव दुचाकींच्या अपघातात दोघेजण गंभीर झाले. ही घटना पद्मावती परिसरातील डी मार्ट दुकानाजवळ सायंकाळी घडली. बीआरटी मार्गात भरधाव पल्सर आणि ॲक्टिव्हा दुचाकीची समोरासमोर धडक झाली. त्यात दोन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. जखमींमध्ये सुधीर औटी (वय ३५) यांच्यासह अन्य एका तरुणाचा समावेश आहे.

### महिलांना मार्गदर्शनासाठी शनिवारी कार्यशाळा

**पुणे :** आहार व आरोग्य विषयक जागरूकता वाढल्याने भरडधान्ये (मिलेट्स) आता ताटात दिसू लागले आहे. या पार्श्वभूमीवर भरडधान्यांवर प्रक्रिया करून विविध नावीन्यपूर्ण पदार्थ तयार करण्याविषयी मार्गदर्शन करणारी कार्यशाळा शनिवारी (ता. १४) व रविवारी (ता. १५) आयोजिली आहे.

# ओला, उबेरने बसवला 'सर्वोच्च' आदेश धाब्यावर

## परवानगी नाकारली, तरीही व्यवसाय जोमात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

राष्ट्रसंचार EXCLUSIVE



**पुणे :** ओला, उबेरचा व्यवसाय हा बेकायदा आणि ग्राहकांच्या हिताचे नाही, असे स्पष्ट मत नोंदवत येत्या २४ तासात हा व्यवसाय बंद करु असा निर्वाणीचा इशारा उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मात्र; ओला, रॅपिडो आणि उबेरच्या प्रशासनाने आपला मस्तवालपणा कायम ठेवला असून त्यांचा व्यवसाय जोमात सुरु आहे. विशेष म्हणजे विम्याच्या नावाखाली याच कंपन्या महिन्याकाठी ग्राहकांची कोट्यावधी रुपयांची लुट करत आहेत, त्यामुळे ग्राहकांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत बदलत्या काळानुसार नागरिकांच्या गरजा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे यापूर्वी असलेल्या काळया टॅक्सींना परवानगी कायम ठेऊन पिवळया नंबर प्लेट्च्या कारला व्यवसाय करण्यास परवानगी दिली आहे, या व्यवसायात होत असलेला नफा आणि ग्राहकांचा मिळत असलेला प्रतिसाद याची जाणीव ओला आणि उबेर तसेच रॅपिडो या कंपन्यांना झाली. त्यामुळे त्यांनी या व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतला होता, विशेष म्हणजे पैशाच्या बळावर या कंपन्यांनी हा व्यवसाय अल्पावधीतच हायजॅक केला. त्याचा परिणाम हातावर पोट असलेल्या खासगी कारचालकांवर झाला, त्यातूनच त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

त्यामुळे त्याची गंभीर दखल घेत या व्यवसायातील सर्व संघटनांनी संघटीत होत उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात या कंपन्यांच्या मनमानीच्या विरोधात याचिका दाखल केली होती, त्यावेळी उच्च न्यायालयाने खासगी कारचालकांच्या संघटनेच्या बाजूने निकाल देत ओला आणि उबेर चालकांची ही मनमानी असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले होते. तसेच येत्या २४ तासांच्या आत या व्यवसासायाचा गाशा गुंडाळा असे स्पष्ट आदेश दिले होते, या निर्णयाच्या विरोधात ओला आणि उबेर या कंपन्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. सर्वोच्च न्यायालयानेही हाच निकाल कायम ठेवत हा व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले होते, त्याशिवाय यासंदर्भात राज्याच्या परिवहन विभागालाही स्पष्ट सूचना करण्यात आल्या होत्या.

### खासगी कारचालकांनी पुकारला एल्गार

● पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहरात सध्या सुमारे दीड लाख खासगी कार आहेत, या कारचालकांचा व्यवसाय यापूर्वी अगदी समाधानाने सुरु होता. मात्र; ओला आणि उबेर या बड्या कंपन्यांनी या व्यवसायात शिरकाव केल्यामुळे या चालकांवर आणि मालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्याकडे या संघटनांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधकांशी संपर्क साधला होता. परंतु त्यांची कैफियत कोणीच न ऐकल्याने आजपासून ( बुधवार) या कारचालकांनी एल्गार पुकारत बेमुदत बंदची हाक दिली आहे.



"बहुतांशी कारचालक हे उच्चशिक्षित आहेत, तरीही त्यांना नोकरी मिळत नाही. त्यांना नोकरी देण्यासाठी सर्वच शासने आणि राज्यकर्ते अपयशी ठरले आहेत, त्यामुळे हजारो कारचालकांवर उपासमारीची वेळ आली आहे."

— **आप्पा तोडकर,** प्रदेश कार्याध्यक्ष, जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्था



"व्याजाने पैसे काढून आणि कर्जे काढून या तरुणांनी पोटाची खळगी भरण्यासाठी या कार घेतल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे. त्यातच या बड्या कंपन्यांनी पैशाच्या बळावर या तरुणांचा व्यवसायच हायजॅक केला आहे, हा प्रकार माणुसकीला काळीमा फासणारा आहे.त्यामुळे त्यांना धडा शिकविण्याठीच कारचालकांनी संघटीत होउन हा निर्णय घेतला असून आमचा हक्क मिळविल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही."

— **डॉ. केशव क्षीरसागर,** संस्थापक अध्यक्ष, बघतोय रिक्षावाला संघटना

# पाटबंधारे रोखणार अतिरिक्त 'पाण्याचा पाट'

## जलसंपदा विभागाचा पाणीपुरवठा विभागात हस्तक्षेप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

» पाणीपुरवठा

**पुणे :** जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने कान टोचल्यानंतर आता पाटबंधारे विभागानेच महापालिकेचा अतिरिक्त पाणीपुरवठा रोखण्यासाठी कडक भूमिका घेतली आहे. त्यासाठी खडकवासला धरणाखालील ज्या पंपगृहातून शहरासाठी पाणी सोडले जाते, त्याचेच नियंत्रण जलसंपदा विभागाला देण्याची सूचना पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने महापालिकेला पत्राद्वारे केली आहे. तसेच, पंपगृहात नक्की किती पाणी सोडले जाते, हे तपासण्यासाठी बसविण्यात आलेले मीटर सद्य:स्थितीला बंद असून, तेही तातडीने दुरुस्त करावे, असेही पाटबंधारे विभागाने महापालिकेला कळविले आहे.

महापालिकेकडून पुणेकरांना केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यावर आता जलसंपदा विभागाला नियंत्रण ठेवायचे आहे. मंजूर केलेल्या कोट्यापेक्षा महापालिका अतिरिक्त पाण्याचा वापर करीत असल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ताशेरे ओढल्यानंतर खडकवासला धरणाखालील पंपगृहाचे नियंत्रण जलसंपदा विभागाकडे हस्तांतरित करावे, अशी सूचना पाटबंधारे विभागाने थेट महापालिकेला केली आहे. त्यावर आता महापालिका काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पुणे शहराला खडकवासला धरणसाखळीतून पाणीपुरवठा होतो. पाटबंधारे विभागाने त्यासाठी गतवर्षी महापालिकेला लोकसंख्येनुसार १२.४२ टीएमसी इतका पाणीसाठा मंजूर केला आहे. मात्र, महापालिकेकडून प्रत्यक्षात २१ टीएमसी इतके पाणी उचलण्यात आले आहे. पाण्याच्या या अतिरिक्त वापराबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने महापालिकेवर ताशेरे ओढले होते.

### समाविष्ट गावांचे काय?

● शहराला यापूर्वीच्या लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा करण्यात येत आहे, हे वास्तव असले तरीही महापालिकेच्या हद्दीत नव्याने गावे समाविष्ट झाली आहेत. ही गावे समाविष्ट झाल्यानंतर पाटबंधारे आणि जलसंपदा विभागाने हा अतिरिक्त पाणीसाठा वाढवून देण्याच्या संदर्भात निर्णय घेण्याची आवश्यकता होती, विशेष म्हणजे त्यासाठी मोठा कालावधी उलटूनही अद्याप त्यासंदर्भात या दोन्ही विभागांनी आतापर्यंत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

# नव्या वर्षात ३ लाख प्रवाशांना दिलासा

## फेब्रुवारीमध्ये ४०० नवीन सीएनजी बस 'पीएमपी'च्या ताफ्यात दाखल होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** फेब्रुवारीमध्ये ४०० नवीन सीएनजी बस 'पीएमपी'च्या ताफ्यात दाखल होणार आहेत. त्यामुळे प्रवास सुरळीत होण्यास मदत होणार आहे. यातून दररोज सुमारे तीन लाख प्रवाशांची वाहतूक होईल.पु णे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपी) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक संस्थेच्या (सीआयआरटी) अधिकाऱ्यांनी 'सीएनजी'वर धावणाऱ्या बसच्या प्रतिकृतीची (प्रोटोटाइप) पाहणी केली असून, त्याच्या उत्पादनाला मंजुरी दिली आहे. लवकरच बसच्या उत्पादनाला सुरुवात होईल.

'पीएमपी'मध्ये गेल्या काही दिवसांपासून नवीन बसचा प्रश्न रेंगाळला होता. संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळूनही बसखरेदीला उशीर झाला. त्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेचे कारण सांगण्यात आले. आता नवीन बस खरेदीला गती प्राप्त झाली आहे.

नुकतेच 'सीआयआरटी' व 'पीएमपी'च्या अधिकाऱ्यांनी एकत्रित नवीन बसच्या प्रोटोटाइपची पाहणी केली. त्याबद्दल दोन्ही संस्था सकारात्मक असून, लवकरच उत्पादनास सुरुवात होणार आहे. फेब्रुवारीमध्ये ४०० बस 'पीएमपी'च्या ताफ्यात दाखल होतील, असे नियोजन केले आहे.

पुण्यात 'बीआरटी'चे अंतर कमी होत असताना 'बीआरटी' मार्गातून धावणाऱ्या बसची संख्या वाढणार आहे. त्यांची रचना 'बीआरटी' थांब्यानुसार असणार आहे.

"पहिल्या टप्प्यात भाडेतत्त्वावरील ४०० बस दाखल होतील. दुसऱ्या टप्प्यात स्वमालकीच्या २०० बस दाखल होणार आहेत. दोन्ही बस 'सीएनजी'वर धावतील. बसची संख्या वाढल्याने पीएमपीची प्रवासी सेवा अधिक चांगली होण्यास मदत मिळेल."

— **नितीन नार्वेकर,** सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपी

### नूमवि मुलींच्या शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण प्रसारक मंडळीच्या नू.म.वि. मुलींची प्रशाला आणि कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या वेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य पराग ठाकूर, मुलांच्या प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश कांबळे, शि. प्र. मंडळींच्या मुलींच्या शिशू प्रशालेच्या मुख्याध्यापिका जयश्री एडगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्याध्यापिका संगीता कांबळे यांनी प्रास्ताविक केले. ऋतुजा भाले यांनी सूत्रसंचालन केले. उपमुख्याध्यापिका उल्का पाटणे यांनी आभार मानले.

# विमानतळावरील खर्चाची कोटीच्या कोटी 'उड्डाणे'...!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विमानतळ रहाणार कि नाही हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. काही दिवसांत हवाईदलाची १३ एकर जमीन विमानतळ प्राधिकरणाला मिळणार आहे. त्यामुळे आतापर्यंत खर्चिलेल्या ६५० कोटींचे काय होणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण लोहगाव विमानतळावरील नागरी विमानांची वाहतूक बंद झाल्यानंतरच पुरंदर विमानतळाला परवानगी देण्याची अट संरक्षण मंत्रालयाने घातली आहे. मात्र विकासकामांसाठी आतापर्यंत ६५० कोटी रुपये खर्च केले आहेत. शिवाय धावपट्टीच्या विस्तारासाठी 'ओएलएस' सर्व्हेला परवानगीही दिली आहे.

लोहगाव विमानतळ हे देशातील महत्त्वाच्या विमानतळांपैकी एक आहे. प्रवासी सुविधा व संख्येत हे विमानतळ देशात नवव्यास्थानी आहे. दररोज ९७ हून अधिक उड्डाणे तर १९४ हून अधिक विमानांची वाहतूक येथून होते. त्यामुळे विमानतळ विस्तारीकरणासाठी मोठ्या वेगाने पावले पडत आहेत.

### अशी आहे लोहगाव विमानतळाची स्थिती


- **१९४ :** दैनंदिन विमानांची वाहतूक
- **३१ हजार :** दैनंदिन प्रवासी संख्या
- **१० :** पार्किंगची ठिकाणे
- **१० :** एरोब्रिज
- **२ :** प्रवाशांसाठी टर्मिनल
- **कार्गो टर्मिनल :** मालवाहतुकीसाठी सुविधा
- **मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील** मिसिंग लिंकचे काम 90 टक्के पूर्ण; सर्वाधिक उंच केबल ब्रिजवर...
- **प्रस्तावित कामे...**
- 'पार्किंग बे'ची संख्या वाढविणे
- 'रिमोट बे'ची निर्मिती
- धावपट्टीचे विस्तारीकरण
- नवीन कार्गो टर्मिनल
- जुने व नवीन टर्मिनल एकमेकांना जोडणे

### पादचारी दिनाच्या तयारीसाठी ४७ लाख

**पुणे :** पादचारी दिनाच्या तयारीसाठी आणि कार्यक्रमासाठी ४७ लाख रुपयांचा खर्च येणार आहे. त्यासाठीची निविदा मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर सादर करण्यात आली आहे. पादचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे, नागरिकांनी आवश्यक तेथे वाहनांऐवजी चालत जाण्यास प्राधान्य द्यावे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा, शालेय मुलांमध्ये पादचाऱ्यांच्या अधिकाराबाबत जनजागृती व्हावी, अशा उद्देशांनी दरवर्षी ११ डिसेंबर रोजी हा दिन साजरा केला जातो. त्या दिवशी लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी बंद करून केवळ पादचाऱ्यांसाठी खुला असतो. तेथे विविध खेळ, पथनाट्ये, गायन, वादन, जनजागृतीपर कार्यक्रम होतात. पादचारी दिनानिमित्त डांबरीकरण, पादचारी मार्गाची दुरुस्ती, सुशोभीकरण, लोखंडी रेलिंगला रंगकाम, मांडव अशी विविध कामे केली जातात.

### झोंबतो गारवा...!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** गेल्या काही दिवसांपासून गायब झालेल्या गुलाबी थंडीची पुन्हा चाहूल लागत आहे. या गुलाबी थंडीमुळे आणि दाट धुक्यामुळे शहरातील वातावरण प्रसन्नमय झाले आहे.

### आंबट-गोड बोरांचा हंगाम सुरू

**पुणे :** आंबट-गोड बोरांचा हंगाम सुरू झाला आहे. मार्केटयार्डातील फळबाजारात होणारी बोरांची आवक मागील आठवड्याच्या तुलनेत २० टक्क्यांनी वाढली आहे. आवक आणखी वाढत जाणार असल्याची माहिती व्यापारी रवींद्र शहा यांनी दिली.

बोरांची आवक सुरू झाली आहे. सुरूवातीला तुरळक असणारी आवक आता वाढली आहे. मार्च अखेरपर्यंत ही आवक सुरू राहणार आहे. मार्केट यार्डातील फळ बाजारात दररोज दोन ते अडीच हजार पोती आवक होत आहे. सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यांसह राजस्थान येथून आवक होत आहे. सध्या ढगाळ वातावरणामुळे उत्पादन अधिक झाले आहे. या बोरांना शहर आणि उपनगरांतील विक्रेत्यांसह पाचगणी, महाबळेश्वर, लोणावळा, कोकणासह पर्यटनस्थळांच्या ठिकाणांणाहून मागणी आहे.

# स्पर्धा परीक्षांचे पदवीधर आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात सरकारी नोकरीसाठी उच्चशिक्षण घेतलेल्यांना धक्का बसला आहे. वनविभागातर्फे वनसेवक पदासाठी परिपत्रक काढण्यात आले असून, त्यात केवळ दहावी-बारावी उत्तीर्ण असलेल्यांना संधी दिली आहे. त्यापेक्षा अधिक पात्रता असलेल्यांना सहभागी होता येणार नाही, हा पदवीधरांवर अन्याय असल्याचा आरोप स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पत्रकार परिषदेत सोमवारी केला.

महाराष्ट्र राज्याच्या वतीने ५ डिसेंबर रोजी एक परिपत्रक काढण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारच्या नव्या परिपत्रकामुळे राज्यभरातील विद्यार्थी आणि बेरोजगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सरकारने वनविभागातील गट-ड श्रेणीच्या १२,९९१ पदांची भरती जाहीर केली असून, या पदांसाठी अर्जदारांची शैक्षणिक पात्रता ही फक्त दहावी ते बारावी इतकीच असावी, अशी अट घातली आहे. यामुळे उच्चशिक्षण घेतलेले उमेदवार या भरतीसाठी पात्र ठरणार नाहीत. परिणामी उच्चशिक्षण घेतलेले लाखो युवक-युवतींचे स्वप्न भंग झाले आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे राज्यभर संभ्रम आणि नाराजीचे वातावरण आहे. एकीकडे सरकार शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देत असल्याचा दावा करते, तर दुसरीकडे उच्चशिक्षण घेतलेल्यांना सरकारी नोकरीच्या संधीपासून वंचित ठेवत आहे. यामुळे विद्यार्थी आणि बेरोजगारांमध्ये असंतोष पसरला आहे.

# नवे 'कारभारी'च घेणार भाडेवाढीचे 'पालकत्व'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

» बस भाडे वाढ

**पुणे :** सध्या पीएमपीएल बसच्या भाडे वाढीची चर्चा जोरदार सुरू आहे. पीएमपीएमएल कंपनीच्या संचलन तुटीमध्ये दरवर्षी वाढ होत असल्याने ती भरून काढण्यासाठी तिकीटदरात वाढ करण्याचे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या विचाराधीन आहे. मात्र, याबाबतचा अंतिम निर्णय नवीन पालकमंत्र्यांच्या बैठकीनंतरच घेतला जाणार आहे. आता भाडे वाढीचा चेंडू नवीन पालक मंत्र्यांच्या कोर्ट गेला आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड पालिकेच्या हद्दीसह पीएमआरडीएच्या हद्दीमध्ये पीएमपीएमएलकडून बससेवा पुरविली जाते. त्यामुळे बसच्या खर्चाचा भार पीएमआरडीएनेही उचलावा, असा निर्णय तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. या निर्णयानंतर शासनाच्या नगरविकास विभागाने पीएमआरडीएच्या हिश्याचे ११८ कोटी रुपये एकदाच भरले. त्यानंतर पीएमपीएमएलने संचलन तुटीपोटी पीएमआरडीएकडे २२२ कोटींची मागणी केली. मात्र, ही रक्कम भरली जात नाही. त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेवर संचलन तुटीचा भार पडत आहे.

# पुण्यात अद्यापही ५१ हजार बहिणी 'नावडत्या'...!

सामाजिक

**पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ५० हजार ५५६ महिला 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या प्रतिक्षेत असून, ५१ हजार २५४ महिलांचे अर्ज विविध कारणांसाठी फेटाळण्यात आले आहेत. अपात्र असूनही लाभ मिळवत असल्याच्या तक्रारी मात्र अद्याप प्राप्त झालेल्या नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारकडून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच ही योजना राबविण्यात येत असल्याची टीकाही महायुती सरकारवर झाली. मात्र, अल्पावधीतच योजना लोकप्रिय ठरल्याने महायुतीच्या निवडणूक प्रचारात ही योजना केंद्रस्थानी राहिली होती.

या योजनेंतर्गत जिल्ह्यातील २१ लाख ११ हजार ८८७ महिलांनी जिल्हा प्रशासनाकडे अर्ज केले होते.



"प्रलंबित अर्जांची छाननी सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रतीक्षेत असलेल्या महिलांनाही लवकरच लाभ मिळू शकणार आहे. खोटी कागदपत्रे सादर करून फसवणूक केल्याची अद्याप कोणतीही तक्रार आलेली नाही.."

—**मनीषा बिरारीस,** जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी

### पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वाधिक अर्ज बाद

● दरम्यान, पिंपरी-चिंचवडमधून ४ लाख ३२ हजार ८९० महिलांनी अर्ज भरला. त्यांपैकी ३ लाख ८९ हजार ९२० महिला लाडक्या ठरल्या. ४२ हजार ४८६ अर्ज बाद झाले आहेत. रहाटणी येथील 'ड' क्षेत्रीय कार्यालय परिसरातील सर्वाधिक ६५ हजार ८७१ महिला योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. पांजरपोळ, भोसरी येथील 'ई' क्षेत्रीय कार्यालयात ६३ हजार १०६ आणि थेरगाव येथील 'ग' क्षेत्रीय कार्यालयात ६० हजार ३३ महिला लाभार्थी आहेत.

त्यांपैकी २० लाख ४८ हजार २९५ महिला योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. त्यांपैकी पुणे शहर आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ८ हजार ७६८ महिलांना कागदपत्रांची पूर्तता करता आलेली नाही किंवा त्या अन्य सरकारी योजनेचा लाभ घेत असल्याने त्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. ४ हजार २६८ अर्ज तात्पुरते बाद करण्यात आले आहेत. मात्र, त्यांना कागदपत्रे सादर करण्याची संधी मिळणार आहे. ५० हजार ५५६ लाडक्या बहिणी लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. प्रतीक्षेतील महिलांच्या अर्जांची तपासणी सुरू झाली आहे. त्यांतील पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

## प्रमुख रस्त्यांचे काँक्रिटीकरण रखडले, नागरिकांना धुळीचा त्रास

# ठेकेदाराला दंड, तरीही कामाला 'गतीरोधक'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रस्त्यांची स्थिती सुधारणार म्हणून महापालिकेच्या पथ विभागाने मोठा गाजावाजा करत प्रमुख रस्त्यांचे काँक्रिटीकरण सुरू केले. पण आता वर्ष होत आले तरी महापालिकेला व ठेकेदाराला हे काम पूर्ण करता आलेले नाही. ट्रेझर पार्क ते मित्रमंडळ चौक, त्रिमूर्ती चौक ते राजमाता अहिल्यादेवी होळकर पूल रस्त्याचे काम रखडले आहे. ठेकेदाराला दंड करूनही कामाची गती वाढत नसल्याने अपूर्ण काम, उडणारी धुळ, वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

दोन वर्षांपूर्वी महापालिकेने शहरातील रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी म्हणून ३०० कोटी रुपयांच्या निविदा काढल्या होत्या. सहा पॅकेजमधून १०० किलोमीटर रस्त्यांच्या डांबरीकरण व काँक्रिटीकरणाची कामे केली जाणार होती. पॅकेज एकमध्ये काँक्रिटीकरणासाठी ६५ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली होती. त्यामध्ये आठ रस्त्यांचा समावेश होता. त्यामध्ये सातारा रस्त्याला समांतर असणारा ट्रेझर पार्क ते मित्रमंडळ चौक हा सुमारे १९०० मिटर लांबीचा रस्ता आणि भारती विद्यापीठाच्या मागचा त्रिमूर्ती चौक ते राजमाता अहिल्यादेवी होळकर पूल या रस्त्याचा समावेश आहे. हा रस्ता कात्रज देहूरोड बाह्यवळण मार्गाला जोडतो.

दक्षीण पुण्यातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी हे दोन्ही रस्ते महत्त्वाचे आहेत. त्यामुळे महापालिकेने या रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न कायमचा संपावा, तसेच सांडपाणी वाहिनी, पावसाळी गटार, जलवाहिनी रस्त्याच्या बाजूला स्थलांतरित होऊन वाहतूक सुरळीत करण्यासाठी म्हणून हे काम फेब्रुवारी २०२४ मध्ये हाती घेण्यात आले. ही दोन्ही कामे संपण्याची मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत आहे. गेल्या तीन-चार महिन्यांपासून या दोन्ही ठिकाणचे काम जवळपास ठप्पच झालेले आहे. उर्वरित साडेतीन महिन्यांत ५० टक्के काम पूर्ण करण्याचे आव्हान महापालिकेपुढे आहे.

### वाहतूक पोलिसांकडून मिळेना परवानगी

कात्रज येथील होळकर पूल येथील काम करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून लवकर परवानगी मिळत नाही. त्यातच कात्रज चौकात उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे त्रिमूर्ती चौक ते होळकर पूल या रस्त्यावर आत्ताच काम करता येणार नाही अशी भूमिका पोलिसांनी घेतली आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. पण या रस्त्याची एक बाजू पूर्ण झाली आहे. रस्त्यातील सेवा वाहिन्या बाजूला काढणे व नव्या सेवा वाहिन्या टाकण्याचे कामही पूर्ण झाले आहे. त्यामुळे दुसरी बाजूही लवकर पूर्ण होऊ शकते. पण आता कात्रज चौकातील पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरच या रस्त्याचे काम सुरू होणार आहे.

ट्रेझर पार्क ते मित्रमंडळ चौकासाठी २० कोटी रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. या रस्त्याचे काम ५० टक्क्याच्या जवळपास पूर्ण झाले आहे. पण गणेशोत्सव, नवरात्र त्यानंतर दिवाळी असल्याने रस्त्यावर काम नको. रस्ता मोकळा ठेवा, वाहतूक कोंडी नको, अशा सूचना स्थानिक नागरिकांनी केल्याने काम बंद ठेवावे लागले होते. तसेच काही राजकीय पुढारीही ठेकेदाराची अडवणूक करत असल्याने कामात अडथळे निर्माण झाले आहेत.

या दोन्ही ठिकाणचे काम ठेकेदारांनी संथ गतीने सुरू ठेवल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे ठेकेदाराला वेगात काम करण्याच्या सूचना महापालिकेने दिलेल्या होत्या. तरीही कामात सुधारणा न झाल्याने ट्रेझर पार्क ते मित्र मंडळ चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराला एक लाखाचा दंड केला आहे. तर त्रिमूर्ती चौक ते होळकर भुयारी मार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदाराला ३० हजाराचा दंड केला आहे.



> **वाहतूक पोलिसांकडून मिळेना परवानगी**
>
> ● कात्रज येथील होळकर पूल येथील काम करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून लवकर परवानगी मिळत नाही. त्यातच कात्रज चौकात उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे त्रिमूर्ती चौक ते होळकर पूल या रस्त्यावर आत्ताच काम करता येणार नाही अशी भूमिका पोलिसांनी घेतली आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. पण या रस्त्याची एक बाजू पूर्ण झाली आहे. रस्त्यातील सेवा वाहिन्या बाजूला काढणे व नव्या सेवा वाहिन्या टाकण्याचे कामही पूर्ण झाले आहे. त्यामुळे दुसरी बाजूही लवकर पूर्ण होऊ शकते. पण आता कात्रज चौकातील पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरच या रस्त्याचे काम सुरू होणार आहे.

> ट्रेझर पार्क ते मित्रमंडळ चौक आणि त्रिमूर्ती चौक ते राजमाता होळकर भुयारी मार्ग या दोन्ही रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू केले आहे. पण हे काम करताना स्थानिक नागरिक, पोलिसांची परवानगी, सेवा वाहिन्या स्थलांतरित करणे यासह अन्य अडथळे आल्याने कामाची गती कमी झाली आहे. तसेच नागरिकांना त्रास होत असल्याने ठेकेदाराला दंडात्मक शिक्षाही करण्यात आलेली आहे. ३१ मार्चपर्यंत या कामाची मुदत आहे. येणाऱ्या काळात काम वेगात पूर्ण केले जाईल."
>
> — अनिरुद्ध पावसकर, प्रमुख, पथ विभाग

## » Selected



### मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या प्रमुखपदी रामेश्वर नाईक

**पुणे :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच पदभार स्वीकारल्यानंतर सर्वसामान्य गोरगरीब रुग्णांच्या मदतीसाठी स्थापन केलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख म्हणून आजच श्री. रामेश्वर नाईक यांची निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख पदी रामेश्वर नाईक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी त्यांचे सत्कार करून अभिनंदन केले.यावेळी बोलताना उमेश चव्हाण म्हणाले कि, गेली अनेक वर्षे सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा मोफत मिळाव्यात म्हणून संघर्ष करणारा कार्यकर्ता अशी रामेश्वर नाईक यांची ओळख आहे. गेली अनेक वर्ष त्यांनी सर्वसामान्य रुग्णांना उपचारांसाठी मदत मिळवून दिली आहे. 'सर्वसामान्य कार्यकर्ता ते मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचा प्रमुख' ही वाटचाल प्रेरणादायी आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख म्हणून नाईक यांची केलेली निवड अत्यंत योग्य व सार्थ अशी आहे.याप्रसंगी विश्वशांती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रतीक कांबळे, रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहराध्यक्ष सौ. अपर्णा मारणे साठ्ये, परिषदेचे केंद्रीय कार्यालय प्रमुख दिलीप साळुंके सह पदाधिकारी उपस्थित होते.


# पराभूत उमेदवारांची आता याचिका दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता आणखी एक पाऊल उचलून महाविकास आघाडीच्या पुण्यातील पराभूत उमेदवारांनी ईव्हीएमविरोधात सुप्रीम कोर्टामध्ये याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.पुणे जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या ११ उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीच्या निर्णयाविरोधात ईव्हीएम मशीनची पडताळणी आणि मोजणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज केला आहे. या मोजणीसाठी आवश्यक असणारे शुल्कदेखील भरले आहे. निवडणूक आयोगाकडून त्यांना ४५ दिवसांमध्ये पडताळणीची तारीख निश्चित करून दिली जाणार आहे.

माञ, केवळ याच मुद्द्यावर थांबून न राहता, महाविकास आघाडीच्या पराभूत उमेदवारांनी सुप्रीम कोर्टामध्ये जाण्याचा निर्णय घेतला असून, त्यांनी न्यायालयीन प्रक्रियादेखील सुरू केली आहे. यामध्ये प्रशांत जगताप, संजय जगताप, अशोक पवार, सचिन दोडके, अश्विनी कदम, राहुल कलाटे हे दिल्लीत दाखल झाले आहेत, तर रमेश बागवे, दत्ता बहिरट, रवींद्र धंगेकर आणि रमेश थोरात हे उद्या दिल्लीत पोहोचतील, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीमध्ये पुणे जिल्ह्यात महाविकास आघाडीला अवघ्या दोन जागा जिंकता आल्या. या निकालावर शंका घेत पराभूत उमेदवारांनी आव्हान दिले आहे.

उद्या दिल्लीमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांची सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांच्याशी चर्चा होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मतांची पडताळणी करताना व्हीव्हीपॅटमधील मते मोजली जावीत. निवडणूक यंत्रणेकडून निवडलेले मतदान यंत्र व शॉर्ट करून त्याचा 'मॉक पोल' घेण्यासंदर्भात सांगितले जात आहे. त्यामुळे या प्रक्रियेविरोधात आणि ईव्हीएमविरोधातही सर्वोच्च न्यायालयात आम्ही गेलेलो आहोत, असे हडपसर मतदारसंघाचे उमेदवार प्रशांत जगताप यांनी सांगितले.



» निवडणूक

> निवडणूक यंत्रणेकडून निवडलेले मतदान यंत्र व शॉर्ट करून त्याचा 'मॉक पोल' घेण्यासंदर्भात सांगितले जात आहे. त्यामुळे या प्रक्रियेविरोधात आणि ईव्हीएमविरोधातही सर्वोच्च न्यायालयात आम्ही गेलेलो आहोत."
>
> — प्रशांत जगताप, पराभूत उमेदवार, हडपसर विधानसभा

# माझे निलंबन तातडीने मागे घ्यावे

## काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींकडे आबा बागुल यांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकेकाळी काँग्रेस पक्षाचा बालेकिला असलेल्या पर्वती विधानसभा मतदारसंघात आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर होत असल्याने नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडणूक लढविणाऱ्या माजी उपमहापौर आबा बागुल यांच्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनाच उभारी मिळाली शिवाय काँग्रेस विचारधारेच्या मतदारांची 'व्होट बँक'ही राखता आली. त्यामुळे कोणतेही पत्र न देता आणि म्हणणे ऐकून न घेता पक्षातून निलंबन केले असल्यास ते तातडीने मागे घ्यावे आणि काँग्रेस पक्षाचाच कार्यकर्ता असल्याचे पत्र द्यावे अशी मागणी माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.

यासंदर्भात आबा बागुल यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रशासन व संघटक उपाध्यक्ष नाना गावंडे यांच्यासह निरीक्षक रमेश चेन्निथला, प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व नेत्यांना पत्र पाठवले आहे.

> **शिस्तभंग नाहीच- बागुल**
>
> ● भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या घटनेमध्ये व कायदा यामधील तरतुदींचा कोणताही विचार न होता मला नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार माझे खरे व योग्य म्हणणे ऐकून न घेता तसेच कोणतेही लेखी अथवा तोंडी खुलासा करण्याची संधी न देता तसेच मला पक्षातर्फे अधिकृतरित्या कोणतीही निलंबनाची नोटीस आजमितीपर्यंत कोणत्याही मार्गाने व कशाही प्रकारे अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नसताना निलंबनाची माहिती प्रसार माध्यमांद्वारे समजली आहे. या कारणामुळे माझे पक्षाने निलंबन केले असल्यास ते तातडीने मागे घेऊन मला काँग्रेस पक्षाचाच कार्यकर्ता असल्याचे पत्र द्यावे असेही आबा बागुल यांनी पत्रात नमूद केले आहे.

> एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या मतदारसंघात काँग्रेस पक्ष नावालाही राहणार नाही. या कारणामुळे केवळ नाईलाजाने काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते कायमस्वरूपी पक्षासमवेत राहावेत व काँग्रेसचे मतदार जपले जावेत या हेतूने मी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरलेला होता."
>
> — आबा बागुल, माजी उपमहापौर

### सहकारनगरमध्ये २० ते २५ गुंडांचा हैदोस, तिघांना अटक

**धनकवडी :** कोणाचा तरी गेम करण्यासाठी आलेले असताना तो न मिळाल्याने आम्ही इथले भाई आहोत, असे म्हणत टोळक्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिक्षा, कार यांच्या काचा फोडून सहकारनगर परिसरात दहशत माजवली. याबाबत श्रीरंग ज्ञानोबा शेलार (वय ५०, रा. हिलटॉप सोसायटी, धनकवडी) यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सौरभ ओतारी, सुमित दिघे (दोघे रा. धनकवडी) यांच्यासह तिघांना अटक केली आहे. तसेच त्यांच्या २० ते २५ साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार सावरकर चौकातील हिल टॉप सोसायटी रोडवर रविवारी रात्री पावणे दहा वाजता घडला.

# वडगाव बुद्रुकमध्ये नवजात बालकाला रस्त्यावर फेकले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एका नवजात बालकाला जन्म देऊन आईने चक्क रस्त्यावर सोडून दिल्याचा प्रकार समोर आला आहे. पुण्यातील वडगाव बुद्रुक परिसरातील रेणुका नगरीमधील ही घटना असून स्थानिक व पोलिसांच्या मदतीने या बालकास रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटेनंतर स्थानिकानी नवजात बालकाबद्दल हळहळ व्यक्त करत भावना व्यक्त केल्या.

या नवजात शिशुचा रडण्याचा आवाज येऊ नये म्हणून चिमुकल्या बालकाच्या तोंडावर चक्क प्लास्टिकची पिशवी बांधण्यात आली होती. सोमवारी रात्री बाळाचा रडण्याचा आवाज ऐकून आजूबाजूच्या लोकांनी सिंहगड पोलिसांना संपर्क केला. त्यानंतर, सिंहगड पोलिसांनी नवजात बाळाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. सध्या बालकाची तब्बेत स्थिर आहे. माञ, इवल्याश्या बाळाला सोडून पसार होणाऱ्या व्यक्तीबद्दल तीव्र संतापाची भावना स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. याप्रकरणी, अज्ञात व्यक्ती विरोधात सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नवजात बालकाच्या पालकांचा शोध देखील सिंहगड पोलीस घेत आहेत.

दरम्यान, हे बाळ अनैतिक संबंधातून जन्माला आल्याने अशा प्रकारचे कृत्य घडले आहे का याचाही पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. तर परिसरातील रुग्णालयात नुकतेच जन्मलेल्या रुग्णालयातील बालकांची माहिती घेऊनही पोलिसांचा त्या दृष्टीने तपास सुरू आहे.





### दिव्यांग कार्यकर्त्यांकडून धर्मेंद्र सातव यांची लाडूतुला

**वाघोली :** येथील सर्वसामान्य दिव्यांग कार्यकर्ता धर्मेंद्र सातव यांनी शून्यातून दिव्यांगांसाठी केलेल्या अविस्मरणीय कामगिरीबद्दल त्यांची नुकतीच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी धर्मेंद्र सातव पाटील यांची निवड झाल्याबद्दल शिरूर तालुका प्रहार संघटनेच्या वतीने धर्मेंद्र सातव यांची लाडू तुला करण्यात आली.कार्यक्रमाचे आयोजन शिरूर तालुका अध्यक्ष सुरेश पाटील व महिला अध्यक्ष ज्योती हिवरे यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जिल्हाध्यक्ष शरद जाधव, जिल्हा महिला अध्यक्ष अनिता कदम, पुणे शहराध्यक्ष विष्णू अण्णा गुंडाळ,जिल्हा उपाध्यक्ष उज्वला गाडेकर, खेड तालुका अध्यक्ष जिवन टोपे, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष दिवेकर.जिल्हा संघटक शरद दिवेकर,निश्चित बाबा, कचरू आखूटे, सोमनाथ ढगे, तालुका उपाध्यक्ष संजय सोनवणे, जयश्री लगड, माया फलके, शोभा दुधाडे, सागर सारंगधर, चित्रा मेरगळ, सुरेश डुंबरे व बहुसंख्य दिव्यांग बांधव उपस्थित होते.




### अली दारुवाला 'वन इंडिया' पुरस्काराने सन्मानित

**पुणे :** भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते अली दारूवाला यांना 'वन इंडिया' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संघ प्रचारक आणि भाजप नेते सुनील देवधर यांनी स्थापन केलेल्या 'माय होम इंडिया' संस्थेच्या वतीने विले पार्ले येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल पी. सी. राधाकृष्णन आणि भाजपा नेत्या माधवी लता यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास, एकात्मता आणि राष्ट्र बांधणीसंबंधीच्या योजना अल्पसंख्याक समुदायांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला आहे. या कार्यक्रमाला सुनील देवधर यांच्यासह देशभरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना अली दारूवाला म्हणाले, *"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची धोरणे राष्ट्रहिताची असून देशाला जागतिक स्तरावर पुढे नेणारी आहेत. या कार्यात आम्ही आमचे योगदान देत राहू. राष्ट्रीय मुख्य प्रवाहात अल्पसंख्याक समुदाय सामील झाल्यास राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल."

# जनतेच्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार - आ. रासने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान संपूर्ण पुणे शहराचे लक्ष कसबा विधानसभा मतदारसंघावर होते. या निवडणुकीत अतिशय दैदिप्यमान असा विजय हेमंत रासने यांनी मिळवला आहे. या विजयानंतर रासने यांनी मतदारांचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने आभार मानण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

रासने यांनी मतदारसंघातील सर्व मतदारांना पेढ्याचे वाटप केले असून एक पत्रकाच्या माध्यमातून मतदारांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. रासने यांची आभार व्यक्त करण्याची ही शैली मतदारांना चांगलीच भावली असून मतदारांकडून रासने यांचे कौतुक केले जात आहे. निवडून आल्यानंतर अनेकदा नेते मंडळी संपर्कात राहत नाहीत असे दिसून येते मात्र रासने यांनी आपल्या कृतीतून रासने यांनी खऱ्या अर्थाने ते जनतेचे आमदार असल्याचे दाखवून दिल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

हा विजय मिळवून हेमंत रासने थांबलेले नसून दुसऱ्या दिवसापासून त्यांनी कामाला देखील सुरुवात केली आहे. कचरामुक्त कसबा करण्याचा त्यांनी संकल्प केला असून पालिकेच्या अधिकाऱ्यांना आणि जनतेला सोबत घेत हे एकप्रकारे अभियानच त्यांनी सुरु केले आहे. याशिवाय मतदारसंघातील अनेक नागरिकांच्या ट्राफिक मुक्त कसबा करण्यासाठी तसेच पाण्याच्या बाबतीत असणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी देखील त्यांनी प्रयत्न सुरु केले आहेत. नागरिकांना येणाऱ्या सर्व प्राथमिक अडचणी सोडवण्यावर भर देणार आहेत.





> कसबा मतदारसंघातील पाणीपुरवठा सुरळीत करणे, कचऱ्याची समस्या दूर करून स्वच्छ कसबा करण्यासाठी मी सर्वशक्तीनिशी प्रयत्न करेन. ट्राफिक मुक्त कसबा करण्यासाठी देखील आम्ही पूर्ण ताकतीने प्रयत्न करणार आहोत. "
>
> — आमदार हेमंत रासने आमदार कसबा

## एमआयटी'तर्फे सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान

# विद्यार्थ्यांचा संस्कारानेच व्यक्तिमत्व विकास : डॉ. चंद्रकात दळवी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "वाचन, सामान्य ज्ञान, उत्तम संवाद कौशल्य, ऐकण्यची कला आणि आपला दैनंदिन व्यवहार हे जीवनात महत्वाचे असून त्यातूनच उत्तम संस्कारयुक्त व्यक्तिमत्वची ओळख होत असते.," असे विचार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत दळवी यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे या संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या 'वैश्विक मूल्याधिष्ठित शिक्षण व यशस्वी व्यक्तिमत्त्व विकास प्रमाणपत्र परीक्षा-२०२४'मधील सुवर्णपदक विजेत्या, सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा माईर्स एमआयटीच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित सोहळ्यात त्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी बालभारतीचे अध्यक्ष कृष्णकुमार पाटील हे पाहुणे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. तसेच वैश्विक मूल्याधिष्ठित शिक्षण व यशस्वी व्यक्तिमत्त्व विकास प्रमाणपत्र परीक्षेचे प्रमुख समन्वयक डॉ. एस. एन. पठाण हे होते.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले," चारित्र्यसंवर्धन आणि जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी या वैश्विक मूल्यांचा आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा प्रसार करण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांनी शारीरिकदृष्ट्या सक्षम, बौद्धिकदृष्ट्या कुशाग्र, आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत आणि नैतिकदृष्ट्या चारित्र्यसंपन्न आणि शिस्तप्रिय असावे.

> " लहान वयातच मूल्ये रुजवणे महत्वाचे आहे. मूल्ये माणासाला कधीच गोंधळात पडू देत नाहीत. संस्कार माणसाला आंतरिक दृष्ट्या मजबूत बनवतो. चांगले संस्कार ही चांगल्या व्यक्तिमत्वाची ओळख असते. स्वामी विवेकांनंदांची प्रेरणा घेऊन एमआयटी शिक्षण संस्थचे डॉ. विश्वनाथ दा. कराड हे वैश्विक मूल्याधारित शिक्षण देण्याचे अद्वितीय कार्य करीत आहेत. स्वतःचे व्यक्तिमत्व सुधरायचे असेल तर सर्वात प्रथम शारीरिक आरोग्य सुधारणे आद्य कर्तव्य आहे."
>
> — डॉ. चंद्रकांत दळवी, माजी विभागीय आयुक्त

**यशस्वी विद्यार्थ्यांची नावे :**

● **राज्यस्तरीय :** संस्कृती राधाकृष्ण कराड (प्रथम), महेक सत्तार शेख (विभागून द्वितीय), प्रज्ञा गोपाळ कराड(विभागून तृतीय).

● **पश्चिम विभाग :** प्रज्ञा गोपाळ कराड (प्रथम), कृतिका सचिन फत्तेपुरे (द्वितीय), आदर्श मनोहर सातपुते (तृतीय).

● **मराठवाडा विभाग :** संस्कृती राधाकृष्ण कराड(प्रथम), महेक सत्तार शेख (द्वितीय), उज्वल तात्यासाहेब पवार (तृतीय).

● **विदर्भ विभाग :** खुशी राजेश महींगे (प्रथम), जान्हवी नितीन बुरंगे (द्वितीय), पयोष्णी विजय पार्शिवकर (तृतीय).

#रा

# विरोधकांचा एल्गार

ईव्हीएम, निवडणूक आयोगाविरोधात महाविकास आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. राज्यातील महायुती सरकारच्या विशेष अधिवेशनाचा पहिला दिवस विरोधकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे गाजला. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या आमदारांनी शनिवारी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेणे टाळले. हंगामी अध्यक्षांनी काँग्रेस नेते नाना पटोले यांचे नाव पुकारताच सर्वजण सभागृहाबाहेर पडले. मतदानयंत्राद्वारे मतदानात गैरप्रकार झाल्याचा आरोप करत तसेच मतपत्रिकेच्या माध्यमातूनच निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या आमदारांनी १५ व्या विधानसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सदस्यांच्या शपथविधीवर बहिष्कार घातला. आपल्याला विधानसभा निवडणूक निकाल अमान्य आहे. तसेच ईव्हीएममध्ये गडबड आहे, असे म्हणत आघाडीतील काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या तिन्ही पक्षांतील आमदारांनी शपथविधीवर बहिष्कार टाकत सभात्याग केला. मात्र आघाडीतील समाजवादी पक्षाचे अबू आझमी आणि रईस शेख तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) पुण्यातील वडगाव-शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी आमदारकीची शपथ घेतली. त्यामुळे आघाडीत कोणताही समन्वय नसल्याचे दिसून आले. 'लोकशाही झिंदाबाद', 'आय लव्ह मारकडवाडी' असे पोस्टर झळकावत आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या आवारात घोषणाबाजी केली. विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले तरी कुठे जल्लोष नाही, मिरवणूक नाही. त्यामुळे महायुतीला जनतेने कौल दिला नसून हा ईव्हीएम व निवडणूक आयोगाचा महायुती विजयी होण्याचा आयोजित कार्यक्रम आहे. आम्ही देखील विजयी आमदार आहोत. त्यामुळे जनतेचा मान ठेवत शनिवारी शपथ न घेता शपथविधी सोहळ्यावर बहिष्कार टाकत आहोत. महायुतीला एवढे मोठे बहुमत मिळाले कसे याबाबत मारकडवाडीच्या लोकांच्या मनातही संशय आहे. त्यांनी बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला पण निवडणूक आयोग व पोलिसांनी त्याला मज्जाव केला. आघाडी मारकडवाडीतील ग्रामस्थांसोबत आहे. २०१४ पासून लोकशाही चिरडण्याचे काम सुरू आहे. या सर्वांचा निषेध म्हणून आमदारकीची शपथ घेत नाही. यापुढे लोकशाही वाचवण्यासाठी आम्ही लाँग मार्च काढणार आहोत असा इशारा शिवसेनेचे (ठाकरे गट) आमदार आदित्य ठाकरे यांनी दिला. मारकडवाडीतील काही ग्रामस्थांना अटक करण्यात आली आहे. आम्ही जिंकलो असलो तरी आज शपथ घेणार नाही. निवडणूक निकालावर महाराष्ट्राचा विश्वास नाही. मारकडवाडीने बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला. यात निवडणूक आयोगाचा काय संबंध? पोलिसांचा काय संबंध? गावाने एखादा निर्णय घेतला तर लोकशाही पद्धतीने आलेले महायुती सरकार त्यावर वरवंटा फिरवण्याचे काम करत आहे असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी लगावला. महायुती सरकार जनमताने आलेले नाही असे राज्यातील जनतेचे मत आहे. हे सरकार मते चोरून आले आहे. मारकडवाडीतील मॉक पोलिंग होऊ द्यायला हवे होते. मारकडवाडीतील लोकांचे मत, जनभावना समजून घ्यायला हवी होती असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले. ईव्हीएमविरुद्ध पुराव्यांशिवाय बोलणे अयोग्य आहे असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाला ७२ लाख मते मिळाली पण फक्त १० आमदार निवडून आले. या उलट अजित पवार गटाला ५८ लाख मते मिळाली पण त्यांचे ४१ उमेदवार निवडून आले. ८० लाख मते मिळालेल्या काँग्रेसचे १५ तर ७९ लाख मते मिळालेल्या शिवसेना शिंदे गटाचे ५७ आमदार निवडून आले हे गणित न समजण्यासारखे म्हणजेच कोड्यात टाकणारे आहे. जोपर्यंत ईव्हीएमविरुद्ध आपल्याकडे आधार नाही तोपर्यंत त्यावर भाष्य करणे योग्य नाही. मात्र मतांचे आकडे आश्चर्यकारक आहेत असे शरद पवार म्हणाले. सुप्रीम कोर्टाने ईव्हीएमविरोधातील याचिका फेटाळल्याने आता कायदेशीर अभ्यास करून कोर्टात जाणार आहोत अशी माहिती राष्ट्रवादीच्या (शप) खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याआधी एक्झिट पोलमध्ये आघाडी आणि महायुती यापैकी कुणालाही १४५ वर जागा मिळणार नाहीत असे सांगितले जात होते मात्र, प्रत्यक्षात निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीला एकहाती सत्ता स्थापन करण्याचा बहुमान मिळाला. तसेच महायुतीतील प्रमुख पक्ष भाजपला १३२ जागा मिळाल्या. यावर कोणाचाच विश्वास बसत नाही. गत काही महिन्यांत ४ राज्यांच्या निवडणुका झाल्या. छोट्या राज्यात अन्य पक्ष पण मोठ्या राज्यात विरोधी वातावरण असतानाही भाजप निवडून आला, हे कसे? असा प्रश्न साऱ्यांनाच पडला आहे. विधानसभा निवडणुकीत आघाडीला अपयश आल्यानंतर समाजवादी पक्ष आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत मिळत आहेत. महाविकास आघाडीत कोणतीही फूट पडलेली नाही असे शरद पवार यांनी म्हटले आहे. आगामी निवडणुका एकत्रपणेच लढवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे. आम्ही एकत्रपणे येणाऱ्या सर्व निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. पराभव झाल्यामुळे नाराज व्हायचे कारण नाही असे ते म्हणाले. विरोधकांच्या इंडिया आघाडीच्या कारभाराबाबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी नाराजी व्यक्त केली असली तरी संधी मिळाल्यास इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची तयारीही दाखवली आहे. त्यामुळे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर विरोधकांची एकजूट राहील असे दिसते.

**ऋतूंचे अस्तित्व हवामान बदलामुळे संकटात सापडले आहे आणि त्याचवेळी प्रदुषण आपल्याला आजारी पाडणारे वातावरण तयार करत आहे. हेमंत ऋतूचा विचार केला तर हवामान बदलामुळे पावसाळ्याचा कालावधी वाढत आहे. पूर्वी सप्टेंबरपर्यंत पाऊस थांबायचा आणि त्यानंतर थंडीची चाहुल लागायची. परंतु आता ऑक्टोबरपर्यंत पाऊस नित्याने हजेरी लावत आहे. यानंतर तापमान अचानक घसरते आणि ते एकप्रकारे हेमंत ऋतुला कवेत घेणारे ठरत आहे. हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाची (सीएक्यूएम) स्थापना करण्यात आली. परंतु जोपर्यंत राज्ये सहकार्य करणार नाहीत, तोपर्यंत हा आयोग काहीच करू शकणार नाही. सर्वोच्च न्यायालय देखील यासारख्या मुद्दयावर चिंता व्यक्त करत आहे.**

# प्रदूषणाच्या विळख्यात ऋतूचक्र

**के.जे. रमेश, माजी महासंचालक, हवामान विभाग**

सकाळ आणि सायंकाळी कानावर पडणारा पक्ष्यांचा किलबिलाट, सकाळी सकाळी अंगावर पडणारी सूर्याची कोवळी किरणे यासारख्या मनाला शांतता प्रदान करणाऱ्या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या आहेत. आता सकाळीच पडते काळसर धुके, गुदमरून टाकणारा प्रदूषणाचा विळखा.

झील की कोखो से जहा झांकते थे
धूप से सोना मढे भाप छल्ले
वहा अब मंडराता है घना नीला कुहरा....

हेमंतचे गीत गाताना कवी अज्ञेय यांनी कधीतरी या ओळीसह हेमंत ऋतूचे स्वागत केले होते. मात्र आता धुक्याचे सौंदर्य क्वचितच दिसत आहे. निसर्गाचे मनोहारी दृश्यच नाही तर आता हेमंत ऋतूचाही अनुभव येत नाही. कधीकाळी सहाही ऋतूचा अनुभव देणारे दिवस आता सरले. वसंत, ग्रीष्म, वर्षा शरद, हेमंत आणि शिशिर किंवा हिवाळ्यातील एक वेगळाच आनंद आणि उत्साह लोकांत पाहवयास मिळत होता. गुलाबी थंडीची चाहुल सर्वांनाच सुखावणारी असायची. मात्र आता हिवाळा, उष्णता आणि पावसाळा या तीनच ऋतूंचा प्रामुख्याने उत्तर भारतातील नागरिक अनुभव घेत आहेत.

ऋतूंचे अस्तित्व हवामान बदलामुळे संकटात सापडले आहे आणि त्याचवेळी प्रदुषण आपल्याला आजारी पाडणारे वातावरण तयार करत आहे. हेमंत ऋतूचा विचार केला तर हवामान बदलामुळे पावसाळ्याचा कालावधी वाढत आहे. पूर्वी सप्टेंबरपर्यंत पाऊस थांबायचा आणि त्यानंतर थंडीची चाहुल लागायची. परंतु आता ऑक्टोबरपर्यंत पाऊस नित्याने हजेरी लावत आहे. यानंतर तापमान अचानक घसरते आणि ते एकप्रकारे हेमंत ऋतुला कवेत घेणारे ठरत आहे. वास्तविक या काळात पंधरा ते सोळा अंश सेल्सियस तापमान राहताना दिसते, परंतु प्रदूषणामुळे थंडीचा स्पर्श झाला नाही. अशीच स्थिती वसंत ऋतूची देखील आहे. गेल्या तीन चार वर्षांचा अनुभव पाहिला तर मार्च ते एप्रिलपासूनच उष्णतेच्या झळा सुरू होतात. परिणामी वसंतचा तर अनुभव येतच नाही आणि केवळ उन्हाची दाहकता वाट्याला येते.

प्रत्यक्षात मानवी हस्तक्षेपामुळे २०३० पर्यंत जागतिक तापमानात दीड अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु आताच जागतिक तापमानात १.१ किंवा १.२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ झाली आहे. या वाढीची तीव्रता एवढी आहे की भविष्यात दीड अंश सेल्सियसपर्यंत तापमान वाढल्याने होणारा त्रास आताच सहन करत आहोत. प्रत्येक हंगामात त्याचे गांभीर्य कळत आहे. मग दीड अंशांनी वाढ झाल्यानंतर होणाऱ्या स्थितीचा विचार न केलेला बरा. अर्थात अझरबैजान येथील बाकू येथे सुरू असलेल्या कॉप-२९ हवामान बदल संमेलनात २०२४ च्या प्रारंभीच्या नऊ महिन्यांत जागतिक तापमान पूर्व औद्योगिक शतकाच्या सरासरी दीड अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदले गेल्याचे सांगण्यात आले. याच कारणामुळे हवामानाच्या तीव्रतेचा आपण अनुभव घेतला. अडचणीची बाब म्हणजे अशा प्रकारचे अहवाल जारी केले जातात किंवा परिषदांचे आयोजन केले जाते, तेव्हा सर्वच जण पर्यावरणवादी होऊ लागतात आणि सजग होतात. प्रत्यक्षात सर्वकाही आटोपल्यानंतर सर्वजण थंड होतात आणि अहवालही थंडबस्त्यात जातो.

२०१७ मध्ये हवामान बदलावर एक सरकार अंतर्गत पॅनलने (आयपीसीसी) आपल्या अहवालात, हिवाळ्यात तुलनेने तापमान अधिक राहत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे पूर्वीपेक्षा लोकांना कमी थंडी वाजत आहे. अर्थात यामागे जागतिक तापमान कारणीभूत असून त्यात प्रदूषणाचा देखील मोठा वाटा आहे. परंतु या अहवालाकडे कोणीच लक्ष दिले नाही. परिस्थिती अजून 'जैसे थे'च आहे. प्रत्यक्षात हिवाळ्यात गंगा नदीच्या किनाऱ्यावर वातावरण स्थिर असते. ही स्थिती पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भुतानसारख्या देशांतही दिसते. या स्थिर वातावरणात कदाचित कमी दाबाचा पट्टा तयार झाला तर हवामानात उलथापालथ होते. परंतु असे चित्र कधीतरीच पाहवयास मिळते. पण या स्थिर वातावरणामुळे प्रदूषण घुटमळत राहते. वास्तविक भारताच्या उत्तर भारतात प्रदूषण ही बारामाही समस्या आहे. उन्हाळ्यात हवा गरम झाल्याने ती वर जाते आणि त्यामुळे प्रदूषणाला कारणीभूत असलेले घटक विखुरले जातात आणि हवेची गुणवत्ता फारशी ढासळत नाही. परंतु हिवाळ्यात हवामान स्थिर राहत असल्याने प्रदूषणाची घनता वाढत जाते. उर्वरित कसर पंजाब, हरियानातील शेतकरी शेतातील कचरा जाळून आणि फटाके फोडून भरून काढतात. दाट धुके आणि प्रदूषणाचे घटक हे एकत्र येऊन काळसर धुक्याची चादर तयार करतात आणि त्यामुळे गुदमरणारे वातावरण तयार होते. श्वसनाला त्रास होऊ लागतो. विचार करा, दिल्लीच्या हवेतील गुणवत्तेचा निर्देशांक महिनाभर ४०० ते ५०० राहत असेल तर दिल्लीकर जीवघेण्या आजाराला सामोरे जातील नाही तर आणखी काय होईल.

शेवटी या समस्येचे समाधान काय? जेथे प्रदूषणाला खतपाणी घातले जाते, तेथेच त्याचे उत्तर, समाधान आहे. सर्वात पहिले म्हणजे वाळलेली पाने आणि शेणाच्या गोवऱ्यांचा इंधनाच्या रुपातून होणारा वापर थांबविला पाहिजे. आता गावागावात एलपीजी गॅस पोचला आहे. परंतु आजही गरीब ग्रामस्थांसाठी तुलनेने गॅस महागच आहे. तसेच कचऱ्यांचे डोंगर हटविले पाहिजे. राजधानीत असे अनेक प्रकारचे डोंगर असून तेथून मिथेन आणि ओझोनसारखे धोकादायक गॅस बाहेर पडत असतात. त्यांना बाजूला करण्याबरोबरच सर्व कॉलनी आणि सोसायट्यांना देखील स्थानिक पातळीवर कचऱ्याचे निर्मुलन करण्यासाठी कॅप्टिव्ह सीव्हेज ट्रिटमेंट प्लँट आणि कॅप्टिव्ह वेस्ट मॅनेजमेंट प्लँट (कचरा व्यवस्थापन) देखील उभारावा लागणार आहे. त्यामुळे घरातला कचरा परिसरातच नष्ट केला जाईल. गाड्यांपासून होणाऱ्या प्रदूषणाला देखील रोखावे लागेल. सार्वजनिक परिवहनाच्या आघाडीवर देशभरात काम झाले आहे. परंतु खासगी वाहतुकीत सुधारणा करण्याची वेळ आली आहे. यासाठी रस्त्यावर डिझेलचे वाहने थांबविणे गरजेचे आहे. परिवहनातून होणाऱ्या प्रदूषणात डिझेलचे मोठे योगदान आहे आणि शहरात अशा गाड्यांची संख्या लक्षणीय आहे. कार पुलिंग देखील करता येऊ शकते. यानुसार परिवहनात शिस्त आणली तर तीस टक्क्यांपर्यंत प्रदूषणात घट करू शकतो. तसेच हिवाळ्यात हरियाना, पश्चिम उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, उत्तर मध्य प्रदेश आदी भागातील औष्णिक विद्युत केंद्र (कोळशावर चालणारे) बंद करायला हवेत. म्हणजे एक नोव्हेंबर ते पंधरा डिसेंबरपर्यंत कोळशापासून होणारी वीज निर्मिती थांबविली पाहिजे. यां निर्णयामुळे वीजपुरवठ्यावर काही परिणाम होणार नाही. कारण या काळात वीजेची मागणी बऱ्यापैकी कमी झालेली असते आणि प्रसंगी त्याची उणीव शेजारील राज्यांतूनही करता येणे शक्य आहे. त्यामुळे दिल्लीच्या वातावरणात बाहेरून येणाऱ्या प्रदूषणातील तीस टक्के प्रमाण कमी करू शकतो. शेतातील कचरा आणि फटक्यावर काम सुरूच आहे. म्हणजे यानुसार आपण प्रदूषणाची पातळी बऱ्यापैकी कमी करू शकतो. परंतु या गोष्टी होणार कशा हा खरा प्रश्न आहे. हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाची (सीएक्यूएम) स्थापना करण्यात आली. परंतु जोपर्यंत राज्ये सहकार्य करणार नाहीत, तोपर्यंत हा आयोग काहीच करू शकणार नाही. सर्वोच्च न्यायालय देखील यासारख्या मुद्दयावर चिंता व्यक्त करत आहे.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

बुधवार, दिनांक ११ डिसेंबर २०२४, मार्गशीर्ष शु. ११, रेवती, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. मोक्षदा एकादशी, गीता जयंती. नक्षत्र : रेवती, योग : वरियान, करण : वणिज. सूर्योदय : स.०६.४३ सूर्यास्त : सायं.०५.३१ वा. **राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३०**

### दिनविशेष

▶१७८० : वसईचा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात. ▶१७८३ : थोरले बाजीराव यांचा दुसरा मुलगा रघुनाथ 'राघोभरारी' यांचे निधन. ▶१८४५ : पहिल्या इंग्रज शीख युद्धाची सुरूवात. ▶१८५८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय व यदुनाथ बोस हे कलकत्ता विद्यापीठाचे पहिले पदवीधर बनले. ▶१८९९ : कादंबरीकार, तत्वचिंतक पुरूषोत्तम यशवंत देशपांडे यांचा जन्म. ▶१९०९ : प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ नारायण गोविंद कालेलकर यांचा जन्म. ▶१९२२ : भारतीय चित्रपटसृष्टीचा अभिनयसम्राट दिलीपकुमार यांचा जन्म. ▶१९२५ : बालसाहित्यिक राजा मंगळवेढेकर यांचा जन्म. ▶१९६३ : इतिहासाचे अभ्यासक कोवलम माधव पणिक्कर यांचे निधन. ▶१९६७ : कोयनेच्या भूकंपाने महाराष्ट्र हादरला. ▶१९६९ : भारताचा बुद्धिबळपटू विश्वनाथ आनंद यांचा जन्म. ▶१९८७ : सुप्रसिद्ध मराठी लेखक जी. ए. कुलकर्णी यांचे निधन. ▶२००२: घटनातज्ञ, अर्थतज्ञ आणि वक्ते नानी आर्देशीर पालखीवाला यांचे निधन. ▶२००३ : हिंदू महासभेचे नेते, स्वातंत्र्यसेनानी विष्णू रामराव तथा वि.रा. पाटील यांचे निधन.

### राशीभविष्य

▲ **मेष** : शेतीची कामे करा. ▲ **वृषभ** : घरात डागडुजी कराल. ▲ **मिथुन** : छोटा प्रवास घडेल. ▲ **कर्क** : महत्वाचे निर्णय घ्याल. ▲ **सिंह** : अपेक्षित पैसा मिळेल. ▲ **कन्या** : घरकामात वेळ जाईल. ▲ **तुळ** : अपेक्षापूर्तीचा दिवस. ▲ **वृश्चिक** : आनंदी व उत्साही दिवस. ▲ **धनु** : कामात गोंधळ करू नका. ▲ **मकर** : आपल्या वस्तू सांभाळा. ▲ **कुंभ** : जुन्या मित्र मैत्रिणींशी भेट. ▲ **मीन** : धनदायक दिवस.

### चिंतन

जीवन ही लढाई आहे, यज्ञ आहे. जीवन हा सागर आहे. प्रीती आणि पराक्रम हेच जीवनाचे डोळे आहेत. त्याग हा जीवन मंदिराचा कळस आहे. बुद्धी आणि भावना यांचा समन्वय म्हणजेच विवेकपूर्ण जीवन!

– **वि. स. खांडेकर**

### व्यक्तीविशेष

## राजा मंगळवेढेकर

साने गुरुजींचे शिष्य राजा मंगळवेढेकर यांचा जन्म ११ डिसेंबर १९२५ रोजी झाला. कट्टर राष्ट्रवादी वृत्ती आणि सामाजिक भान असलेल्या या सजग मनाच्या राजा माणसाने आपले सारे आयुष्य लेखन, संपादन आणि कथाकथानातून बालकांचे मनोरंजन करण्यासाठी वाहिले. साने गुरुजींच्या सहवासातील गोड गोष्टी आणि इतर संस्कारकथा सांगत साऱ्या महाराष्ट्रभर भ्रमंती केली आहे. कथा आणि कथाकथन या विषयावर प्रबंध लिहिला. बालांसाठी विपुल लेखन केले. मोठ्यांसाठी गुजगोष्टी सांगितल्या. 'मित्राय नमः', 'तरुण मित्रा', 'कहाणी एका प्रयोगाची' 'चित्रांगण', 'ग. दि. मा.', ही त्यांची काही पुस्तके. यापैकी काहींना राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कारही लाभले. १९८५ मध्ये पुणे येथे भरलेल्या बालकुमार साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. साने गुरुजींची जीवनगाथा शब्दबद्ध करणाऱ्या मंगळवेढेकरांनी स्वातंत्र्य लढ्यापासून राष्ट्रसेवादल, साने गुरुजी कथामाला, आंतरभारती आणि अन्य सांस्कृतिक संस्थांच्या कार्याची धुरा समर्थपणे वाहिली. १ एप्रिल २००६ रोजी त्यांचे निधन झाले.

### बोधकथा

## हवरटपणाचा त्रास

राजूला गोड पदार्थ प्रचंड आवडायचे. घरात काही गोड पदार्थ आणले की तो त्याच्यावर चांगलाच ताव मारत असे. राजूची आई नेहमी त्याला सांगत असे राजू गरज असेल तेवढेच खावे. आवडता पदार्थ आहे म्हणून पोटापेक्षा जास्त खाऊ नये. पण राजू आईच्या बोलण्याकडे लक्षच देत नसे. एकदा राजूचा वाढदिवस होता. त्याच्या घरी त्याची बरीचशी मित्रमंडळी जमली होती. सारे जण मस्ती करत होते. आईने भला मोठा केक आणला होता. तो केक राजूने कापला. साऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. आईने साऱ्यांना खायला घरी बनवलेले पदार्थ बशीत मांडून दिले सोबत केकही दिला. राजूनेही सारे खाल्ले. खाणे झाल्यानंतर मुले पुन्हा खेळू लागली. **(पूर्वार्ध)**

### जिज्ञासा

## 'क्ष' किरणांचा शोध

विल्हेल्म रॉन्टेजन नावाच्या शास्त्रज्ञाला क्ष किरणांचा म्हणजेच एक्स रेजच्या शोधाचा जनक म्हटले जाते. त्याला हा शोध अपघातानेच लागला. रॉन्टेजन भौतिक शास्त्राचा प्राध्यापक होता. तो प्रयोगशाळेत नेहमी प्रयोग करत असे. एकदा त्याने हीटॉर्फक्रूक्स नावाची नळी, विजेचा प्रवाह पाठवण्यासाठी इंडेक्शन मशीन आणि निर्वात पोकळी निर्माण करण्यासाठी पंप इत्यादी वापरून कॅथोन किरणांची निर्मिती करून त्याच्या विविध गुणधर्माचे तो निरीक्षण करत होता. त्या दिवशी त्याने या नळीला काळा कागद गुंडाळला आणि नंतर कॅथोड किरणांची निर्मिती केली. या काळ्या कागदामुळे एका नवीनच प्रयोगाने वळण घेतले.

नळीपासून दूरवर झिंग सल्फाईडने भिजलेला एक पडदा होता. तो कॅथोड किरणांनी चकचकत असे. त्या दिवशी हा पडदा त्याने खूप लांब ठेवला तरीही तो चमकत होता. एवढे लांबपर्यंत कॅथोड किरण पोहोचणार नाहीत हे रॉन्टेजन यांना माहित होते; पण तरीही तो का चमकतो आहे याचा विचार करताना इतर कोणती तरी किरणे निश्चित तिथपर्यंत पोहोचत असावीत असा निष्कर्ष त्यांनी काढला. पण ही किरणे कोणती ? याबाबत अज्ञानच होते. रॉन्टेजने त्याची आंगठी प्रयोगशाळेतील एका पेटीत ठेवली होती. **(पूर्वार्ध)**

### गणित गंमत

आण्णांच्या गावामध्ये एक गोल आकाराचा विस्तीर्ण तलाव आहे. तलावाला संपूर्ण काठ बांधून काढला आहे. हा काठ पूर्ण वर्तुळाकार या काठावरच एक ठिकाणी गणपतीचे छोटेसे देऊळ आहे. या तळ्यातला एक माणूस या गणपतीच्या देवळापासून (काठापासून) उत्तरेकडे सरळ दिशेने पोहत जातो. असा ६०० फूट पोहत गेल्यावर त्याला तळ्याचा काठ लागतो. आता तो माणूस पूर्वेकडे काटकोनात वळून पुन्हा सरळ रेषेत पोहू लागतो. असा ८०० फूट पोहल्यावर त्याला पुन्हा तळ्याचा काठ लागतो तर तळ्याचा व्यास किती?

**उत्तर : १००० फूट**

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५२५**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | | 1 | |
| 1 | | 2 | |
| | 4 | | 1 |
| | 1 | | 2 |


**क्रमांक ५२३ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 2 |
| 4 | 2 | 1 | 3 |
| 3 | 4 | 2 | 1 |
| 2 | 1 | 3 | 4 |

### हास्यविनोद

सोने चोरीच्या प्रकरणात आरोपी म्हणून पकडलेल्या चोराला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायाधीशांनी त्याला विचारले, ' दिवसाढवळ्या चोरी करतोस म्हणजे काय म्हणायचे? तुला कायद्याची, समाजाची जरादेखील भीती वाटत नाही?

**चोर :** साहेब, वाटते हो; पण काय करणार रात्री मला लवकर झोप येते. म्हणून मग मी दिवसा चोऱ्या करतो.



**शिक्षक (मुलाला) :** तुम्ही सर्वजण आपल्या ड्रॉईंग पेपरवर ट्रेन आणि प्लॅटफॉर्मचं चित्र काढून ठेवा, मी थोड्या वेळात येऊन पाहतो.

**शिक्षक (५ मिनिटांनी) :** अरे रमेश, तुझ्या कागदावर तर फक्त प्लॅटफॉर्मचं चित्र आहे.

**रमेश :** 'सर, तुम्हाला पाच मिनिटं उशीर झाला. आत्ताच ट्रेन निघून गेली.'

### महिलायन

## अनावश्यक तीळ घालवण्यासाठी

खरं पाहिलं तर गालावरील एखादा तीळ स्त्रीच्या सौंदर्यात भर घालत असतो. पण, असे अनेक तीळ चेहऱ्यावर तयार झाले तर ते सौंदर्यात बाधा आणतात. असे अनावश्यक तीळ घालवण्यासाठी अलीकडे वेगवेगळ्या कॉस्मेटिक सर्जरीद्वारे किंवा अन्य सौंदर्य उपचारांचा वापर केला जातो. हे उपचार बरेच खर्चिकही असतात. सर्वांनाच ते परवडतील असे नसते. अशा वेळी आपण साध्या, सोप्या घरगुती उपचारांचा आधार घेऊन अनावश्यक तिळांना घालवू शकतो. कोबीची भाजी खाण्यासाठी उपयुक्त असतेच पण त्याचबरोबर चेहऱ्यावरील तीळाचा रंग पुसट होण्यासाठीही ती उपयुक्त ठरते. घरीच कोबीच्या पाच-सहा पानांचा रस काढाचा आणि तो रस तळ असणाऱ्या लावावा. काही दिवसांनी तीळ जाईल. अशाच प्रकारे कोथिंबिरीच्या पानांची पेस्टही उपयोगी ठरते. या पेस्टमुळे तीळ जाण्यासाठी थोडा वेळ लागतो. पण, यामुळे कायमचे तीळ जातात. लसणाची पेस्ट रात्री झोपताना तीळावर लावून ठेवावी. अशी पेस्ट लावल्यानंतर शक्यतो त्यावर पातळसर बँडेज गुंडाळून ठेवावे. सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा. एरंडेलचे तेल अनेक त्रासांवर गुणकारी ठरणारे आहे. हे तेल तीळ असलेल्या जागेवर हलक्या हाताने मसाज करून मुरवावे. यामुळे तीळ कायमचा जातो. याबरोबरच त्वचा गरम पाण्याने स्वच्छ धुऊन त्यावर कापसावर व्हिनेगर घेऊन तो चेहऱ्यावर लावावा. **(पूर्वार्ध)**

### गंमतग्यान

## पेनाची वाटचाल

पेनाचा शोध लागलेला होता त्यावेळी लोक आपले विचार कशा पद्धतीने मांडत असतील, असा प्रश्न अनेकदा पडतो. पण मित्रांनो, पूर्वीच्या काळी लोक टोकदार छत्रीच्या सहाय्याने आपले विचार शब्द किंवा चित्रांच्या मदतीने गुहांच्या भिंतींवर कोरत असत. यानंतर झाडांच्या रसांमध्ये किंवा जनावरांच्या रक्तामध्ये आपली बोटे बुडवू लागले. या बोटांचा वापर पेनाच्या रुपात करता यावा म्हणून नंतर मातीचा यासाठी वापर होऊ लागला. चीनी लोक तर आपल्या शेतातील उंटांच्या केसांपासून ब्रश बनवून पेंट करत असत. काही दशकांपूर्वी बोरूच्या साहाय्याने आणि दौतेतील शाईच्या मदतीने लिहिले जात होते. त्यातूनच मग पेनाचा जन्म झाला. आधुनिक पेनाची उत्पत्ती कोणी केली याबाबत ठोस नोंद नसली तरी मिस्त्र लोकांचे नाव या बाबतीत अग्रक्रमाने घेतले जाते. हे लोक एका तांब्याच्या टोकदार तुकड्याचा पेनाप्रमाणे वापर करत असे. हाताने पत्र लिहिण्याचा प्रकार युनानी लोकांनी जवळपास चार हजार वर्षांपूर्वी सरू केला. **(पूर्वार्ध)**

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### टेंपो ट्रॅव्हल्सच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पिंपरी**-भरधाव टेंपो ट्रॅव्हल्सने धडक दिल्याने दुचाकीवरील महिलेचा मृत्यू झाला. मंगल वसंतराव गाडे असे या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे पती वसंतराव भिकाजी गाडे यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. टेंपो चालक विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हिंदूंवरील अत्याचार विरोधात निदर्शने

**पिंपरीः** बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने शहराच्या विविध भागांत निदर्शने करण्यात आली. यामध्ये विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. या निदर्शनादरम्यान बांगलादेश सरकारच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. या निदर्शनामध्ये बांगलादेशातील हिंदूंवरील अन्याय रोखण्याची मागणी करण्यात आली. यावेळी 'बटेंगे तो कटेंगे','हिंदुओंपर अन्याय, असे फलक झळकविण्यात आले.

### जमिनीच्या वादातून व्यावसायिकाला मारहाण

**पिंपरी :** जमिनीच्या वादातून चौघांनी एका व्यावसायिकाला मारहाण केली. याप्रकरणी महेंद्र तानाजी पवार यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जागेच्या वादावरून आरोपींनी पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना शिवीगाळ करून लाकडी बांबू व दगडाने मारहाण केली. दिघी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# घातक कचरा विल्हेवाटीबाबत उदासीनता

## उघड्यावरच कचरा टाकल्यामुळे कामगारांना, नागरिकांना त्रास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** उद्योगनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात अनेक मोठमोठे उद्योग आहेत. त्यांना पूरक असे लघुउद्योगही शहरात आहेत. त्यामधून मोठ्या प्रमाणात औद्योगिक घातक कचऱ्याची निर्मिती होते. अनेक मोठे उद्योग त्यांच्याकडे तयार होणारा औद्योगिक घातक कचरा हा विघटन प्रक्रियेसाठी पाठवतात. मात्र, बहुतांश लघुउद्योजक उदासीनतेमुळे आपल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता तो सरळ भंगारात विकतात. या कचऱ्यातील घातक रसायने ही ज्वलनशील असतात. त्यामुळे या कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात येत नसल्यानेच आगींना निमंत्रण मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे. पिंपरी चिंचवड परिसरातील कंपन्यांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विघटन करण्याची यंत्रणा असणे गरजेचे आहे.

उद्योगांमध्ये निर्माण होणारा औद्योगिक घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी रांजणगाव येथे सीएचडब्लूटीएसडीएफ प्लांट उभारण्यात आलेला आहे. बहुतांश मोठे उद्योग या ठिकाणी आपला कचरा जमा करतात. मात्र, लहान उद्योगांमध्ये तयार होणारा रासायनिक कचरा हा थोड्या प्रमाणात असतो. हा कचरा जमा करण्यासाठी या प्लांटकडून मोठ्या प्रमाणात परिवहन शुल्क घेतले जाते. लहान उद्योजकांना हे परवडत नसल्याने ते अनेकदा हा कचरा भंगारात विकतात.

### » सावधान

त्यामुळे लहान उद्योजकांसाठी कचरा जमा करण्याची वेगळी यंत्रणा हवी अशी मागणी उद्योग क्षेत्रातून होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ११ हजारांपेक्षा अधिक कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये कमी-अधिक प्रमाणात घातक कचऱ्याची निर्मिती होते. औद्योगिक परिसरातून सुमारे १५ टक्के घातक कचऱ्याची निर्मिती होत असल्याचे सांगितले जात आहे. हा कचरा महापालिकेकडून उचलला जात नाही. त्यामुळे त्याची





विल्हेवाट कशी लावायची याची चिंता उद्योजकांना आहे. औद्योगिक परिसरात रस्त्याकडेलाच घातक कचरा टाकला जात आहे. परिणामी त्यामुळे कामगारांना, परिसरातील नागरिकांना त्रास होत आहे.

घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने स्वतंत्र प्रकल्प उभारणे गरजेचे आहे. यासाठी पिंपरी-चिंचवड लघुउद्योजक संघटनेकडून सातत्याने पाठपुरावा देखील सुरू आहे. मात्र, त्याला महापालिका प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. या उलट रांजणगाव येथील एका खासगी कंपनीकडे कचरा पाठवा, असा सल्ला महापालिका देत आहे. त्यासाठी या कंपनीला पैसे मोजावे लागणार आहेत. उद्योजकांच्या खिशाला कात्री लावण्याचे आणि खासगी कंपनीला पोसण्याचा घाट घातला जात असल्याचे उद्योजकांचे म्हणणे आहे.

### काय करायला हवे

- लघुउद्योगांकडून कचरा संकलन करण्यासाठी केंद्र उभारणी
- कचऱ्याची योग्य विल्हेवाट लागतेय का, यावर सक्षम यंत्रणेद्वारे नियंत्रण
- लघु व सूक्ष्म उद्योजकांमध्ये जागरूकता निर्माण करायला हवी
- लहान प्रमाणात कचरा जमा करण्यासाठी वेगळी यंत्रणा हवी

### प्रशासनाची उदासीनता

- शहरात कोणताही उद्योग उभारण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका व राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्याकडून परवानगी घेणे आवश्यक असते. यावेळी कंपनीतील उत्पादन घेताना कोणती रसायने निर्माण होतात. याची माहितीही उद्योजकांनी देणे आवश्यक असते. त्यानंतर या उद्योगांना परवाना दिला जातो. मात्र, त्यानंतरही वेळोवेळी कंपनीकडून औद्योगिक घातक कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जात आहे का ? हा कचरा कुठे विकला जातो ? विघटनासाठी पाठवला जातो का याची तपासणी करणे आवश्यक आहे. मात्र, महापालिका प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांची याबाबत उदासीनता दिसून येत आहे

“ कोणत्याही उद्योगाला परवाना देताना त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्याची कशी विल्हेवाट लावायची याबाबतची माहिती दिलेली असते. सध्या पिंपरी चिंचवड, पुणे परिसरातील उद्योगांमधील घातक कचऱ्याचे विघटन करण्यासाठी रांजणगाव येथे प्रकल्प उभारण्यात आला आहे. जे उद्योग या ठिकाणी कचरा पाठवत नाहीत, त्यांच्यावर कारवाई केली जाते.

**— मंचक जाधव, उपप्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण महामंडळ**

“ अनेकदा कंपनीतून तयार होणाऱ्या कचऱ्यात स्फोटक रसायने असतात. लहान उद्योजकांकडून या कचऱ्याची अनेकदा परस्पर विल्हेवाट लावली जाते. ती लावण्यासाठी कचरा जाळला जातो तर कधी तो भंगारात विकला जातो. त्यातून आग लागण्याच्या घटना घडतात. त्यामुळे औद्योगिक घातक कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जात आहे. याची खात्री सर्वप्रथम प्रदूषण नियंत्रण महामंडळाने करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रकल्पांकडून हा कचरा टनामध्ये घेतला जातो. त्यामुळे प्रतिकिलो वजनाने हा कचरा जमा करता यावा, यासाठी महापालिकेनेही स्वतंत्र यंत्रणा उभी केली पाहिजे.'

**— अभय भोर, अध्यक्ष, फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री**

# गो आधारित शेती आणि उत्पादनांनी देश सक्षम

## दिनेश उपाध्याय यांचे प्रतिपादन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- :** गो आधारित शेती आणि उत्पादनांनी देश सक्षम होईल!" असे विचार अखिल भारतीय गोरक्षा प्रमुख दिनेश उपाध्याय यांनी सोमवार, दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी विश्व हिंदू परिषद सभागृह, चिंचवड येथे व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद - पश्चिम महाराष्ट्र प्रांत आणि गोरक्षा आयाम आयोजित कार्यकर्ता प्रबोधन शिबिरात मार्गदर्शन करताना दिनेश उपाध्याय बोलत होते. क्षेत्र गोरक्षा संघटन मंत्री भाऊराव कुदळे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे, प्रांत गोरक्षा प्रमुख सी ए महेंद्र देवी, प्रांत सह प्रमुख कौस्तुभ देशपांडे, सहप्रमुख विलास फाटक, क्षेत्र गोभक्त महिला प्रमुख सुनीता देशमुख, विभाग मंत्री शिव व्यास, जिल्हा मंत्री संतोष खामकर इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

दिनेश उपाध्याय पुढे म्हणाले की, "गोरक्षा आयामाचे काम करीत असताना वेगवेगळा दृष्टिकोन ठेवावा. संघटनात्मक दृष्टिकोनातून कार्य केल्यास आपल्याला कार्यकर्ते मिळतात. कार्यकर्ता प्रशिक्षणाची व्यापकता वाढवून आर्थिक सक्षमतेबाबत नियोजन केले पाहिजे; तसेच उपक्रमाच्या यशाचे मूल्यमापन करावे!"

प्रांत कार्यालय प्रमुख अनंत पाठक यांच्या योगदानाबाबत ॲड. सतिश गोरडे यांनी माहिती देऊन त्यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर दीपप्रज्वलन, त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र आणि विजय महामंत्राने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. कौस्तुभ देशपांडे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. महेंद्र देवी यांनी प्रास्ताविकातून महाराष्ट्रातील विविध देशी गाईंच्या प्रजातीविषयी माहिती दिली. भाऊराव कुदळे यांनी पंचगव्य याविषयी ऊहापोह केला. सुनीता देशमुख यांनी जिल्ह्यास्तरावर गोरक्षा महिला प्रमुख असाव्यात, अशी मागणी केली. नितीन सातव यांनी शेणापासून तयार करण्यात येऊ शकतील अशा विविध वस्तूंची माहिती चित्रांच्या माध्यमातून दिली. अशा वस्तूंच्या विक्रीबाबत तुषार वाघ यांनी साहाय्यक बाबींचा ऊहापोह केला. शिव व्यास यांनी गोमातेचा महिमा कथन केला. किशोर चव्हाण यांनी आयामाचे महत्त्व आणि संघटनात्मक कामाबाबत माहिती दिली. कुंभमेळ्याच्या निमित्ताने गोरक्षणाविषयी कायद्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, असे सर्वानुमते मंजूर करण्यात आले. शांतिमंत्राने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## पान १ वरून

### आता लक्ष्य सभापतीपद

तरीही राम शिंदे यांची सभापतीपदी वर्णी लागावी, यासाठी भाजपाच्या गोटातून हालचाली सुरू झाल्यात.

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी त्यांच्या पक्षाच्या एका सदस्याला विधान परिषदेचं सभापती करायचं ठरवलंय. अजित पवार यांनी विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे निंबाळकर यांना सभापतीपदाचा शब्द दिला होता. आताच झालेल्या लोकसभा निवडणुकीपर्यंत रामराजे निंबाळकर यांच्या नावाची चर्चा होती. परंतु लोकसभा निवडणुकीत माढा, सोलापूर या भागात रामराजे निंबाळकर यांचा प्रभाव असतानासुद्धा त्यांनी महायुतीचे लोकसभेचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या विरोधात उघड भूमिका घेतली होती. या कारणाने रामराजे निंबाळकर यांना सभापतीपद देण्यास भाजपासोबत शिवसेना एकनाथ शिंदे यांचाही मोठा विरोध आहे, अशा परिस्थितीत अजित पवार यात कशा पद्धतीची मनधरणी करतात हे बघणंसुद्धा महत्त्वाचं ठरणार आहे.

### मुंबईतल्या घटनेत ...

कंत्राटावर घेतले होते. आरोपीला बस चालवण्याचा पूर्वीचा कोणताच अनुभव नव्हता. कुर्ला रेल्वे स्थानक हा भाग वर्दळीचा भाग असल्याने बस चालकाचा बसवरील ताबा सुटला आणि ही घटना घडली.

बस पावणे दहाच्या सुमारास कुर्लायेथून साकीनाकाकडे जात होती. अचानक बस वेगवान झाली आणि हा अपघात घडला. या घटनेनंतर स्थानिकांनी जखमींना त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल केले. ही घटना घडली तेव्हा बसमध्ये सुमारे ६० प्रवासी होते. या घटनेत तीन पोलिस आणि महाराष्ट्र सुरक्षा दलाचा एक जवान जखमी झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक प्रशांत चव्हाण हेही जखमी झाले, तर २०-२५ वाहनांचे संपुर्णतः नुकसान झाले.

### मतांमध्ये फेरफार नाही!

युनिट मोजणीत कोणतीही तफावत आढळली नाही. निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या प्रक्रियेचे पालन करण्यात आले आहे. गेल्या महिन्यात झालेल्या निवडणुकीच्या निकालात शिवसेना, भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीने प्रचंड बहुमताने सत्ता राखली आणि महाविकास आघाडीला पराभूत केले.

### पुण्यात पुन्हा हुडहुडी!

मोठी घट होण्यास सुरुवात झाली आहे. मंगळवारपासून (दि. १०) शहराच्या किमान तापमानात घट होण्यास सुरुवात झाली आहे. शहरातील किमान तापमान सोमवारी १६.४ अंशांवर होते. यात आज (मंगळवार) पासून घट होत जाईल आणि १३ डिसेंबरपासून पारा १० अंशांखाली जाईल.

### हिवाळी अधिवेशन पुढच्या सोमवारपासून

या बैठकीत आगामी हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीत आगामी हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी उपस्थित होते.
हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### घटनेचे राजकारण करू नये:...

किंवा आमदारांचा मामा, शेवटी ही यंत्रणा आहे आणि पोलीस लवकरच आरोपींचा शोध घेतील, असं यावेळी टिळेकर यांनी म्हटलंय.
सोमवारी पहाटेच्या सुमारास पुण्यातील फुरसुंगी येथील सोलापूर रस्त्यावरील हॉटेल ब्लू बेरीसमोर सतीश वाघ हे थांबले असता त्यांना जबरदस्ती चारचाकी शेव्हरले एन्जॉय या गाडीत बसवत त्यांचं अपहरण करण्यात आलं होतं. या प्रकरणी सतीश वाघ यांच्या मुलाने तत्काळ हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. याचा तपास सुरू असतानाच यवत पोलीस स्टेशनच्या हद्दीत सतीश वाघ यांचा मृतदेह आढळला एकच खळबळ उडाली.
मामांच्या अंत्यविधीसाठी आलेल्या योगेश टिळेकरांनी आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, आमच्या मामांचं याच ठिकाणाहून अपहरण झालं, पोलिसांना तपासामध्ये मृतदेह सापडला. अपहरण करून खून केल्याची घटना आमच्या परिवारासोबत झालेली आहे. पोलीस यंत्रणा अतिशय सक्षमपणे काम करत आहे. लवकरच या हत्येमागचं कारण काय आहे? याचा पोलीस सुगावा लावतील.

### धनगर समाजाला...

आहे, असे त्यातून सांगितले जात आहे. मात्र, खरंच इथल्या लोकांना बॅलेट पेपरवर मतदान हवं आहे का? मविआला कोणी मतदान केले का? हे सर्वांना कळलं पाहिजे, म्हणून आम्ही मारकडवाडीत आलो आहे. हे गाव माझ्या पै-पाहुण्यांचं गाव आहे. ९० टक्के येथे धनगर समाज राहतो. म्हणून माझी जबाबदारी वाढली आहे. धनगर समाज लोकशाही मनात नाही, असे भासवण्यात आले आहे. या विधानसभा मतदारसंघात १०० गावे असताना नेमकं माझ्याच मारकडवाडीला का पुढे करण्यात आले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून आज सदाभाऊ खोत आणि मी आलो असल्याचे त्यांनी सांगितले. सरंजामशाही मोहिते- पाटील स्वतःला राजे मानतात. मी बारामतीत उभा होतो, तेव्हा माझे डिपॉजिट जप्त झाले. मग जर ईव्हीएम घोळ असता तर मी पराभूत झालो असतो का? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १४ हजार मतांनी पराभव झाला. मात्र, त्यावेळी ७२ हजार मतं बाद झाली होती. जो राहुलबाबा इथे येणार आहे. त्याच्या मामाच्या गावात पण ईव्हीएमवर मतदान होत आहे.

### उत्पन्न काहीच नाही, ...

अंदाजपत्रकामध्ये ३० टक्के उत्पन्न म्हणजे सर्वसाधारण २७०० ते २८०० कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्याचे उद्दिष्ट हे मिळकत कर विभागाला देण्यात आले आहे. त्यानुसार आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मिळकत कर विभागाने जोरदार प्रयत्न सुरू केलेले आहेत. महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या या गावांपैकी उरुळी देवाची, फुरसुंगी गावे महापालिकेच्या हद्दीतून वगळून तेथे स्वतंत्र नगरपरिषद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याबाबतचा अध्यादेश देखील राज्य सरकारने काढला आहे. या गावांचे प्रत्यक्ष काम नगरपरिषदेच्या मार्फत सुरू होत नाही, तोपर्यंत या गावांमधील नागरिकांना आवश्यक त्या पायाभूत सोयीसुविधा पुरविण्याची जबाबदारी राज्य सरकारने महानगरपालिकेवर टाकली आहे.

### सीमाप्रश्नी मुख्यमंत्री ...

तिथे आहे आणि ते सरकार अत्याचार करतेय. आपले सरकार अत्याचार करतेय आणि पुन्हा नाकाने कांदे सोलून बोलायचे ही त्यांची प्रवृत्ती आहे. महाराष्ट्रात महायुती सरकार आहे म्हणूनच नाही तर या राज्यात कुठलेही सरकार असले तरी सीमावासियांच्या बाजूनेच महाराष्ट्राचे सरकार राहिलेले आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस-अदानी ...

'मोदी-अदानी भाई-भाई', असं लिहिलं होतं. प्रियांका गांधी माध्यमांशी बोलताना म्हणाल्या, "आम्ही अदानींचा मुद्दा संसदेत का उपस्थित करू नये. आम्ही पहिल्यांदाच संसदेत निवडून आलो आहोत. या अधिवेशनात आम्ही अद्याप पंतप्रधान नरेंद्र मोदींना सहभागी होताना पाहिलं नाही. संसदेचं कामकाज सुरू नसल्यामुळं चर्चेत सहभागी होता येत नाही".

### कोलकाता प्रकरणी...

यांनी म्हटले आहे की, खटला चालू आहे आणि सीबीआय पुढील आठवड्यात खटला पूर्ण करेल अशी अपेक्षा आहे. तसेच आरजी कार मेडिकल कॉलेज डॉक्टर बलात्कार आणि हत्ये प्रकरणी पुढील सुनावणी १७ मार्च २०२५ रोजी घेणार असल्याचे देखील आज सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

## महापालिकेकडून कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई नाही

# पालिकेत पदोन्नती; बोगस पदवीचा वापर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्यांच्या आधारे पिंपरी-चिंचवड महापालिकेत अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ पदावर पदोन्नती मिळविल्या आहेत. अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर महापालिकेकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. सामान्य प्रशासनाकडून बघ्याची भूमिका घेतली जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहेत.

महापालिकेच्या सेवा प्रवेश नियमावलीनुसार वर्ग तीन व चारमधील पात्र कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंतापदावर पदोन्नती देण्याची तरतूद आहे. या नियमाच्या आधारे गेल्या दहा वर्षांत



महापालिकेत रखवालदार, मजूर, गवंडी, बिगारी, शिपाई, लिपिक, आरोग्य निरीक्षक, सर्व्हेअर अशा कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक होण्याची संधी मिळाली आहे. ही पदोन्नती मिळविताना अनेक कर्मचाऱ्यांनी कर्नाटक, आसाम, सिक्कीम, राजस्थान, केरळ या परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्या घेतल्या आहेत.

कर्मचाऱ्यांनी बहि:स्थ पध्दतीने शिक्षण घेऊन या पदव्या मिळवल्या आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आदेशानुसार अभियांत्रिकीसह, वैद्यकीय, कृषी, आरोग्य, हॉटेल मॅनेजमेंट, कायदा आदींच्या दूरस्थ शिक्षणाला परवानगी नाही. संबंधित विद्यापीठांना इतर राज्यांतील विद्यार्थ्यांना अशा पदव्या देण्याचे अधिकार नाहीत. असे असताना या परराज्यातील विद्यापीठांकडून बोगस पदव्यांची खैरात सुरू आहे. त्याच पदव्यांच्या आधारे महापालिकेने अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्या आहेत.

### परराज्यातील पदवीवरून कोणाला पदोन्नती नाही

- महापालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्याबाहेरील विद्यापीठाकडून दूरस्थ तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून धारण केलेल्या पदवी, पदविका ग्राह्य धरली जाणार नाही. असा स्पष्ट आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी काढला आहे. त्यामुळे सामान्य प्रशासनाकडून राज्याबाहेरील कर्मचाऱ्यांच्या पदवी, पदविका ग्राह्य धरुन आदेश काढल्यानंतर एकाही कर्मचाऱ्याला पदोन्नती दिलेली नाही. मात्र, पूर्वी दिलेल्या पदोन्नतीबाबत मला काहीच माहिती नाही, असे सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त विठ्ठल जोशी यांनी सांगितले.

# "संस्कृती एकत्रित योगदानातून समृद्ध होते! - डॉ. श्रीपाल सबनीस यांचे मत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "मानवी संस्कृती ही समाजाच्या एकत्रित योगदानातून समृद्ध होते!" असे विचार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, पिंपरी येथे सोमवार, दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक पुरुषोत्तम सदाफुले लिखित आणि संवेदना प्रकाशननिर्मित 'विचारवंतांचे अंतर्मन' या समीक्षापर पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते.प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, "मूळ पिंड लेखकाचा असलातरी पुरुषोत्तम सदाफुले यांनी साहित्य अन् संस्कृतीच्या संवर्धनासाठी आपले जीवन समर्पित केले आहे. या वाटचालीत विविध समाजसुधारक, नेते, विचारवंत, साहित्यिक, कलावंत आणि प्रतिभावंतांचे सान्निध्य त्यांना लाभले. या सार्वकालीन अन् समकालीन व्यक्तिमत्त्वांच्या वेगवेगळ्या विचारसरणीबाबत भेदाभेद न करता कविहृदयाच्या सदाफुले यांनी त्यांचे अंतर्मन जाणून घेत त्यांची विचारमौक्तिके या पुस्तकात संकलित केली आहे.

**PUBLIC NOTICE/ SUMMONS**

In The Court of Shri. S.S. Challani, 12th Jt C.J J.D At Aurangabad.(Maharashtra State)

Reg. DKST No. 200530 of 2014.

Mis. Varroc Engineering Pvt Ltd. E-4, MIDC, Industrial Area, Waluj, Aurangabad.

V/S

Mis. M.B. Precision, Kolsa Lane, M.G. Road, Pune-41100 I .

To,
M.B. Precision and Automation Plot No. 3/4, Survey, No.64, Handevadi Road, Hadapsar, Near Satav Nagar, Pune Dist Pune, Maharashtra.

Whereas Varroc Engineering Pvt Ltd has made Application to this Court for Execution of decree in Suit No.1980/2012 on the allegation that the said decree has been transferred to him by assignment or without assignment. This Darkhast pending before Shri S.S. Challani,12th Jt C.J.J.D At Aurangabad through before this Court. That the notice/ Summons of this Darkhast issued to you many times and the same not been served upon you and return unserved to this Court.

You are hereby warned to appear before this Court in person or by a pleader duly instructed on 16/12/2024 at 11:00 a. m to show cause against the said Darkhast, failing wherein, the said Darkhast will be heard and determined ex-parte.

Also take notice/ Summons that in default of your filing an address for service on or before the date mentioned above, you are liable to have your defense struct out.

By Order
Superintendent
12th Jt C.J J.D
Aurangabad

## प्रत्येक लाभार्थीमागे ५० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचे आश्वासन

# अंगणवाडी सेविका भत्त्यापासून वंचित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेसाठी शहरात विविध ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. शासनाच्या परिपत्रकामध्ये या योजनेसाठी अंगणवाडी सेविकांना देखील सहभागी करुन घेण्यात आले आहे. याबदल्यात त्यांना प्रत्येक लाभार्थीमागे ५० रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जाणार होता. मात्र, बहिणींच्या खात्यावर साडेसात हजार रुपये जमा होवूनही, अंगणवाडी सेविकांना अजून एक रुपयादेखील मिळाला नाही.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेपासून कुणीही वंचित राहू नये, यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती. अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन म्हणून पन्नास रुपये प्रत्येक अर्जासाठी देण्याचे शासनाकडून सांगण्यात आले होते. मात्र, अद्याप एकाही अंगणवाडी सेविकेला त्या कामाचा मोबदला मिळालेला नाही. अंगणवाडी सेविकांसह सेतू केंद्र, आपले सरकार केंद्र, ग्रामसेवक, ग्रामपंचायतीचे कर्मचारी, आशा स्वंयसेविका यांनी अर्ज भरले आहेत. कुणी किती अर्ज भरले आहेत, याची प्रशासनाकडून अद्याप पडताळणी सुरू आहे. अंगणवाडी सेविकांनी अंगणवाड्या सांभाळून ऑनलाईन अर्ज भरण्याचे काम केले.

“ आम्ही भत्ता मिळावा यासाठी मागणी केली आहे. मागे निवडणूक काळात मानधनवाढीसाठी आमचे आंदोलन देखील सुरू होते. मधल्या काळात आचारसंहिता होती. अद्याप सरकार देखील स्थापन झालेले नाही. आता महिला बालविकास मंत्री कोण होईल, तोपर्यंत मागणी तशीच राहिल.

**— नितीन पवार (अध्यक्ष, अंगणवाडी कर्मचारी सभा, पुणे)**



#रा

## जगदीप धनखड यांच्याविरोधात अविश्वास ठराव

# संसदीय इतिहासातील पहिलीच कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** विरोधकांच्या इंडिया आघाडीने राज्यसभेचे सभापती जयदीप धनखड यांच्याविरोधात राज्यसभेच्या मुख्य सचिवांकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या विरोधात विरोधकांनी मंगळवारी अविश्वास प्रस्ताव आणला आणि भारताच्या संसदीय इतिहासातील अशा प्रकारची ही पहिलीच कारवाई ठरली.

या अविश्वास प्रस्तावावर सुमारे ७० खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यात काँग्रेस, बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस, अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष, अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्ष, तामिळनाडूचा द्रमुक आणि लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाच्या सदस्यांचा समावेश आहे. राज्यसभेतील संख्याबळ पाहता हा प्रस्ताव नामंजूर होण्याची शक्यता आहे. मात्र विरोधकांना सभापती त्यांना सभागृहात बोलण्याची संधी देत नाहीत, हे दाखवून द्यायचे आहे. विरोधी खासदारांच्या स्वाक्षरीअसलेला हा ठराव राज्यसभेच्या सरचिटणीसांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या प्रस्तावाला ममता बॅनर्जी यांच्या टीएमसीचाही पाठिंबा मिळाला आहे. जयराम रमेश म्हणाले की, हा एक कठीण निर्णय आहे, परंतु आम्हाला तो सक्तीने करावा लागेल. विरोधी पक्षाच्या खासदारांना सभागृहात बोलण्याची संधीही दिली जात नाही. त्यांचा माईकही बंद आहे. ही पक्षपाती परिस्थिती आहे आणि म्हणूनच आम्हाला अविश्वास ठराव आणावा लागला.

जयराम रमेश यांनी लिहिले आहे की, 'विरोधी पक्ष इंदिरा आघाडीशी संबंधित सर्व पक्षांना राज्यसभेच्या सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. ते राज्यसभेचे कामकाज निःपक्षपातीपणे चालवत होते. हा निर्णय इंदिरा आघाडीतील पक्षांसाठी अवघड असला तरी संसदीय लोकशाहीच्या हिताचा आहे. त्यामुळेच आपल्याला असे पाऊल उचलावे लागत आहे. आम्ही राज्यसभेच्या सरचिटणीसांना अविश्वास प्रस्ताव सादर केला आहे. मात्र, या प्रस्तावात विरोधी पक्षाच्या कोणत्याही नेत्यावर सभागृहाची स्वाक्षरी नसल्याचे सूत्रांनी सांगितले. आधी टीएमसी या प्रस्तावाच्या समर्थनात नसल्याचं सांगण्यात आलं होतं, पण आता ममता बॅनर्जी यांचा पक्षही एकत्र आल्याची माहिती समोर आली आहे. टीएमसी खासदार सागरिका घोष म्हणाल्या की, आमच्या पक्षाचे खासदार बाहेर पडले आहेत. आम्ही अविश्वास ठरावाच्या पाठीशी आहोत. सभापती पक्षपातीपणाने कामकाज चालवत असल्याने संसदीय लोकशाही वाचविण्यासाठी हे आवश्यक आहे. विरोधकांना जनतेचे प्रश्नही मांडू दिले जात नाहीत. तृणमूल काँग्रेसच्या खासदार सुष्मिता देव म्हणाल्या की, आम्हाला लोकांचे प्रश्न मांडायचे आहेत. रोजगार, महागाई, मणिपूर आणि बंगालसाठी निधीचे वाटप असे मुद्दे मांडण्याचा सल्ला ममतादीदींनी दिला आहे.

दरम्यान, संसदेचे हिवाळी अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षांनी सभागृहात गदारोळ घातल्याने लोकसभेचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब करण्यात आले. विरोधी खासदारांनी विविध मुद्दे मांडण्याची मागणी केल्याने लोकसभेचे कामकाज मंगळवारी सुरू झाल्यानंतर काही वेळातच उद्यापर्यंत तहकूब करण्यात आले. तर दुसरीकडे सत्ताधारी आणि विरोधी खासदारांमध्ये विविध मुद्द्यांवरून गदारोळ सुरू असल्याने राज्यसभेचे कामकाजही उद्या दुपारपर्यंत तहकूब करण्यात आले आहे.



> राहुल गांधींना नाटक करणे आणि पंतप्रधानांना नावे ठेवणे आवडते, परंतु ज्यांनी त्यांना निवडून दिले त्यांच्या प्रति इतर खासदारांची जबाबदारी आहे. त्यांना फक्त येथे नाटक करायचे आहे आणि मग परदेशात जाऊन सुट्टी एन्जॉय करायची आहे.
>
> **-किरेन रिजिजू, केंद्रीय मंत्री**

## » Selected

### माजी मुख्यमंत्री कृष्णा यांचे निधन

**बेंगळुरू :** माजी परराष्ट्र मंत्री, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचे आज मंगळवारी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. दरम्यान, एस. एम. कृष्णा यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर कर्नाटक सरकारने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर जाहीर केला आहे. तसेच राज्य शासनाने बुधवारी सुट्टी जाहीर केली आहे.
कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी सांगितले की, कृष्णा यांच्यावर त्यांच्या मूळ गावी मद्दूर येथे बुधवारी सायंकाळी ४ वाजता पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होतील. बंगळूरमध्ये उद्या सकाळी ८ वाजेपर्यंत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. तसेच बुधवारी मद्दूरमध्ये सकाळी १०.३० ते दुपारी ३ दरम्यान त्यांचे अंत्यदर्शन घेता येईल, असे राज्य सरकारकडून सांगण्यात आले आहे.
कृष्णा यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री ते देशाचे परराष्ट्र मंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल आणि भारतीय राज्यकारणात १० वेगवेगळी पदे भूषविली होती.

### वक्फ बोर्डचे अतिक्रमण

**नवी दिल्ली :** देशभरातली एकूण ९९४ मालमत्तांवर वक्फ बोर्डाने अवैधरित्या अतिक्रमण केले असल्याची माहिती केंद्र सरकारने संसदेत दिली. यामध्ये एकट्या तामिळनाडूमध्ये सर्वाधिक ७३४ अशा मालमत्ता आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्ष(मार्क्सवादी)चे नेते जॉन ब्रिटास यांच्या प्रश्नावर उत्तर देताना अल्पसंख्याक मंत्रालयाने ही माहिती दिली. देशात वक्फच्या अधिनियमांतर्गत ८७२,३५२ स्थावर आणि १६,७१३ स्थावर नसलेल्या मालमत्ता नोंदणीकृत आहेत.

अल्पसंख्यांक मंत्रालयाचे मंत्री किरेन रिजीजू यांनी एका प्रश्नावरील उत्तरादरम्यान सांगितले, तामिळनाडू नंतर, आंध्र प्रदेशात १५२, पंजाबमध्ये ६३, उत्तराखंडमध्ये ११ आणि जम्मू-काश्मीरमध्ये १० अशा मालमत्ता आहेत. केंद्रीय नागरी तसेच शहरी मंत्रालयाने सोमवारी राज्यसभेत सांगितले की केंद्र सरकारद्वारे २०१९ नंतर वक्फ बोर्डाला कोणतीही जमीन देण्यात आलेली नाही. दरम्यान, जोपर्यंत नागरी आणि शहरी बाबतीतील मंत्रालयाचा सवाल आहे तर २०१९ नंतर भारत सरकारकडून वक्फ बोर्डाला कोणतीही जमीन उपलब्ध करण्यात आलेली नाही.

## प्रार्थनास्थळ कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर

# १२ डिसेंबरला सर्वोच्च सुनावणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठासमोर प्रार्थनास्थळ कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर १२ डिसेंबरला सुनावणी होणार आहे. या कायद्यानुसार, १५ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा अस्तित्वात असलेल्या सर्व प्रार्थनास्थळांची यथास्थिती राखणे अनिवार्य आहे.

२०२०, पासून न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या या खटल्याच्या सुनावणीसाठी भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी विशेष तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाची स्थापना केली आहे. या खंडपीठात सरन्यायाधीश यांच्यासमवेत न्यायमूर्ती पी. व्ही. संजय कुमार आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांचा समावेश आहे. १२ डिसेंबरला दुपारी साडेतीन वाजता या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

प्रार्थनास्थळ कायदा कायदा हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख धर्मियांची प्रार्थनास्थळे आणि तीर्थक्षेत्रांची डागडुजी करण्याचा अधिकार काढून घेतो, असा युक्तीवाद याचिकांमध्ये करण्यात आला आहे. काशी राजघराण्यातील कन्या, महाराजा कुमारी कृष्णा प्रिया, भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी, माजी खासदार चिंतामणी मालवीय, निवृत्त लष्करी अधिकारी अनिल कबोत्रा, वकील चंद्र शेखर रुद्र, वाराणसीचे रहिवासी विक्रम सिंह, स्वामी जितेंद्रनंद सरस्वती, देवकीनंदन ठाकूर, अश्विनी उपाध्याय यांनी या कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

हा कायदा धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे आणि कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करतो, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. हा कायदा त्यांना त्यांची प्रार्थनास्थळे आणि तीर्थक्षेत्रे व्यवस्थापित करण्याचा अर्थात व्यवस्थापनाचा, देखरेखीचा आणि प्रशासनाचा अधिकार हिरावून घेतो, असाही युक्तीवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे.

कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांव्यतिरिक्त, त्याचे समर्थन करणाऱ्या याचिका आणि कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरही सर्वोच्च न्यायालय सुनावणी करणार आहे.

# नाशिकात पुन्हा पेपरफुटी! सलग तिसरी घटना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या हिवाळी सत्र परीक्षेतील पेपर फुटल्याचा मेसेज विद्यापीठाच्या मेलवर आला. पेपरफुटीसंदर्भात मेल आल्यानंतर विद्यार्थ्यांना त्वरित दुसरी प्रश्नपत्रिका पाठवण्यात आली, यामुळं विद्यार्थ्यांना परीक्षेला विलंब झाला होता. याप्रकरणी आरोपीला लवकरच ताब्यात घेतलं जाईल, असं पोलिसांनी सांगितलं आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून एमबीबीएसच्या हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. एमबीबीएस द्वितीय वर्षाचा फार्माकोलॉजी १ विषयाचा पेपर २ डिसेंबरला फुटल्यानंतर ती परीक्षा रद्द करण्यात आली होती. अशातच बुधवारी ४ डिसेंबरला पेपरच्या दिवशी पेपर फुटीची पुनरावृत्ती झाल्याची अफवा पसरल्यानं प्रश्नपत्रिका बदलण्यात आली. मात्र, तिसऱ्या दिवशीची घटना केवळ अफवा असून खबरदारी म्हणून प्रश्नपत्रिका बदलण्यात आल्याची माहिती विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी दिली. परंतु त्यानंतर सोमवारी ९ डिसेंबरला पॅथॉलॉजी २ या विषयाच्या प्रश्नपत्रिकेतही तशाच घटनेची पुनरावृत्ती झाल्यानं पुन्हा एकदा नवीन प्रश्नपत्रिका पाठवण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढवली आहे.

कुठल्याही महाविद्यालयात प्रश्नपत्रिका पाठवल्यानंतर त्या महाविद्यालयाचे प्राचार्य कॅमेऱ्यासमोर आणि चार प्राध्यापकांसमोर त्या सीलबंद प्रश्नपत्रिका उघडतात. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचं वाटप केलं जातं. अशात एमबीबीएस पेपरफुटी प्रकरणी विद्यापीठानं चौकशीसाठी विद्यापीठस्तरीय समिती नेमली आहे. तसंच सर्व केंद्रावरील सीसीटीव्हीचे फुटेज विद्यापीठानं तात्काळ जमा करून ताब्यात घेतले असून त्याची तपासणी सुरू आहे.

> "विद्यापीठामार्फत एमबीबीएसची परीक्षा सुरू आहे. यावेळी आम्हाला पेपर लीकसंदर्भात मेल आला होता. तत्काळ याची नोंद घेऊन द्वितीय वर्ष एमबीबीएस या अभ्यासक्रमाच्या पॅथॉलॉजी २ या विषयाची नवीन प्रश्नपत्रिका सर्व परीक्षा केंद्रावर पाठवण्यात आली. या प्रकरणी पोलिसात नव्यानं तक्रार दाखल करणार आहे,"
>
> **— डॉ.संदीप कडू,** आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक

## केज येथील सरपंचाची हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** बीडच्या केजमध्ये सरपंचाची अपहरण करून हत्या करण्यात आली. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंचाचं भर दुपारी रस्त्यावरुन अपहरण करण्यात आलं. त्यानंतर त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेमुळं बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाल्याचं बघायला मिळतंय. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख आणि त्यांचे आतेभाऊ शिवराज देशमुख केज हून मस्साजोगच्या दिशेनं जात असताना डोणगाव फाट्याजवळ सहा अनोळखी व्यक्तींनी त्यांची गाडी थांबवली. त्यांनी सरपंचांना मारहाण केली.

## फ्रान्समध्ये जल्लोश

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पॅरिस :** फ्रान्समधील पॅरिसमध्ये सीरियन बंडखोरांनी राष्ट्राध्यक्ष बशर अल-असाद यांना पदच्युत केल्याची घोषणा केल्यानंतर, येथे जल्लोश साजरा केला गेला.

# हिंदू केवळ मतांसाठी हवाय संजय राऊत यांचा हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत असून मंदिरावर हल्ले होत आहेत. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाहांना हिंदू केवळ मतांसाठी हवाय, असा हल्लाबोल उबाठा खासदार संजय राऊत यांनी केला. यावेळी त्यांनी पराभूत झालेल्या उमेदवारांवरुनही मोठं भाष्य केलं आहे. "ईव्हीएमवरुन आगामी काळात आंदोलन करण्यासाठी शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांची एकत्र बसून चर्चा होईल, त्यानंतर आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल," असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

बांगलादेशात हिंदूंवर मोठ्या प्रमाणात हल्ले होत आहेत. काही ठिकाणी मंदिरांची तोडफोड करण्यात आली आहे. यावरुनही उबाठा खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यावर हल्लाबोल केला. "बांगलादेशात मोठ्या प्रमाणात हिंदूंवर अत्याचार करण्यात येत आहेत. हिंदूंची मंदिरं पाडण्यात येत आहेत. मात्र अद्यापही सरकारनं याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना हिंदू केवळ मतांसाठी हवे आहेत," अशी टीका संजय राऊत यांनी केली.

"मारकडवाडी इथं ईव्हीएमविरोधात आंदोलन उभं राहिलं आहे. आगामी काळात ज्या उमेदवारांना विजयाचा विश्वास होता, मात्र निवडणुकीच्या निकालात ते पराभूत झाले, अशांना घेऊन आंदोलन उभं करण्यात येईल. त्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेते तथा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची एकत्र बसून बैठक होईल.

# मेहुल चोक्सीची २५६४ कोटींची मालमत्ता विकणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पीएनबी घोटाळा प्रकरणी फरार उद्योगपती मेहुल चोक्सीची २५६५ कोटींहून अधिक किमतीची मालमत्ता विकण्यास मुंबईतील विशेष न्यायालयाने परवानगी दिली आहे. मेहुल चोक्सीची मालमत्ता विकून या घोटाळ्यातील पीडितांना पैसे परत केले जातील. ईडी अनेक दिवसांपासून कोर्टात यासाठी प्रयत्न करत होती. मनी लॉन्ड्रिंगच्या तपासादरम्यान ईडीने माहुल चोक्सीची मालमत्ता जप्त केली होती.

प्रभावित बँका आणि ईडीच्या याचिकेवर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. गीतांजली जेम्स लिमिटेडच्या अनेक मालमत्ता विकून आतापर्यंत १२५ कोटी रुपये लोकांना परत करण्यात आले आहेत. यामध्ये मुंबईतील फ्लॅट, दोन कारखाने आणि गोदामांचा समावेश होता. चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदी हे २०१८ मध्ये समोर आलेल्या पीएनबी घोटाळ्यातील मुख्य आरोपी आहेत.

फरार आर्थिक गुन्हेगार कायद्यानुसार, ज्या व्यक्तीच्या विरोधात भारतातील न्यायालयाने सूचीबद्ध केलेल्या गुन्ह्यासाठी वॉरंट जारी करण्यात आले आहे आणि "फौजदारी खटला टाळण्यासाठी देश सोडला आहे किंवा परदेशात राहून फौजदारी खटल्याला सामोरे जाण्यास नकार दिला आहे", त्याला फरार आर्थिक गुन्हेगार म्हणून घोषित केले जाऊ शकते.

# वीजचोरीविरोधात महावितरणची कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशात अन् राज्यात वीज चोरीसाठी नागरिक नेहमीच विविध शक्कल लढवताना पाहायला मिळतात. यामुळे महावितरणाचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात नुकसान होते. मात्र आता वीज चोरीच्या विरोधात कोल्हापुरात महावितरण ॲक्शन मोडवर आलीय. कमी वीज गळती आणि महसूल वसुलीसाठी कायम राज्यात आघाडीवर असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत वीज चोरीच्या प्रमाणात काहीशी वाढ झालीय. या वीज चोरीच्या विरोधात महावितरणने गंभीर दखल घेत आतापर्यंत ६३ वीज चोरांच्या विरोधात गुन्हे दाखल केलेत. त्यामुळे कोल्हापूर आणि सांगलीत वीज चोरांचे धाबे दणाणलेत.

राज्यात अनेक ठिकाणी वीज चोरीच्या प्रमाणात वाढ झालीय. यामध्ये सर्वाधिक मराठवाडा भागातील बीड, उस्मानाबाद यांसारख्या जिल्ह्यांचा समावेश आहे. तसेच राज्यात वीज गळती रोखण्यात आणि महसूल वसुलीत कोल्हापूर जिल्हा अव्वल आहे. मात्र गेल्या काही वर्षांत कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातही वीज चोरीचे प्रमाण वाढू लागल्याचे आकडेवारीतून समोर येतंय. गेल्या तीन वर्षांत तर कोल्हापूर जिल्ह्यात वीज चोरीचा आलेख वाढत चाललाय, यामुळे महावितरणाचे नुकसान होत असल्याने ही गंभीर बाब लक्षात घेत महावितरणाने कठोर पाऊल उचलण्यास सुरुवात केलीय. एका बाजूला प्रामाणिक वीजबिल भरणाऱ्यांची संख्या ही कोल्हापूर जिल्ह्यात मोठी आहे.

## कोळेवाडी ग्रामपंचायतीचा ठराव

# साताऱ्यातही बॅलेट पेपरची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सातारा :** कराड दक्षिण मतदारसंघातील कोळेवाडी ग्रामपंचायतीनं सोमवारी ग्रामसभेत ईव्हीएम विरोधात ठराव घेऊन बॅलेट पेपरवरच निवडणुका घेण्याची मागणी केली आहे. ईव्हीएम विरोधात घेण्यात आलेला हा देशातील पहिला ठराव आहे. त्यामुळं ईव्हीएम विरोधात वातावरण वाढत चाललं आहे. कराड दक्षिणमध्ये ७० वर्षांनी काँग्रेस उमेदवाराचा पहिल्यांदाच पराभव झाला असून यंदा भाजपाचा उमेदवार निवडून आला आहे.

कोळेवाडी ग्रामपंचायतीनं ईव्हीएम विरोधात ठराव घेताना यापुढील सर्व निवडणुका बॅलेट पेपरवरच घेण्याची मागणी केली आहे. ईव्हीएममुळं मतदान प्रक्रियेवर संशयाचं वातावरण निर्माण होतंय, त्यामुळं आमचा ईव्हीएमवर विश्वास नाही. लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संशयविरहित मतदान आवश्यक असल्याच्या ग्रामस्थांच्या भावना आहेत.

देशात संसदीय लोकशाही आहे, लोकशाहीत निवडणूक आणि मतदान ही संवैधानिक प्रक्रिया आहे. यापूर्वी मतपत्रिकेवर मतदान घेतलं जात होतं. त्यावेळी आत्ता सारखं संशयाचं वातावरण कधीच निर्माण झालं नव्हतं. ईव्हीएमवरील निवडणूक प्रक्रिया संशयाच्या फेऱ्यात अडकली आहे. हे लोकशाहीसाठी मारक आहे. वेळ खाऊ प्रक्रिया असली तरी पूर्वीप्रमाणे मतपत्रिकेवरच निवडणुका घ्याव्यात, असंही कोळेवाडी ग्रामपंचायतीनं ठरावात म्हटलं आहे.

## उत्तर भारतात थंडी, तर दक्षिणेत पाऊस

# आता पावसाबरोबरच थंडीची लाट येणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** एकीकडे देशात पावसाने लोक त्रस्त झाले असताना, उत्तर भारतातील अनेक भागात धुके आणि थंडीच्या लाटेचा सामना करावा लागणार आहे. दक्षिण भारतातील तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि केरळसह इतर भागात मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या डीप डिप्रेशनमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर भारतात जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि राजस्थानसह अनेक भागात थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. नैर्ऋत्य आणि आग्रेय बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचा पट्टा पुढील २४ तासांत तामिळनाडू आणि श्रीलंकेच्या किनारपट्टीकडे सरकण्याची शक्यता आहे. त्याच्या प्रभावामुळे तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि केरळमध्ये १० ते १३ डिसेंबर दरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

वायव्य भारतात किमान तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअसने घट झाली आहे. हरियाणा आणि राजस्थानच्या काही भागात किमान तापमान ४.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. थंडीची लाट आणि धुक्यामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानमध्ये थंडीची लाट कायम राहील. तर हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये १० ते १२ डिसेंबर दरम्यान जमिनीवर थंडी पडण्याची शक्यता आहे. बिहार, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेशच्या अनेक भागात दाट धुक्यामुळे दृश्यमानता ५० मीटरपेक्षा कमी असू शकते.

हिमवृष्टीमुळे हिमाचलमध्ये थंडीची लाट कायम

हिमाचल प्रदेशात नुकत्याच झालेल्या बर्फवृष्टीमुळे थंडीची लाट उसळली असून पारा सरासरीपेक्षा पाच ते सात अंशांनी खाली घसरला आहे. लाहौल स्पितीमधील ताबो येथे उणे १२.७ अंश सेल्सिअस, केलांग जिल्हा मुख्यालयात उणे ९.० अंश सेल्सिअस, कुकुसेरी येथे उणे ८.३ अंश सेल्सिअस, कल्पा (किन्नौर) येथे उणे ५.४ अंश सेल्सिअस, समधो येथे उणे ७.४ अंश सेल्सिअस, कुल्लूयेथील पर्यटन स्थळ मनाली येथे उणे २.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

#रा

## दिलीप वळसे पाटील यांची प्रतिक्रिया

# मंत्रीपद मिळाले तर आनंदच आहे

विधानसभेचे अध्यक्षपद देखील त्यांनी उत्कृष्टरित्या भूषवले. सुसंस्कृत, उच्चशिक्षित, संयमी, शांत अशी वळसे पाटील यांची ओळख आहे. राज्यात विविध मंत्री पदांवर काम करताना त्यांनी मतदार संघातही कोट्यावधी रुपयांची विकास कामे केलेली आहेत. तालुक्यातील विकास कामांसाठी निश्चित फायदा झालेला आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातून सलग आठव्यांदा निवडून गेलेले आमदार दिलीप वळसे पाटील यांनी मंत्रीपद मिळाले तर आपणास आनंदच होईल, असे म्हटले आहे.

प्रकृतीबाबत विचारणा केली असता वळसे पाटील म्हणाले की, मला मध्यंतरी छोटा अपघात होऊन खुब्याला फ्रॅक्चर झाले होते. त्यामुळे मी चार महिने हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले. लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात देखील मला सहभागी होता आले नाही. परंतू आता तब्येत उत्तम आहे. दुसरा कोणताही मला आजार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील हे सलग आठव्यांदा आंबेगाव - शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडून गेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवारांची साथ सोडली व ते अजित पवार गटातून निवडणूक लढले. हे सलग आठव्यांदा निवडून आले. दिलीप वळसे पाटील यांनी मंत्रिमंडळातील उर्जा, अर्थ, उच्च तंत्र शिक्षण, कामगार, गृह, सहकार अशी मोठी खाती उत्तमरित्या सांभाळली आहेत. कॅबिनेट मंत्रीपदी काम करताना त्यांनी चांगले निर्णय देखील घेतले आहेत.

### वळसे पाटील निश्चित कॅबिनेट मंत्री होणार

● महायुतीच्या सरकारमध्ये दिलीप वळसे पाटील हे कॅबिनेट मंत्री निश्चित होणार, अशी चर्चा सध्या मतदारसंघात आहे. उत्तर पुणे जिल्ह्याला वळसे पाटील यांच्या रूपाने मंत्रिपद निश्चित मिळेल. मंत्रिपदामुळे खेड, जुन्नर, आंबेगाव, शिरूर या तालुक्यांमधील विकास कामे निश्चित मार्गी लागतील, अशी भावना मतदारसंघात आहे.

### आता तब्येत उत्तम आहे

● मला मध्यंतरी छोटा अपघात होऊन खुब्याला फ्रॅक्चर झाले होते. त्यामुळे मी चार महिने हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले. परंतू आता तब्येत उत्तम आहे.

विधानसभेचे अध्यक्षपद देखील त्यांनी उत्कृष्टरित्या भूषवले. सुसंस्कृत, उच्चशिक्षित, संयमी, शांत अशी वळसे पाटील यांची ओळख आहे. राज्यात विविध मंत्री पदांवर काम करताना त्यांनी मतदार संघातही कोट्यावधी रुपयांची विकास कामे केलेली आहेत. वळसे पाटील यांना मिळालेल्या सर्वच मंत्रीपदांचा तालुक्यातील विकास कामांसाठी निश्चित फायदा झालेला आहे. त्यामुळे या महायुतीच्या सरकारमध्ये देखील वळसे पाटील यांना कॅबिनेट दर्जाचेच मंत्रीपद मिळावे, अशी मतदारसंघातील जनतेची इच्छा आहे.

## ओतूरची ग्रामसभा खेळीमेळीत

**ओतूर :** (ता. जुन्नर) ग्रामपंचायतची तहकूब ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात सरपंच प्रा. डॉ. छायाताई तांबे यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजीराव आढळराव पाटील सभागृहात संपन्न झाली.

सोमवारी (दि. ९) झालेल्या ग्रामसभेत मागील सभेचा वृत्तान्त वाचून कायम करण्यात आला. याशिवाय ग्रामपंचायतच्या सरकारी गायरान जमिनी ताब्यात घेऊन वेगवेगळ्या प्रकल्पासाठी त्यांचा वापर करण्यात येण्यासाठी ठराव करण्यात आला. वैयक्तिक लाभार्थी निवड, गैरहजर अधिकारी आणि अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. सरपंच प्रा. डॉ. छायाताई तांबे, उपसरपंच प्रशांत डुंबरे, ग्रा. पं. सदस्य दिलीप डुंबरे, गोरक्ष फापाळे, आशिष गोंदके, राजू वाकर, सदस्या मनीषा वारे, पशुवैद्यकीय अधिकारी काशिनाथ लाड, तंटामुक्ती अध्यक्ष जयवंत डुंबरे, मधुकर डुंबरे, आदी या वेळी उपस्थित होते.

## » Selected

## जारकरवाडी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी गणेश खुडे



**रांजणी:** जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी गणेश शिवाजी खुडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. सुभाष मारूती भोजने यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त जागेवर गणेश खुडे यांची निवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत लबडे, पुणे जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षा अॅड रूपाली भोजने, खंडूशेठ भोजने, डीडी भोजने, संतोष कापडी, संतोष विधाटे, बाळु शंकर लबडे, अशोक धानापुणे, बाबाजी देवडे, लक्ष्मण हरिभाऊ भोजने, एकनाथ भोजने, सुनील खुडे, विश्वनाथ खुडे आदी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्ही. वाघमारे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संस्थेचे सचिव नवनाथ मंचरे यांनी काम पाहिले. उपस्थितांच्या हस्ते नवनिर्वाचित उपाध्यक्ष गणेश खुडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## श्री क्षेत्र अगस्ती ऋषी आश्रम दिंडीचे आंबेगावात स्वागत



**रांजणी :** विश्व चैतन्य परमपूज्य सद्गुरु नारायण महाराज (श्री क्षेत्र नारायणपूर ) यांच्या कृपाशीर्वादाने सुरु झालेल्या श्री क्षेत्र अगस्ती ऋषी आश्रम अकोले ते श्रीक्षेत्र नारायणपूर या भव्य पायी दिंडी पालखी सोहळ्याचे आंबेगाव तालुक्यात उत्साहात स्वागत करण्यात आले. दत्त जयंती सोहळ्यानिमित्त या दिंडी सोहळ्याचे आयोजन केले जाते. दिंडी सोहळ्याचे यंदाचे १२ वे वर्ष आहे. श्रीक्षेत्र अगस्ती ऋषी आश्रम अकोले येथून शुक्रवारी प्रस्थान झाले. सोमवारी दिंडी सोहळ्याचे आंबेगाव तालुक्यात आगमन झाले. दिंडी सोहळ्याचे प्रमुख मार्गदर्शक ज्ञानदेव माऊली देशमुख, रत्नाकर देशमुख,अध्यक्ष राहुल हसे,उपाध्यक्ष भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. वळती गावात भागवताचार्य हभप बाळासाहेब महाराज गायकवाड यांच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना चहा नाश्ता देण्यात आला. सायंकाळी शिंगवे ग्रामस्थांनी दिंडी सोहळ्याचे स्वागत केले. शिंगवे गावातील रत्नाकर वाव्हळ, पोलीस पाटील गणेश पंडित, माजी उपसरपंच संतोष वाव्हळ, बाळासाहेब उनवणे, लताबाई वरे, गयाभाऊ गाढवे यांच्यावतीने वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले. मंगळवारी सकाळी पारगाव येथे ग्रामपंचायत सदस्य दत्ताराम वैद, माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, गणेश निघोजकर, सोमनाथ निघोजकर, मल्हारी रोडे यांनी दिंडी सोहळ्याचे स्वागत करून त्यांच्या वतीने वारकऱ्यांना चहा नाश्ता देण्यात आला.

# बटाट्याच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी चिंतेत

## आंबेगाव पूर्वेला बटाटा काढणी अंतिम टप्प्यात; शेतकरी अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** बटाट्याच्या दरात मोठी घसरण झाले आहे. त्यामुळे बटाटा उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बटाटा काढणी आता अंतिम टप्प्यात झाली असून, सध्या मिळणाऱ्या बाजारभावातून बटाटा पिकासाठी गुंतविलेले भांडवल वसूल होणार नसल्याने बटाटा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

तालुक्याच्या पूर्व भागात शिंगवे, पारगाव, काठापूर या भागात बटाटा काढणीची कामे आता अंतिम टप्प्यात आली आहेत. यंदा सुरुवातीला बटाट्याला बाजारभाव चांगला मिळाला होता. १० किलोला ३२० रुपये बाजारभाव मिळाला. परंतू त्यानंतर बटाट्याच्या बाजारभावात झपाट्याने घसरण होत गेली. सोमवारी (दि. ९) शिंगवे येथे व्यापाऱ्यांनी बावीस रुपये किलो दराने शेतकऱ्यांकडून बटाटे खरेदी केले होते. परंतू मंगळवारी मात्र बाजारभावात आणखी चाळीस ते पन्नास रुपयांनी घसरण झाली. व्यापाऱ्यांनी १५ ते १७ रुपये किलो दराने बटाटे खरेदी केले.



शिंगवे ( ता .आंबेगाव ) परिसरात बटाटा काढणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत . (छाया:रोहीत खुडे )

> "शेतकऱ्यांनी टिशू कल्चरचे महागडे बटाटा बियाणे खरेदी करून बटाटा लागवडी केल्या होत्या. त्यानंतर ऑक्टोबर हिटचा परिणाम बटाटा पिकावर होऊन लाल कोळी, करपा रोगांचा प्रादुर्भाव झाला. यासाठी महागड्या औषधांची फवारणी बटाट्यावर करावी लागली. उत्पादन खर्चात वाढ झाल्याने शेतकऱ्यांना चांगल्या बाजारभावाची आशा होती. सुरुवातीला बाजारभाव देखील चांगले मिळाले. परंतू बाजारभाव स्थिर राहीले नाहीत. त्यामध्ये झपाट्याने घसरण होत गेली.
>
> **— देविदास वाव्हळ, बटाटा उत्पादक शेतकरी, शिंगवे.**

# नितीन गडकरींची भेट घेऊन टाव्हरे यांनी मानले आभार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर:** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले प्रसिध्द श्री क्षेत्र भीमाशंकरला जोडणारे रस्त्यांसाठी केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी २३४९ कोटी रूपयांचा निधी मंजुर केल्याबद्दल भाजपचे नेते अशोक टाव्हरे व उद्योजक रमेश दौंडकर यांनी दिल्ली येथील परिवहन भवन येथे गडकरी यांची भेट घेऊन आभार मानले व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग ६० वरील भीमाशंकर-तळेघर-वाडा-राजगुरूनगर आणि जुन्नर-घोडेगाव-तळेघर या दोन विभागांच्या पेव्हड शोल्डरसहित इंटरमिडिएट लेनपासून २-लेन रुंदीकरण, पुनर्बांधणी व अपग्रेडिंगसाठी २३४९.३२ कोटी रुपयांच्या निधीसह मंजुरी देण्यात आली आहे. या विभागातील १२ ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर आणि जुन्नर शहराजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेला ऐतिहासिक शिवनेरी किल्ला हे या रस्ते प्रकल्पातील महत्त्वाचे दुवे आहेत. या प्रकल्पांमुळे अष्टविनायक मंदिरांपैकी एक ओझर येथील श्री गणेश मंदिर, भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य, डिंभे धरण आणि चासकमान धरण यांच्याशी कनेक्टिव्हिटी सुधारेल असे गडकरी यांनी सांगितल्याचे टाव्हरे यांनी सांगितले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात गडकरी यांनी नाशिक फाटा ते राजगुरूनगर या ३२ किमी रस्त्यांसाठी ७५०० कोटी रूपयांच्या निधीला मंजुरी दिली होती, तेव्हाही टाव्हरे यांनी गडकरींची दिल्ली येथे भेट घेऊन आभार मानले होते.



**आभार :** संसदेच्या अधिवेशनात गडकरी यांनी नाशिक फाटा ते राजगुरूनगर या ३२ किमी रस्त्यांसाठी ७५०० कोटी रूपयांच्या निधीला मंजुरी दिली, तेव्हाही टाव्हरे यांनी गडकरींचे आभार मानले होते.

## भिगवणमधील रस्त्यांसाठी ४० लाखांचा निधी

**भिगवण :** पुणे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत भिगवणमधील रस्त्यांच्या कामाकरिता ४० लाख रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती सरपंच दीपिका क्षीरसागर यांनी दिली. अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या अंतर्गत ही कामे मंजूर झाली असून यामध्ये साईनगर परिसर (वार्ड क्र. २) १० लाख रुपये, शिवाजीनगर परिसर (१० लाख रुपये), रो हाऊस परिसर (वार्ड क्र. ४) १० लाख रुपये आणि स्वामी विवेकानंद नगर (वार्ड क्र. ४) १० लाख रुपये याप्रमाणे सुमारे ४० लाख रुपयांचा निधी रस्त्यांच्या कामासाठी मंजूर झाला आहे. हा निधी ज्या कामासाठी मंजूर झालेला आहे त्याच कामासाठी खर्च करता येणार आहे. इतर कामासाठी तो खर्च करता येणार नसल्याचे नमूद आहे.

## पोलीस अधिक्षकांनी घेतला शौर्यदिन नियोजनाचा आढावा



**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा येथे एक जानेवारी रोजी होणाऱ्या शौर्यदिनाच्या तयारी साठी प्रशासन सज्ज झालेले असून, आज नुकतेच पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी परिसराला भेट देत नियोजनाचा आढावा घेत पोलीस अधिकाऱ्यांना योग्य सूचना केल्या आहेत. कोरेगाव शिरुरसह शिक्रापूर येथे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी भेट देत विजयस्तंभ परिसर पाहणी करत शौर्यदिन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला. यावेळी शिरुर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, खेड उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस, शिक्रापूरचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, रांजणगावचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांसह आदी उपस्थित होते. पंकज देशमुख यांनी शिक्रापूर येथून समाज बांधवांसाठी असलेल्या बसेस व्यवस्थेबाबत माहिती घेऊन समाज बांधवांना कशा पद्धतीने आसन व्यवस्था तसेच प्रवास सोपा होईल याबाबत चर्चा करत प्रत्येक पार्किंग मध्ये जाणाऱ्या समाज बांधवांसाठी स्वतंत्र कक्ष करण्याबाबत योग्य सूचना पोलीस अधिकाऱ्यांसह आदी विभागाला दिल्या आहे, तर आज पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी शिक्रापूर येथील प्रत्येक पार्किंगच्या ठिकाणी देखील भेट देत पाहणी करुन नियोजनच्या पूर्व तयारीचा आढावा घेतला आहे.

# औद्योगिक वसाहतीमध्ये बेकायदेशीर माथाडी

### रांजणगाव येथे विषय ऐरणीवर



रांजणगाव औद्योगिक वसाहती मधील कंपन्या व गोडाऊनच्या बाहेर वाहनांच्या अशा रांगा लागलेल्या असतात.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील बेकायदेशीरपणे चालवण्यात येत असलेल्या माथाडीचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या बेकायदेशीर माथाडीला कंपन्यांच्या काही अधिकाऱ्यांचा व प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा छुपा पाठिंबा तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होत आहे. रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील काही कंपन्यांच्या बाहेर बेकायदेशीरपणे पावती पाडणाऱ्या काही बोगस माथाडी माफीयांवरती रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये वाहन चालकांनी केलेल्या तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेले अनेक दिवस हा प्रकार बंद होता. मात्र, विधानसभा निवडणुकीचा धुराळा खाली बसताच, या बोगस माथाडी माफियांनी पुन्हा आपले डोके वर काढले असून, माल वाहतूक करण्यासाठी आलेल्या वाहन चालकांना गाड्या अडवून नाहक त्रास दिला जात आहे.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील वाहनतळासाठीच्या आरक्षित जागा औद्योगिक विकास महामंडळाने आरक्षण बदलून उद्योजकांच्या घशात घातल्याने, वाहन चालकांना कंपन्यांच्या गेट समोरच वाहने लावल्याशिवाय पर्याय नाही. याचाच फायदा घेऊन हे बोगस माथाडी माफिया कंपन्यांमधील व प्रशासनातील काही झारीतील शुक्राचार्यांना हाताशी धरून या वाहनचालकांना लुटण्याचे काम करत आहेत. या बोगस माथाडी माफीयांच्या पोलीस प्रशासनासह माथाडी महामंडळ व कंपनी बंदोबस्त करणार का? या बोगस माथाडी माफीयांचा बंदोबस्त केला नाही, तर रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये कंपन्यांमधील मालवाहतूक करणाऱ्या वाहन चालकांचा कायदा सुव्यवस्थेवरील विश्वासच राहणार नाही, अशी प्रतिक्रिया एका पीडित वाहन चालकाने दिली आहे. संबंधित वाहन चालक जेवणासाठी पैसे नसल्याने, व मालकाचा फोन लागत नसल्याने संपूर्ण दिवस उपाशी राहिला होता. कारण जवळचे सगळे पैसे माथाडी माफीयांनी दमदाटी करून काढून घेतले होते.

# जिजामातामध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** या वर्षीचे पुरंदर तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन जेजुरी येथील जिजामाता इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये दिनांक २६ व २७ डिसेंबर रोजी होणार असून त्या अनुषंगाने ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन तयारी नियोजन व गुणवत्ता संवर्धन तपासणी अभियान बैठक संपन्न झाली असल्याचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सरिता कपूर यांनी सांगितले.

पुरंदर तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन जेजुरी येथे होणार असून, या प्रदर्शनाच्या नियोजनासाठी तालुक्यातील मुख्याध्यापक व विज्ञान शिकण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर, सेकंडरी पतसंस्थेचे अध्यक्ष सुधाकर जगदाळे, तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दिलीप नेवसे, मुख्याध्यापक भगवंतराव बेंद्रे, मारुती झगडे आदी उपस्थित होते.

या बैठकीत विज्ञान प्रदर्शन तयारी नियोजन ,गुणवत्ता संवर्धन तपासणी नियोजन, विज्ञान प्रदर्शनमध्ये घेतल्या जाणाऱ्या वकृत्व स्पर्धा, निबंध, स्पर्धा,आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा या विषयवार चर्चा करण्यात आली. निबंध स्पर्धा इयत्ता सहावी ते आठवी गट विषय - माझा आवडता शास्त्रज्ञ, मानवी जीवनातील स्वच्छतेचे महत्व वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन. इयत्ता नववी ते बारावी गट विषय -मोबाईल शाप की वरदान, अंतराळ संशोधनात भारताची भूमिका -चांद्रयान मोहीम ,पर्यावरण संवर्धन काळाची गरज . वक्तृत्व स्पर्धा इयत्ता सहावी ते आठवी विषय - जलसंवर्धन काळाची गरज,प्रदूषण आणि मी,अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोन इयत्ता नववी ते बारावी गट विषय - महापुरुष चौकटीतील का देशाचे?, माझ्या स्वप्नातील उद्याचा भारत, आजची वास्तव शिक्षण पद्धती, विज्ञान प्रदर्शनावेळी प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात येणार आहे.

## श्रीकांत इंगळहळीकर यांनी दिली रोचक माहिती

# कऱ्हा नदीच्या काठी कृष्णेची कहाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख असणाऱ्या कृष्णा नदीचा उगम, तिचा महाराष्ट्रातून कर्नाटक पर्यंतचा प्रवास, मार्गावरील विविध गावे, काठावरील मंदिरे आणि त्यांची वैशिष्ट्ये याचे सुरेख वर्णन दृकश्राव्य माध्यमातून करत सासवडकर नागरिकांना कृष्णेबद्दल उपयुक्त माहिती मिळाली. निमित्त होते सासवड येथील पुरातन कऱ्हाबाई मंदिरातील व्याख्यानाचे.. आणि ही महत्वपूर्ण माहिती सादर केली होती पक्षी, प्राणी, नदी यावर विशेष प्रेम करणारे कृष्णा परिक्रमा या पुस्तकाचे लेखक श्रीकांत इंगळहळीकर यांनी.

कृष्णा नदीची आरती करून या व्याख्यानाचा प्रारंभ झाला. आपल्या मनोगतात श्रीकांत इंगळहळीकर यांनी कृष्णेचां उगम क्षेत्र महाबळेश्वर धोम धरण, भोगाव, मेणवली, वाई, सोनेश्र्वर, भुईंज, उडतारे, लिंब, संगम माहुली, ते खिद्रापूर व नंतर कर्नाटक मधील प्रवास कथन केला. विविध मंदिरांसह सुमारे ५४ नद्यांचा शोध घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. सासवडकर व नदीचे अगदी जवळचे नाते असुन माझा हा पहिलाच प्रयोग येथे होत असल्याचां आनंद आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. हल्ली नद्या बारमाही वाहत नाहीं अशी खंत व्यक्त करत त्यांनी कालवे नदीची सवत होत असल्याचे सांगितले. उपस्थित प्रेक्षकांच्या प्रश्नांना त्यांनी यावेळी उत्तरे दिली. माजी नगराध्यक्ष जयसाहेब पुरंदरे यांनी त्यांचें स्वागत केले. सुमनताई किर्लोस्कर यांनी परिचय करुन दिला तर अॅड अण्णासाहेब खाडे यांनी आभार व्यक्त केले. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, सासवड साहित्य परिषद अध्यक्ष अॅड दिलिप निरगुडे, माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे, डॉ राजेश दळवी, संजय काटकर, अमित पावसे, जयश्री कुलकर्णी, मंजुषा निरगुडे, डॉ संजय रावळ, तानाजी सातव, मयुर भागवत, विश्वास पानसे, शुभानन चिंचकर, स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे सचिव हेमंत ताकवले, नाना पुरंदरे यांसह अनेक पर्यावरणप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.



#रा

## उंच उडीत शिक्षकांनी हाताने धरलेल्या काथ्यावरून विद्यार्थ्यांच्या उड्या

# कसे होणार ऑलिंपिकसाठीचे खेळाडू तयार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. यावेळी या स्पर्धा घेत असताना विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही क्रीडा साहित्याची अथवा अद्यावत मैदानाची उपलब्धता नसल्याने या स्पर्धा केवळ फार्स ठरल्या असल्याने येथे मुलांनी, पालकांनी व विशेषता महिला शिक्षकांनी या स्पर्धेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा पद्धतीने स्पर्धा आयोजित केल्या जात असतील, तर आपल्या देशातून ऑलिंपिकसाठी खेळाडू कसे तयार होणार, अशी भावना स्पर्धक तसेच शिक्षक यांनी बोलून दाखवली.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

शिवरी (ता. पुरंदर) येथे वाळुंज केंद्राच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी येथे केंद्रा अंतर्गत जवळपास ११ शाळेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवला होता. या वेळी खो-खो, वक्तृत्व, लोकनृत्य, धावणे, लांब उडी, उंच उडी, बुद्धिबळ, प्रश्नमंजुषा, कविता गायन, वेषभूषा, लंगडी, लिंबू चमचा, बेडूक उडी, समुहगीत यासारख्या स्पर्धा घेण्यात आल्या.



शिवरी येथे क्रीडा स्पर्धेत उंचउडीत दोन्ही बाजूला शिक्षकांनी हाताने धरलेल्या काथ्यावरून उड्या मारताना विद्यार्थी. (छायाचित्रः निलेश भुजबळ, वाल्हे)

या स्पर्धेच्या निकालाबाबतही शिक्षकांनी प्रश्नचिन्हे उपस्थित केला असून, परीक्षकांनी दिलेल्या निकालामध्येही केंद्रप्रमुखांनी हस्तक्षेप करीत निकाल बदलला असल्याच्या तक्रारीही शिक्षक करीत आहेत. त्यामुळे निकाल त्याच दिवशी जाहीर न होता तो दुसऱ्या दिवशी उशिरा जाहीर करण्यात आला. यावेळी या स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थी हे आपल्या शाळास्तरावर यश संपादन करून येथे केंद्रस्तरावर आले होते. या वेळी येथेही या स्पर्धेत बाजी मारण्याबाबत त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद जाणवत होता. मात्र, येथे ही स्पर्धा होत असताना अनेक सुविधांचा अभाव जाणवला.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार केंद्र शाळेमध्ये अशा स्पर्धा घेण्यासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य उपलब्ध आहे. मात्र, या स्पर्धेसाठी सदर कोणतेही साहित्य उपलब्ध केले गेले नाही. याबाबत शिक्षकांशी चर्चा केली असता त्यांनी या स्पर्धेसाठी आम्हाला आवश्यक कोणतीही साधन सामग्री उपलब्ध झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. अगदी मैदानावरचे खडेदेखील वेचले गेले नव्हते. अशा परिस्थितीत मुले आपले कौशल्य दाखवत होती. यातून काही मुलांना दुखापत झाली तेव्हा त्यांच्यासाठी प्रथमोपचार सुविधाही उपलब्ध नसल्याने, या महिला शिक्षकांनी तसेच सहभागी विद्यार्थी व त्यांच्या पालकांनीही या स्पर्धेबाबत तीव्र संताप व्यक्त केला. केंद्रशाळेत साहित्य उपलब्ध असून त्याचा वापर होत नसेल, तर याचा उपयोग काय? असा प्रश्नही शिक्षकांनी उपस्थित केला.

> "या क्रीडा स्पर्धा होत असताना त्या व्यवस्थित पार पडाव्यात यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध होते. या माध्यमातून मैदानावरच्या सुविधा, मुलांना खाऊ, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन प्रोत्साहित करावे. काही रक्कम कमी पडली तर लोकवर्गणीचाही वापर आयोजक करू शकतात.
> — **संजय जाधव, प्रभारी गटशिक्षणाधिकारी पुरंदर**

### विदारक सत्य...

- अद्यावत मैदान, सर्व खेळांसाठी नियोजित मैदानावरती फक्कीचा वापर होणे, प्रत्येक खेळासाठी आवश्यक असणारे क्रीडा साहित्य उपलब्ध असणे गरजेचे होते. मात्र यातील कोणतेही साहित्य येथे उपलब्ध नसल्याचे जाणवले.
- उंच उडी साठी आवश्यक असणारे स्टॅन्डही येथे नव्हते. यासाठी दोन शिक्षिका हातामध्ये दोन्ही बाजूला काथ्या धरून उभ्या होत्या व त्यावरून मुले उड्या मारत होती.
- अंतर मोजण्यासाठी मीटरटेपही उपलब्ध नव्हता अंतर मोजण्यासाठी काथ्याचाच वापर करण्यात आला.
- खो-खो, लंगडी स्पर्धेसाठी मैदानाची योग्य आखणी नव्हती, त्यासाठी फक्कीचा पुरेसा वापर नव्हता. तर दोन्ही बाजूला खांबा ऐवजी खुर्च्यांचा वापर केला होता.
- मुलांना पिण्याच्या शुध्द पाण्याची कोणतीही व्यवस्था येथे उपलब्ध नव्हती.
- प्रथमोपचार सुविधाही उपलब्ध नव्हती.
- मुलांना प्रोत्साहित करण्यासाठी साध्या लेमनच्या गोळ्याही उपलब्ध नव्हत्या, असे विदारक चित्र या ठिकाणी पाहायला मिळाले.

परिपत्रकानुसार येथे जवळपास दहा ते पंधरा स्पर्धा एकाच दिवशी घेण्याचे नियोजन होते. यामुळे प्रत्येक स्पर्धेसाठी आवश्यक असणारा वेळही मुलांना मिळत नव्हता. घाईगडबडीत या स्पर्धा खेळल्या जात होत्या, तरीही संध्याकाळी अंधार पडेपर्यंत या स्पर्धा तशाच सुरू होत्या. अगदी सायंकाळी उशिरा सुरू असणारी प्रश्नमंजुषा स्पर्धाही अंधारात पार पडली. या स्पर्धेसाठी शासन स्तरावरुन अनुदान मिळते, यामुळे या स्पर्धा होत असताना मुलांसाठी प्राथमिक सुविधा उपलब्ध करणे, यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करणे, प्रोत्साहन पर खाऊचे वाटप करणे या सुविधा केंद्र स्तरावर, बीट स्तरावर व तालुका स्तरावर होणाऱ्या स्पर्धेमध्ये उपलब्ध करणे आवश्यक आहे. मात्र, यातील कोणत्याही सुविधा येथे उपलब्ध होत नसल्याने अनुदान जाते कुठे? असा प्रश्न केंद्रातील शिक्षक उपस्थित करत आहेत.

## सोयाबीन चोरट्यांना जुन्नरमध्ये अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर लगतच्या पिंपळगाव सिद्धनाथ येथील शेतकऱ्याचे सात पोती सोयाबीनची चोरी करणाऱ्या जुन्नरमधील तीन चोरट्यांना त्यांनी चोरलेल्या मुद्देमालासह ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

सुयश सुनील जाधव (२०), विनायक सखाराम खुटाळ (२३), करण अनिल पंडित (२१, तिघे राहणार रविवार पेठ, बोडके नगर, बेळे आळी, जुन्नर) यांना या चोरी प्रकरणी अटक करण्यात आली आहे. संतोष खंडागळे या शेतकऱ्याने त्याच्या राहत्या घरात झालेल्या सोयाबीन चोरीची फिर्याद दाखल केली होती. त्यांनी राहत्या घराच्या ओट्यावर ठेवलेली सात पोती सोयाबीन, एक गहू पोते, एक मोबाईल ३ तारखेला रात्री या तिघांनी चलाखीने चोरून नेला होता.

# ऊस दर जाहीर न केल्याने उत्पादक नाराज

**गाळप हंगाम सुरू होऊन पंधरवडा झाला तरीही**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** नुकताच गळीत हंगाम सुरू झाला आहे. इंदापूर तालुक्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर ऊस शेती आहे. इंदापूर तालुक्यात तीन सहकारी साखर कारखाने आहेत त्यापैकी एक विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली तर दुसरे माजी आमदार आणि साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली चालत आहेत. तालुक्या लगत अनेक खासगी साखर कारखाने आहेत. गळीत हंगाम सुरू होऊन पंधरवडा उलटला तरी आद्यप तालुक्यातील कारखान्यांनी ऊस दर जाहीर केला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर पसरला आहे.



लगतच्या बारामती तालुक्यातील सोमेश्वर आणि माळेगावच्या धर्तीवर इंदापूर तालुक्यातील साखर कारखाने दर देणार का की त्याहून अधिकचा दर मिळणार याकडे आता उस उत्पादक शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत. त्यामुळे इंदापुरातील साखर कारखान्यांनी लवकर उसाचे दर जाहीर करून ऊस उत्पादकांना दिलासा देण्याची अपेक्षा शेतकऱ्यांनकडून व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्षपद इंदापूर तालुक्यात असल्याने आपसूकच शेतकऱ्यांना विक्रमी ऊस दर मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यांमध्ये दराबाबत स्पर्धा निर्माण होते की काय हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## PHOTO NEWS



# नारायणगावात आढळला मृत बिबट्या

**नारायणगाव :** नारायणगाव येथील पुणे - नाशिक महामार्गाच्या जवळ पाटे - खैरे मळा हद्दीतील उसाच्या शेताजवळ सोमवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पूर्ण वाढ झालेला सुमारे पाच वर्षे वयाचा नर बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. दोन बिबट्यांच्या झुंझीमध्ये या बिबट्याचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. मृत बिबट्याच्या शरीरावर कोणत्याही गंभीर स्वरूपाच्या जखमा आढळून आल्या नाहीत. त्यामुळे बिबट्याच्या मृत्यूचे निश्चित कारण सांगता येत नाही. दोन बिबट्यांच्या भांडणामुळे अथवा विषबाधेमुळे बिबट्या मृत झाला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. शवविच्छेदनासाठी मृत बिबट्याला माणिकडोह येथील निवारा केंद्रात हालवण्यात आले आहे, अशी माहिती वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार,आपदा मित्र सुशांत भुजबळ यांनी दिली.

## » Selected

## केंद्र सरकारच्या विविध लाभदायी योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा



**जुन्नर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली २०१४ पासून देशभरात विविध लाभदायी योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे करण्यात येउन या योजनांचा लाभ अनेक पात्र लाभार्थ्यांना थेटपणे मिळाला असून, लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा केली जात आहे. या पुढील काळात केंद्र व महाराष्ट्र राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थी पर्यंत मिळवून देण्याकामी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव वर्षा डहाळे यांनी केले.

जुन्नर तालुका भाजपा एकनिष्ठ कार्यकर्त्यांचा मेळावा श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संपन्न झाला. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित कार्यकर्त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. या प्रसंगी उल्हास नवले, सुनील शहा, मधुकर काठे, हरिष भवाळकर, गणेश बुट्टेपाटील, काशीनाथ औटी, दत्ता कोमने, अविनाश मोरडे, रामदास शिंदे, दत्ता डुंबरे, सुनंदा गाडगे, मनीषा पारेकर आदींसह पदाधिकारी बूथ प्रमुख तरुण, महिला उपस्थित होत्या.

## रक्तदान शिबिरचे यशस्वी आयोजन



**रांजणगाव गणपती :** येथील श्रीमहागणपती मंदिरामध्ये विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवप्रताप दिन अर्थात अफझलखान वध दिवस व रामभक्त कोठारी बंधू यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान शिबीर रविवारी आयोजित केले होते. या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. रांजणगाव शिक्रापूर परिसरातील शेकडो युवकांनी या ठिकाणी रक्तदान केले. शिक्रापूरसह रांजणगाव गणपती मधील बजरंगींनी उस्फुर्त प्रतिसाद देत १०९ ब्लड बँग देत रक्तदान शिबीर यशस्वी केले.



# बांगलादेशातील अत्याचार विरोधात जेजुरीत मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** जेजुरीत सकल हिंदू समाजाच्या वतीने बांगला देशात होत असलेल्या हिंदू धर्मीय नागरिकांना होणाऱ्या जिहादी अत्याचारा विरोधात न्याय मोर्चा काढण्यात आला. आज दुपारी बारा वाजता जेजुरी शहरातील छत्रपती शिवाजी चौकात सकल हिंदू समाजाच्या वतीने न्याय मोर्चा काढण्यात आला. यावेळी बांगला देशात हिंदू नागरिकांवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात घोषणा देण्यात आल्या. तसेच बांगला देशाचा ध्वज यावेळी जाळण्यात आला.

गेली अनेक दिवसांपासून बांगला देशात, हिंदू नागरिकांवर जिहादी अत्याचार होत आहेत,हिंदूंची मंदिरे पाडली जात आहेत. या अत्याचारा विरोधात भारत सरकारने आवाज उठवावा व बांगला देशात होणारे हिंदू नगरिका वरील अत्याचार थांबवावेत अशी मागणी जेजुरी शहर सकल हिंदू संघटनेचे सूरज दरेकर यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून हा मोर्चा पोलीस स्टेशन मध्ये नेवून शासकीय पातळीवर आमच्या मागण्या पोहचविण्याबाबत पोलिसांना निवेदन देण्यात आले.

या वेळी जेजुरी शहर सकल हिंदू संघटनेचे सूरज दरेकर,सागर गोडसे,गणेश भोसले,सचिन मोरे,कल्पेश सूर्यवंशी,चंद्रकांत जगताप,सुमित गुरव ,मंगल पवार,गणेश मोरे,शुभम कांबळे,सागर खांडरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते

## पाडेगांव येथे दत्तजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**नीरा :** पुणे व सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील नीरा नदी तीरावर असलेल्या श्री दत्त देवस्थान नीरा - पाडेगांव येथील दत्तमंदिरात दत्तजयंती उत्सवनिमित्त गुरूवार ते रविवार या दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री दत्तसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रदीपकुमार काकडे, उपाध्यक्ष नितीन कुलकर्णी यांनी दिली. नीरा - पाडेगांव येथील श्रीदत्तमंदिरात दत्तजयंती उत्सवानिमित्त गुरूवारी सकाळी आठ वाजता सोपानकाका पालखी सोहळा प्रमुख श्रीकांत महाराज गोसावी, सासवडकर यांचे हस्ते मंडप शुद्धी व श्रींस अभिषेकाने कार्यक्रम सुरूवात होणार असून रुद्राभिषेक, आरती, भजन असे विविध कार्यक्रम गुरूवार ते रविवार या कालावधीत होणार आहेत. शनिवारी श्रीदत्तजयंतीच्या मुख्य दिवशी संध्याकाळी पाच वाजता हभप नारायण गोसावी महाराज (सासवडकर) यांचे श्रीदत्त जन्माचे चरित्र

# जिल्ह्यात ३० टक्के क्षेत्रावर फळझाड लागवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) चालू वर्ष २०२४-२५ मध्ये अडीच हजार हेक्टरवर फळझाड लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी नोव्हेंबर महिनाअखेर ७५६.३६ हेक्टरवर म्हणजे उद्दिष्टाच्या ३० टक्के क्षेत्रावर फळझाड लागवड पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

यंदा फळझाड लागवडीत शेतकऱ्यांचा सर्वाधिक कल आंबा आणि नारळ पिकाकडे आहे. मनरेगातून फळझाड लागवडीसाठी तालुकानिहाय लक्षांक निश्चित केले आहेत. त्यानुसार भोर १६७ हेक्टर, वेल्हा ११०, मुळशी १३०, मावळ १८५, हवेली १८०, खेड १९२, आंबेगाव २११, जुन्नर २२३, शिरूर १९०, बारामती २४०, इंदापूर २३०, दौंड २२२, पुरंदर २२० हेक्टर मिळून अडीच हजार हेक्टरचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यादृष्टीने क्षेत्रीय स्तरावर सूचना देऊन उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्न सुरू असून, वेळोवेळी आढावा बैठकाही घेण्यात येत आहेत.

तालुकानिहाय झालेली फळझाडांची लागवड हेक्टरमध्ये पुढीलप्रमाणे :

भोर १२.१०, वेल्हा ४.५०, मुळशी २५.५५, मावळ ५.३०, हवेली २६.७५, खेड ७९.८९, आंबेगाव ९२.१०, जुन्नर ६८.११, शिरूर ६३.९०, बारामती ६७.७१, इंदापूर ७५.९५, दौंड ११९.९०, पुरंदर ११४.६० हेक्टरचा समावेश आहे. एकूण ८३३ शेतकऱ्यांकडून ७५६. ३६ हेक्टरवर फळझाडे लागवड पूर्ण झालेली आहे. तसेच, आंबा लागवडीत आंबेगांव ८९.०५ हेक्टर, खेड ६८.४४, दौंड ६७.३०, शिरूर ५०.९०, जुन्नर ४८.९५, पुरंदर ४१.४०, इंदापूर ४१.१५, बारामती १५, मुळशी १५, भोर १२.१०, हवेली ११.४५, मावळ ५.३० आणि वेल्हा तालुक्यात ३.५० हेक्टर इतकी सर्वात कमी फळझाडे लागवड झाली आहे.

## आधार नोंदणी व दुरुस्तीची खेड पोस्ट ऑफिसमध्ये सुविधा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** 'आधार शीला ४.०' उपक्रमांतर्गत नवीन आधार नोंदणी तसेच आधार दुरुस्तीची सुविधा राजगुरूनगर डाकघरांमध्ये करण्यात आली असून, गरजू नागरिकांनी या डाकघरांमध्ये संपर्क साधण्याचे आवाहन खेड डाकघर निरीक्षक एम. एस. मेधे यांनी केले आहे.

शासकीय आदेशानुसार आधार अद्ययावतीकरण उपक्रमांतर्गत नागरिकांनी प्रत्येक १० वर्षानंतर तसेच शाळेतील मुलांचे वय १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक आहे. तसेच १० वी व १२ वी च्या मुलांनाही बोर्ड परीक्षेचा अर्ज भरताना आधार कार्ड अद्ययावत असणे गरजेचे आहे.

ज्यांना आधार अपडेट करायचे असेल त्यांनी या डाकघरांना भेट द्यावी. तरी गरजू नागरिकांनी येत्या आठ डिसेंबर पर्यंत सुरू असलेल्या 'आधार शीला ४.०' उपक्रमांतर्गत नवीन आधार नोंदणी तसेच आधार दुरुस्तीचा लाभ घ्यावा.

## गुन्हा दाखल करण्याचे तहसीलदार देवरे यांचे पोलिसांना निर्देश?

# खेड कृ.बाजार संचालक राक्षे यांचा दाखला अखेर रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे यांचा अर्थिक दुर्बल घटक दाखला (प्रमाणपत्र) अखेर तहसीलदार ज्योती देवरे यांनी मंगळवारी (दि १०) रद्द ठरवला. दाखला रद्द झाल्याने खेड तालुक्याच्या राजकिय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दाखला मिळवताना अशोक राक्षे यांनी सोबत जे घोषणा पत्र दाखल केले होते.ते खोटे ठरले असून त्यावरुन पोलिसात लेखी पत्र देऊन योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार देवरे यांनी दिले आहेत. या प्रकरणाची सोमवारी (दि ९) सुनावणी झाली. त्यावेळी राक्षे समर्थकांनी थेट तहसील कार्यालयात येऊन गोंधळ घातला होता. त्यावरूनही तहसीलदार देवरे यांनी एका शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या



विरोधात कामकाजात अडथळा अशा आशयाची तक्रार पोलिसांत केली आहे. ज्यांच्या विरोधात तक्रार केली त्यांनीही तहसीलदार यांच्या विरोधात तक्रार केली असल्याचे सांगण्यात येत आहे. ॲड निलेश आंधळे यांनी तक्रारदार यांच्या बाजूने युक्तिवाद केला.

बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे हे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या सोबत राहुन निवडून आले होते. मात्र काही महिन्यापूर्वी त्यांनी मोहिते यांच्या विरोधात भुमिका घेतली. सभापती, उपसभापती निवडी दरम्यान तालुक्यात मोठया राजकिय घडामोडी घडल्या. माजी आमदार मोहिते पाटील आणि विरोधकांमध्ये हे प्रकरण धुमसत राहिले. आजच्या एका निकाल आणि पोलिस ठाण्यात होणाऱ्या दोन्ही बाजुच्या तक्रारी विचारात घेता विधानसभेत पराभुत झाले असले तरी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांचीच सरशी झाली असे तालुक्यात मानले जात आहे.

### दोन महिने थांबा मला दिलीप मोहिते म्हणतात..!

- खेड कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती, उपसभापती निवडी मध्ये माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांना हार पत्करावी लागली. या राजकिय बदलाच्या हालचाली वेगात सुरू असतानाच विधानसभा निवडणुक झाली.विधानसभेच्या प्रचारात दोन महिने थांबा. बाजार समितीत विरोधात गेलेल्या संचालकांचे सगळे बाहेर काढतो. असे मोहिते पाटील म्हणत होते.

> राजकिय द्वेषाने, सूडबुद्धीने निकाल दिला आहे. न्यायालयीन लढा लढून यातील चुकीच्या गोष्टी जनते समोर आणणार आहे. निकालाने माझ्या संचालक पदावर किंवा बाजार समिती मधील सभापती उपसभापती निवडी वर कोणताही परीणाम होणार नाही.
> — **अशोक राक्षे, संचालक खे.बा. समिती**

#रा

# करिअर पॉइंट



*कोणतं क्षेत्र कसं आहे त्यापेक्षा आपण ते कोणत्या पद्धतीने कॅरी करतो, हँडल करतो यावर आपलं यश आणि ओघानं येणारी इमेज अवलंबून असते. मॉडेलिंग हे असंच एक क्षेत्र. इथे ग्लॅमर आहे, हाइप आहे आणि खच्चून पैसाही आहे. रातोरात स्टार व्हायची संधीही याच फिल्डमध्ये आहे. पण, दुर्दैवानं या फिल्डकडं 'वाईट' अँगलनं पाहण्याचं प्रमाण जास्त असल्याने त्याकडे सहसा कुणी वळत नाही. एलिट क्लास किंवा भक्कम पैसा असलेले तरूण-तरूणीच हा पर्याय करिअर म्हणून निवडतात, सर्वसामान्यांच्या आर्थिक आणि मानसिक ऐपतीत हे करिअर नाही... हे करिअर होऊच शकत नाही, हा तर निव्वळ मौजमजा करण्याचा पर्याय आहे... असे अनेक गैरसमज या फिल्डविषयी आहेत. पण, या क्षेत्रात कसं मोठं व्हायचं हे आपल्याच हातात आहे. अन्यथा अमृता पत्की, मुग्धा गोडसे, नेहा हिंगे, उज्ज्वला राऊत, मिलिंद सोमण, मिलिंद गुणाजी...आदी आपल्यातील माणसं इथं चमकली नसती!*

**नोकरीसाठी शेकडो जण अर्ज करत असतात. अलीकडील काळात इंटरनेटमुळे रेझ्युमे स्मार्ट कसा असावा यांसारख्या गोष्टी बहुतांना माहीत असतात. कव्हर लेटरबाबतही अनेकांना माहीत असते. अशा भाऊगर्दीत तुमचं कव्हर लेटर वेगळं आणि प्रभावी ठरण्यासाठी काय करायला हवं...**

## कव्हर लेटर लिहिताना...

कव्हर लेटर लिहिताना काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्याला हवे. ते पुढीलप्रमाणे.

**बी प्रोफेशनल :** तुमचा ईमेल फॉर्मल असू द्या. हे पत्र अगदी औपचारिक असावं. तुम्ही ज्या व्यक्तीला हे पत्र (मेल) पाठवता त्यांच्या नावाचा उल्लेख टाळू नका. स्वतःची ओळख योग्य शब्दांत करून द्या. कॅज्युअल भाषा आणि लघुरूपं वापरू नका.

**वैयक्तिक माहिती :** तुमची ओळख करून द्या. तुमचा अनुभव थोडक्यात मांडा. तुम्ही ज्या पदासाठी अर्ज केलाय, त्यासाठी पूरक ठरणारा अनुभव हायलाइट करा. शिवाय त्यातून तुमचा रस नेमका कशात आहे, हेही मांडता येईल. तुम्ही वेगळे आहात हे ठरवा. आवश्यक तेवढंच प्रोफाइल मांडा आणि त्यात आवश्यक त्या कौशल्यावर भर द्या.

**नेमके शब्द :** इंग्रजीत हा मेल लिहिणार आहेत त्यात 'बी' हा शब्द टाळा. तुमच्या पत्रात अगदी थोडक्या शब्दात तुम्ही समोरच्यावर आपली छाप सोडायला हवी.

त्यामुळे अचूक शब्दात तुम्ही काय आहात हे मांडायला हवं. त्यात तुमचे विचार आणि आदर्श काय आहेत, हे सांगायची गरज नाही, हे ध्यानात ठेवा.

**अचूकता :** प्रत्येक कव्हर लेटरमध्ये दोन गोष्टी असणं आवश्यक आहेत. आपण कोणत्या पदासाठी अर्ज करत आहोत, याचा स्पष्ट उल्लेख असावा. 'आणि या संदर्भात मला अधिक बोलण्याची माझी इच्छा आहे', असा उल्लेख करायला हवा. त्यामुळेच तुम्ही कोणत्या प्रकारचं काम करण्यास इच्छूक आहात आणि अपेक्षा काय आहे, हे समजू शकतं.

**एडिट :** तुम्ही काय लिहिलं आहे, हे एकदा वाचून पाहा. ते काय लिहिलं आहे, ते स्क्रिनवर नाही तर कागदावर प्रिंट केल्यावर मोठ्याने वाचा. असं केल्याने तुम्ही काय लिहिलं आहे, ते कशा प्रकारे वाचलं जाईल आणि त्याचा काय अर्थ निघेल, याचा अंदाज तुम्हाला करता येईल. शिवाय तुम्ही जे काही लिहिलंय ते कितपत चांगलं किंवा वाईट आहे, हेही समजेल. एडिटिंग केल्याशिवाय तुम्ही जे लिहिलंय ते अधिक चांगलं होणार नाही.

**संबंधित व्यक्ती :** आपण जे कव्हर लेटर लिहणार आहात त्यात संबंधित व्यक्तीचा उल्लेख आवर्जून केलाच पाहिजे. विशेषतः ज्या कंपनीसाठी अर्ज करणार आहात तिथल्या संबंइधित अधिकाऱ्याच्या नावाचा उल्लेख पत्रात असावा. जर संबंधित व्यक्तीचं नाव नसेल तर त्या विभागाचा प्रमुख असलेल्या अधिकाऱ्याला उद्देशून हे पत्र असावं.

आपण जेव्हा अर्ज करतो, तेव्हा त्याची दखल घेतली जावी. असं प्रत्येकालाच वाटतं आणि तुमच्या कव्हर लेटरमुळे हे काम सोपं होतं. चांगलं कव्हर लेटर हे नक्कीच तुमच्या अर्जाची दखल घ्यायला भाग पाडतं. इतरांपेक्षा वेगळं असलेलं कव्हर लेटर तुम्हाला शेकडो अर्जदारांमध्ये वेगळं ठरवतं.

### ▪ जाणून घ्या



### हवा मुद्देसूदपणा

कव्हर लेटर हे पानाच्या दोन तृतियांश असलं पाहिजे. म्हणजे ज्यात दोन-तीन पॅराग्राफ लिहिलेलं असावं. खूप लांबलचक पत्र लिहू नका. वाक्य छोटी आणि हलकीफुलकी असावीत. शब्दांचे फुलोरे किंवा उपमा-अलंकार असं काही लिहिणं टाळा.

## ग्लॅमर आणि पैसाही

ग्लॅमर आणि पैसा असूनही मॉडेलिंग दिसतं तेवढं सोपं नाही. सहनशीलतेची कसोटी लागते. एंट्री केल्याकेल्या लगे काम मिळत नाही. एखादा ब्रेक मिळवण्यासाठी खूप खस्ता खाव्या लागतात. पण, स्ट्रगल कोणत्या क्षेत्रात नाही. आजच्या रॅट रेसमध्ये मेहनत आणि पेशन्सला पर्याय नाही आणि महत्त्व आहे ते, इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाला मॉडेलिंगमध्ये या गोष्टी स्वभावातच असणं आवश्यक आहे. अन्यथा, मानसिक त्रासाला बळी पडण्याची शक्यता निर्माण होते.

केवळ सुंदर सुंदर कपडे घालून टकाटक रॅम्पवॉक करणं म्हणजे मॉडेलिंग नाही. ब्युटी विथ ब्रेन्सचा फंडा इथे चालतो. डिझायनर कोरिओग्राफर यांना तुमच्याकडून नेमक काय काम करून घ्यायचं आहे, हे समजून घेतलं पाहिजे. प्रत्येक शो किंवा क्लोथ्स विशिष्ट थीम कॅरी करत असतात, ती थीम समजून घेऊन स्वतःला मोल्ड करत काम करणं इथं महत्त्वाचं आहे. दहा ठिकाणी गेल्यानंतर काम मिळेलच याची शाश्वती नाही. अपयश, रिजेक्शन येतंच. पण म्हणतात ना, खणखणणारे नाणँ असेल की, ते कुठंही आपली किमया दाखवतंच! हे फिल्ड मुलींप्रमाणे मुलांसाठीही ब्राइट फ्युचर देणार आहे.



मॉडेलिंगमध्ये इनर आणि रॅम्प क्वालिटी असणं गरजेचं आहे. पर्सनॅलिटीच्या विविध गुणांबरोबर मार्केटमध्ये मॉडेल म्हणून स्वतःची सेलेबिलिटी ओळखणं महत्त्वाचं. रिॲलिस्टिक असणंही तितकंच गरजेचं. अमुक एक गोष्ट केली, तरच हे काम मिळेल या अटींवर काम करत राहिल्यास यातच वाहावत जाण्याची शक्यता जास्त आहे. फास्ट सक्सेस पाहिजे असणारे या फंदात पडतात आणि यातच अडकतात. मग, यातून बाहेर येण्यासाठी ड्रग्ज, अल्कोहोल... अशा नको त्या पर्यायांचा वापर केला जातो. या गोष्टींपासून दूर राहण्यासाठी आपल्यावरचे एथिक्स कामी येतात. हे क्षेत्र कितीही चमकचमतं किंवा मॉडर्न स्वरूपाचं असंल तरी इथे संस्कार, नैतिकता यासारखी पारंपरिक मूल्य पायदळी तुटवली जातात, अस अजिबातच नाही. फक्त, ग्लॅमर आइण पैशाच्या मोहापायी ती विसरून उपयोगाचं नाही.

**कोण बनू शकतात मॉडेल ?**

१) मॉडेलिंग म्हणजे झिरो फिगर किंवा सडपातळ असायला पाहिजे असा अट्टहास नसतो. स्लीमट्रीमचा फंडा इथं चालत असला तरी, फिट ॲण्ड हेल्दी असणं तितकंच आवश्यक. रॅम्पसाठी कमीत कमी पाच फूट

### ▪ वेगळ्या वाटा

सात इंच इंची आणि ३४-२४-३४ (मुलींसाठी) असं बॉडी स्ट्रक्चर असावं लागतं. सुपरमॉडेलिंगसाठी कमीत कमी सहा फूट उंची असावी लागते.



२) मॉडेलिंगसाठी ग्लॅमरस लूक्स लागतात, आपण कुठं एवढे नशीबवान आणि ते महागडे कपडे, मेकअप एवढा खर्च केल्याशिवाय सुंदर कसं दिसणार... हा निव्वळ गैरसमज आहे. नाकीडोळी सुंदर असणं हा तरी, मॉडेल होण्याचं पोटेंशिअल असणं महत्त्वाचं. मग, कपडे तुम्हाला सुंदर बनवत नाहीत, तर तुम्ही कपड्यांना सुंदर बनवता. ते आत्मविश्वासनं कॅरी करता आले की, बन गयी बात!

मेकअपसाठीही भरमसाठ खर्च करण्याची गरज नाही. पॉझिटिव्ह लूक्स एन्हान्स करणं आणि निगेटिव्ह फिचर्स लपवता आले पाहिजेत. पण, याआधी दोघांमधला फरक ओळखता येणं महत्त्वाचं.

३) बोलकी पर्सनॅलिटी
४) प्रभावी बॉडिलँग्वेज, क्लोथ्स कॅरी करण्याचा ॲटिट्यूड
५) आत्मविश्वास
६) पॉझिटिव्ह ॲटिट्यूड
७) पॅशन्स
८) स्मायलिगं फेस

## ➡ पर्यावरणपूरक लघुअभ्यासक्रम

**एकीकडे ग्लोबल वॉर्मिंगबद्दल काळजीचे सूर व्यक्त होत आहेत. त्याचे हवामानावर आणि मानवी समाजावर होणारे दुष्परिणाम याची आव्हाने कशी पेलायची, यावरही चर्चा झडत आहे. मात्र, हे आव्हान पेलत असताना या निमित्ताने काही संधीही उपलब्ध होत आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी हा लेखप्रपंच! या नव्या संधी निर्माण होत आहेत, त्या उपलब्ध तंत्रज्ञानाला पर्याय निर्माण करण्याच्या निमित्ताने! सौर, फोटोव्होल्टाइक किंवा बायोमास अशा अपारंपरिक स्त्रोतांपासून ऊर्जा मिळवण्यासाठी नवे आणि स्वस्त तंत्रज्ञानही लागणार आहे. काही ठिकाणी हे बनवलेही गेले आहे. मात्र, त्यात अधिक भर पडण्याची आवश्यकता आहे. या तंत्रज्ञानाचा फायदा असा की, हे पर्यावरणपूरक असल्याने शाश्वत असणार आहे आणि पर्यायाने त्यातून निर्माण होणाऱ्या नोकरी किंवा उद्योगाविषयक संधीही शाश्वत असतील.**

नवे तंत्रज्ञान निर्माण करताना ते हाताळण्यासाठी; तसेच त्याच्या देखभाल-दुरुस्तीसाठीही कुशल मनुष्यबळ निर्माण करावे लागते. नेमक्या याच भूमिकेतून ऊर्जेच्या अपारंपरिक स्त्रोतांपासून निर्माण होणाऱ्या तंत्रज्ञानाबाबत पुण्यातील तेर पॉलिसी सेंटर या संस्थेने काही लघु अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत. अगदी दहावी पास होऊन आयटीआयचे कोर्स केलेल्या किंवा करत असलेल्या विद्यार्थ्यांपासून एमबीए पदवीधारकांनाही उपयोगी पडू शकतील, असे ते आहेत.

सौर, फोटव्होल्टाइक किंवा बायोमास या ऊर्जास्त्रोतांपासून अनेक नवी उपकरणे तयार होत आहेत. सौर ऊर्जेवर चालणारे कुकर, बॅटऱ्या, खेळणी, चार्जर, तसेच पवनचक्क्या आदी उपकरणे तर सर्रास वापरली जातात. मात्र, ग्राहकांना ती घेण्यात एक धोका वाटतो तो म्हणजे त्याच्या देखभाल-दुरुस्तीचा. त्यासाठी सहज उपलब्ध होईल असे मनुष्यबळ नाही, ही वस्तुस्थिती आहे, हे मनुष्यबळ निर्माण व्हावे हा आमच्या अभ्यासक्रमाचा एक उद्देश आहे.

हा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी संस्थेतर्फे अडीच दिवसांची एक कार्यशाळा आयोजित करण्यात येते. यामध्ये सर्व मूलभूत संकल्पना स्पष्ट करणे आणि अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांवर चालणाऱ्या एका प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट असे याचे स्वरुप आहे. स्थानिक तज्ज्ञांया जोडीनेच 'तेर'चे भागीदार असलेल्या इटलीतील सेंट्रो स्टडी गॅलिलिओतील तज्ज्ञ मार्गदर्शकही या कार्यशाळेत मार्गदर्शन करतात.



हा कोर्स एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठीही पूरक आहे. सध्या अनेक कॉर्पोरेट कंपन्या आपली कंपनी ग्रीन कंपनी असावी, यासाठी विविध उपाय योजतात. विजेची बचत कशी करायची, उपलब्ध ऊर्जास्त्रोत अधिक प्रभ्वी कसे वापरायचे यासाठई नेटक्या नियोजनाची आवश्यकता असते. हे नियोजन करण्यासाठी तज्ज्ञांची गरज भारते. ती गरज हा कोर्स पूर्ण करू शकतो. आम्ही अनेक कंपन्यांत जाऊनही हा अभ्यासक्रम सिखवतो, तसेच एमबीएचे अनेक विद्यार्थी आमच्या संस्थेत प्रोजेक्ट वर्कसाठीही येतात.

## मुद्रणक्षेत्रातील करिअरसंधी

प्रिंटिंगक्षेत्राने आज बरीच मोठी मजल मारली आहे. स्क्रीन प्रिंटिंग, ऑफसेट प्रिंटिंग, लेटर प्रेस, वेबऑफसेट, फ्लेक्सोग्राफी, ग्रॅव्हियर अशा अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाने सध्याचे प्रिंटिंगचे क्षेत्र व्यापले आहे. वन कलर, टू कलर वा फोर कलरमध्येही ही छपाईची यंत्रणा विभागलेली आहे. कम्प्युटरच्या या क्षेत्रातील वाढत्या वापराने आणि वेळोवेळी त्याची या क्षेत्रातील उपयुक्तता सिद्ध झाल्याने त्याच्या आधाराने हे क्षेत्र आता अधिकाधिक विस्तारू लागले आहे.

वस्तूंच्या किंवा निरनिराळ्या उत्पादनांच्या पॅकेजिंगचे महत्त्वही आजच्या चकाचक जमान्यात वाढले आहे. त्या पॅकेजिंगवरही निरनिराळी माहिती छापली जाते. वाढत्या पॅकेजिंगबरोबरच या पॅकेजिंग प्रिंटिंगचा व्यवसायही तितक्याच जोमाने वाढत आहे. अगदी साधे वाटणारे व्हिजिटिंग कार्ड, आपल्या शैक्षणिक कारकीर्दीसाठी महत्त्वाची ठरणारी पुस्तके, आपल्या दैनंदिन करमणुकीसाठी आणि ज्ञानवर्धनासाठी उपयुक्त ठरणारी वृत्तपत्रे-मासिके या घराबाहेर पडल्यानंतर चौकाचौकांमधून दिसणारे फ्लेक्स अशा सर्वच ठिकाणी आपल्याला या प्रिंटिंग टेक्नॉलॉजीची ॲप्लिकेशन्स सातत्याने पहायला मिळतात. पण एवढे असूनही या क्षेत्राचा करिअर म्हणून आपण विचार करत नाही. या क्षेत्राची तशी माहिती नसल्यामुळे असेल ते कदाचित...

वाटा कोणत्या?

या क्षेत्राकडे वळण्यासाठी आता व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. दहावीनंतर पदवीकेसाठी तर बारावीनंतर डिग्रीसाठी ॲडमिशन मिळू शकते. डिप्लोमा केला असल्यास डिग्रीच्या द्वितीय वर्षाला मेरिटवर ॲडमिशन मिळते. प्रिंटिंग टेक्नॉलॉजीच्या प्रोफेशनल कोर्सच्या माध्यमातून आपल्याला या क्षेत्राची व्याप्ती आणि त्याच्याशी निगडित अर्थकारण समजून घेता येते. त्याचप्रमाणे या क्षेत्रात असणाऱ्या कमाईच्या संधीबाबतही माहिती मिळवता येते. थोडी

क्रिएटीव्हिटी अंगी असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र खूपच उत्तम असल्याचे या क्षेत्रात काम करणाऱ्यांचे सांगणे आहे. मॅगेझिन वा बॅनरसाठीचे कमर्शिअल प्रिंटिंग, पुस्तकांच्या जगात घेऊन जाणारे पब्लिकेशन प्रिंटिंग किंवा पॅकेजिंग या तीन मुख्य वाटांपैकी आपल्याला सोयीची वाट निवडून त्यासाठीचं प्रशिक्षण घेणं आणि नंतर स्वतःच्या बळावर व्यवसायात उतरणं, हा या क्षेत्रातील राजमार्ग आहे. स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासोबतच मोठमोठ्या प्रिंटिंग हाऊसेसमध्येही आपल्याला काम करता येते. प्रॉडक्शन ऑफिसर म्हणून अशा ठिकाणी कामाचा अनुभव घेत स्वतःच्या



### ▪ करिअर ऑप्शन

कारकीर्दीचा प्रारंभ करणे, सुपरवायझर, डिस्ट्रीब्युशन हेड ते डिपार्टमेंटल हेड असा प्रवास याच डिग्रीच्या बळावर आपल्याला करता येतो.

आपल्याकडे आजूनही या क्षेत्रात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे; पण त्या तुलनेत कुशल मनुष्यबळ मात्र उपलब्ध होत नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे ज्यांना आपली क्रिएटीव्हिटी आणि त्यासोबतच कौशल्य आजमावून पहायचे आहे अशांना हे क्षेत्र सातत्याने खुणावत राहणार आहे. आपल्या करिअरची छाप त्याच्या साहाय्याने पाडायची की नाही हे मात्र आपल्या ईच्छाशक्तीवरंच बरं का!

## सृजनशील बनायचंय?

**कोणतीही गोष्ट दोनदा निर्माण होते. प्रथम विचारांद्वारे मेंदूत आणि नंतर शरीराद्वारे कृतीत. पहिल्या निर्मितीत सृजनशीलता उपयोगी पडते. यासाठी सतत विचारांची आवश्यकता असते. आज जगात दिसणारे अनेक शोध, यंत्रांचे, भाषांचे, शास्त्र, कला-साहित्यातले, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक यासारख्या कोणत्याही क्षेत्रातील कोणाच्यातरी सृजनशीलतेतून लागले आहेत. त्यातून असंख्य नागरिकांचे जगणे सुसह्य झाले आहे. अनेकांना रोजगार मिळाले आहेत. सृजनशील व्यक्ती ही आपल्या कल्पनांची गुलाम नसते, तर ती त्यांची अइधपती असते. याचबरोबर 'युद्धे ही रणभूमीवर नाहीत तर कोणाच्या तरी**



डोक्यात लढली जातात.' हेही खरे आहे. चांगल्या कार्याबरोबर विध्वंसक गोष्टीही होऊ शकतात. ती सृजनशीलता नव्हे.

सृजनशीलतेचा सर्वात मोठा शत्रू असंतुष्टता होय, असे म्हटले तर वावगे होणार नाही. यासाठी सृजनशीलता येण्यासाठी खालील पथ्ये पाळली पाहिजेत. कोणत्याही गोष्टीकडे ताज्या दृष्टिकोनातून पहा. पारंपरिक मार्गाने जाऊ नका. स्वतःच्या कल्पनाशक्तीला राबवा. नवनवीन कल्पना करा. नवनवीन शक्यतांचा, पर्यायांचा विचार करा. नाविन्याचा ध्यास धरा. 'असे का नसावे' हा प्रश्न सृजनशीलतेकडे लवकर नेतो.

बऱ्याच वेळा ट्रकच्या मागे लिहिलेले मजकूर आढळतात. एका ट्रकच्या मागे लिहिलेले आढळले 'हे असंच चालायंच' हा विचार सृजनशीलतेला मारक असतो. त्याऐवजी 'असं का नसावे' हा विचार आला तरच प्रगती होईल. दैनंदिन कामकाज सुधारेल. अनाठायी खर्च होणारा पैसा, वेळ वाचेल. नवनवीन कल्पनांचा शोध लागेल व त्यातून आपला व इतरांचा फायाद होईल. सृजनशीलतेच्या धडपडीमध्ये भीती मारक ठरते.

असे नवीन काही केल्याने चूक होईल काय? लोक आपल्याला वेडा समजतील का? त्यामुळे आपल्यावर टीका होईल का? आपल्या कल्पनांचा गैरवापर तर होणार नाही? आपण एकटे तर पडणार नाही? वगैरे अनेक प्रकारची भीती आपल्या धडपडीच्या आड येऊ शकते. तिच्यावर मात केली तर शेवटी चांगले काहीतरी घडलेले आपल्याला दिसेल. पुढच्या वेळी आपणही असेच काही करा, घडवून आणा व पडलेल्या फरकाचा आनंद लुटा.



"राहुल व यशस्वी या जोडीने पर्थ कसोटीत दोनशेपेक्षा जास्त धावांची भागीदारी केल्यामुळे अ‍ॅडलेड कसोटीत राहुललाच सलामीला पाठवण्यात आले; पण आता अ‍ॅडलेड कसोटीत राहुल अपयशी ठरला आहे. आता रोहितने पुन्हा सलामीला यायला हवे. त्याच्याकडून सुरुवातीला आक्रमक धावा झाल्यास त्यानंतर तो शतकही करू शकतो." — सुनील गावसकर


"जेव्हा सिराजला वाटते की त्याने फलंदाजाला बाद केले, तेव्हा तो पंचांच्या निर्णयापूर्वीच आनंद साजरा करण्यासाठी त्याच्या सहकाऱ्यांकडे धावतो. 'मला त्याचा उत्साह आवडतो, मला त्याचा स्पर्धात्मक स्वभाव आवडतो, मला हे आवडते की आमच्याकडे खरोखर चांगली मालिका सुरू आहे, परंतु खेळाचा आदर देखील आहे जो टिकवून ठेवला पाहिजे." — मार्क टेलर



## टीम इंडियामध्ये व्हावा बदल : तिसरा वेगवान गोलंदाजाची गरज

# गॅबावर भारताची 'कसोटी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात कसोटी मालिकेत पहिल्या दोन सामन्यानंतर १-१ अशी बरोबरी झाली आहे. आता तिसरा सामना ब्रिस्बेनमधील द गॅबा मैदानात १४ डिसेंबरपासून सुरू होत आहे.

भारताने या कसोटी मालिकेतील पहिला सामना पर्थ येथे २९५ धावांनी जिंकला होता. त्यानंतर दुसरा सामना मात्र ॲडलेड येथे ऑस्ट्रेलिया संघाने १० विकेट्सने जिंकला होता. त्यामुळे आता दोन्ही संघ तिसरा सामना जिंकून आघाडी घेण्यासाठी आतुर असणार आहेत.

प्लेइंग इलेव्हनमध्ये एकच बदल होईल. जसे की फलंदाजी सध्या चांगली होत नाहीये, त्यामुळे आर अश्विनच्या जागेवर पुन्हा वॉशिंग्टन सुंदरला संधी मिळू शकते.'


'हर्षित राणाच्या जागेवर कोणी येईल का, तर माझ्या मते नाही. तुम्ही त्याला पाठिंबा दिला आहे आणि त्याने पहिल्या सामन्यात चांगली कामगिरी केली होती. दुसरा सामना त्याच्यासाठी चांगला ठरला नाही. तथापि, आता संघाला त्याला पाठिंबा द्यावाच लागेल.'

हर्षित राणाने या मालिकेतून कसोटी पदार्पण केले आहे. त्याने पहिल्या सामन्यात ४ विकेट्स घेतल्या होत्या, मात्र त्याला दुसऱ्या सामन्यात एकही विकेट घेता आली नव्हती. त्यामुळे त्याच्यावर टीका होत होती. मात्र, त्याला पुजाराने पाठिंबा दिला आहे.

पुजारा म्हणाला, 'तो चांगला गोलंदाज आहे. एका सामन्याच चांगली कामगिरी झाली नाही, म्हणून तुम्ही त्याला लगेचच संघातून वगळू शकत नाही. आपल्याला आता पाहावे लागेल की संघव्यवस्थापन काय विचार करत आहे, पण माझ्यामते एकच बदल होईल. जर फलंदाजी आणखी मजबूत व्हावी असं त्यांना वाटत असेल, तर कदाचित अश्विनच्या जागेवर वॉशिंग्टन खेळू शकतो.'

दरम्यान, पहिल्या कसोटीनंतर रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांचे दुसऱ्या सामन्यात पुनरागमन झाल्याने ध्रुव जुरेल आणि देवदत्त पडिक्कल यांना संघातून बाहेर केले होते. तसेच वॉशिंग्टन सुंदरही पहिला सामना खेळला होता. पण दुसऱ्या सामन्यात त्याच्या जागेवर अश्विनला संधी देण्यात आली होती. आता तिसऱ्या सामन्यात बदल होणार की नाही हे पाहावे लागेल.

याशिवाय दुसऱ्या सामन्यात रोहित शर्माने मधल्या फळीत फलंदाजी केली होती, तर यशस्वी जैस्वालसह केएल राहुलने सलामीला फलंदाजी केली होती. आता तिसऱ्या सामन्यातही रोहित मधल्या फळीत फलंदाजी करणार की सलामीला पुन्हा येणार, हे देखील पाहावे लागेल.



# आयर्न मॅन

वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णु नाथा ताम्हाणे व त्यांचे सातारा जिल्ह्यातील दोन सहकारी यांनी वेस्टर्न ऑस्ट्रेलिया येथे आयोजित आयर्न मॅन स्पर्धेत यश.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बस्लटन :** वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, बस्लटन येथे आयोजित आयरनमैन ही स्पर्धाvc आयोजित केली होती.सदर स्पर्धेत जगभरातून 1700 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी 1100 स्पर्धकांनी ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. त्यामध्ये पुण्यातील जवळपास 14 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पुण्यामध्ये यापूर्वी कार्यरत असलेले व सध्या ठाणे आयुक्तालय मधिल उल्हासनगर चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णु नाथा ताम्हाने वय 56 वर्ष यानी सहभाग घेतला होता. त्याचबरोबर त्यांचा मुलगा गौरंग ताम्हणे वय 18 वर्ष तसेच त्यांचे सहकारी विजय अनपट व संदीप पाचपुते यांनी देखील यामध्ये सहभाग घेतला होता. सदर स्पर्धे दरम्यान थंडी ऊन, वारा,पाऊस यामुळे मुलगा गौरांग तामाने या सदरची स्पर्धा अर्धवट सोडावी लागली. विष्णू ताम्हणे, विजय अनपट, संदीप पाचुपुते यांनी यापूर्वी अनेक अर्ध मॅरेथॉन व पूर्ण मॅरेथॉन मध्ये सहभाग घेतलेला आहे.

विष्णू ताम्हणे यांनी ही स्पर्धा पूर्ण करणे म्हणजे माझी एकट्याची वैयक्तिक कामगिरी नसून माझे सहकारी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी माझी कोचेस, कुटुंब अशा सर्वांची मिळून सांघिक कामगिरी आहे. त्याचप्रमाणे सदरची कामगिरी संपूर्ण पोलीस दलासाठी गौरवशाली बाब आहे अशा प्रकारे आपल्या विजया बद्दलच्या भावना व्यक्त केल्या. आयर्न मॅन स्पर्धेत 3.8 किमी जलतरण, 180 किमी सायकलिंग, आणि 42.2 किमी धावणे हे सलग 17 तासामध्ये पूर्ण करणे आवश्यक असते. ते करत असताना स्पर्धकाच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेचा कस लागतो. या स्पर्धेचे ध्येय वाक्य " एवरीथिंग इज पॉसिबल" हे आहे. त्या अर्थाने स्पर्धक हा कोणत्याही वयामध्ये ही कामगिरी करू शकतो. यामधूनच प्रेरणा घेऊन विष्णू ताम्हणे यांनी वयाच्या 56 व्या वर्षी त्यांचे सहकारी विजय अनपट यांच्या मदतीने पार पाडून समाजातील नागरिकांना व मुलांना तसेच पोलीस दलातील अधिकारी अंमलदार यांच्यासाठी प्रेरणा दिली आहे.



आकृती सोनकुसरे

# भारताच्या आकृती, ईश्वरी, स्म्रिती, पूजा, बेला यांचा मुख्य फेरीत प्रवेश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

महिला आयटीएफ टेनिस

**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम- जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए - एसडीएलटीए 25हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत भारताच्या आकृती सोनकुसरे, ईश्वरी माथेरे, स्म्रिती भसीन, पूजा इंगळे, बेला ताम्हणकर, ललित्या कल्लुरी, या खेळाडूंनी मुख्य फेरीत प्रवेश केला.

एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या आकृती सोनकुसरे हिने आठव्या मानांकित पवनी पाठकचा 3-6, 6-4, 10-7 असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला. भारताच्या ईश्वरी माथेरेने दहाव्या मानांकित प्रत्युशा रचापुडीवर 6-4, 3-0 असा विजय मिळवला. तिसऱ्या मानांकित स्म्रिती भसीन हिने लक्ष्मीश्री दांडूचा 6-2, 6-4 असा पराभव केला. बिगरमानांकीत पूजा इंगळेने तेराव्या मानांकित वंशिता पठणीयाचा 6-1, 6-1 असा सहज पराभव करून मुख्य फेरी गाठली. चौदाव्या मानांकित बेला ताम्हणकरने सिरी पाटीलचा 6-1, 0-6, 10-8 असा पराभव करून आगेकूच केली.

मुख्य ड्रॉ मधील खेळाडूंची मानांकन यादी आज जाहीर करण्यात आली. एकेरीत थायलंडच्या थासापोर्न नाकलो हिला अग्रमानांकन देण्यात आले आहे.



ईश्वरी माथेरे

# स्वोजस टेनिस साखळी स्पर्धेत बेल्फिन्स टायगर्स, पायरेट्स विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित पहिल्या पीवायसी- स्वोजस एंटरप्रायझेस टेनिस साखळी स्पर्धेत बेल्फिन्स टायगर्स, पायरेट्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून आगेकूच केली.

पीवायसी हिंदू जिमखाना येथील टेनिस कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत बेल्फिन्स टायगर्स संघाने राफा बुल्स संघाचा 4-3 असा पराभव करून पहिला विजय नोंदवला. विजयी संघाकडून तनिश बेलगलकर, केदार देशपांडे, कप्लक पत्की, तुषार नगरकर, अन्विता टेपण ,कर्णा मेहता, अरिका ताम्हाणे, आनंदी बेडेकर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. दुसऱ्या सामन्यात सालसा आहेर, जयदीप वाकणकर, संग्राम पाटील, प्रियदर्शन डुंबरे, अभिजीत खानविलकर, समीर सावला, प्रीती फडके, राहुल पाठक, चिन्मय दांडेकर, यश शहा यां च्या विजयी कामगिरीच्या पायरेट्स संघाने ब्लॅक हॉक्स संघाचा 5-2 असा पराभव करून दुसरा विजय मिळवला. अन्य लढतीत स्पिअर्स संघाने काराज कार्डिनल्स संघावर 6-1 असा विजय मिळवत तिसरा विजय नोंदवला.

# क्रिकेटप्रेमींना मोठा धक्का!

**मुंबई :** क्रिकेटची लोकप्रियता पाहून आयसीसी अनेक देशांमध्ये वेगवेगळ्या क्रिकेट लीगचे आयोजन करते. वर्षभरापूर्वी आयसीसीने नॅशनल क्रिकेट लीग ऑफ यूएसएला मान्यता दिली होती, मात्र आता अवघ्या वर्षभरातच आयसीसीने या क्रिकेट लीगवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) अमेरिकेतील राष्ट्रीय क्रिकेट लीगला मोठा धक्का दिला आहे. वसिकम अक्रम आणि सर व्हिव्हियन रिचर्ड्स यांसारख्या दिग्गजांचाही या लीगशी थेट संबंध आहे. एका नियमांचे उल्लंघन केल्यामुळे आयसीसीने अमेरिकेच्या क्रिकेट लीगवर बंदी घातली आहे.

# आरकेजी स्नुकर पात्रता फेरी स्पर्धा १७ डिसेंबर पासून !!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देवभुमी बिलीयर्ड आणि स्नुकर असोसिएशन आणि दिल्ली बिलीयर्डस् आणि स्नुकर असोसिएशन यांच्यावतीने सहाव्या आरकेजी स्नुकर अजिंक्यपद १०-रेड स्नुकर स्पर्धेसाठीची पुणे पात्रता फेरीचे १७ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पर्धेचे संचालक मनमीतसिंग भाटीया आणि भारतीय बिलीयर्डस् व स्नुकर फेडरेशनचे माजी उपाध्यक्ष राजन खिंवसरा म्हणाले की, या राष्ट्रीय स्पर्धेची पात्रता फेरी पुण्यामध्ये होणार असून पुण्यातील खेळाडूंसाठी ही मोठी संधी ठरणार आहे. देशातील एकूण सहा शहरांमध्ये या स्पर्धेची पात्रता फेरी खेळवण्यात येत असून चौथी पात्रता फेरी पुण्यात होणार आहे. प्रत्येक पात्रता फेरीतुन दोन खेळाडून मुख्य स्पर्धेसाठी प्रवेश करणार असून यानंतर स्पर्धेची मुख्य फेरी दिल्ली शहरात होणार आहे. या स्पर्धेत देशातील एकापेक्षा एक अव्वल आणि सरस खेळाडू सहभागी झाले आहेत. याआधी देहरादुन, अमृतसर आणि भोपाळ या ३ शहरांमध्ये या स्पर्धेची पात्रता फेरी खेळवण्यात आली आहे. पुणे जिल्हा बिलीयर्ड आणि स्नुकर संघटनेच्यावतीने पुण्यातील द क्यु क्लब येथे स्पर्धेची पात्रता फेरी होणार असून स्पर्धेत एकूण १२८ खेळाडू भाग घेणार आहेत.

# धनुर्विद्या स्पर्धेत निरवा पटेलने लक्ष्य गाठून पहिला क्रमांक



**पुणे :** जिल्हा परिषदेच्या वतिने दौंड येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा धनुर्विद्या स्पर्धा अतिशय रोमांचकारी झाली. या स्पर्धेत अंडर-१९ मुलींमधे ध्रुव ग्लोबल स्कूलची निरवा पटेल हिने निशाण्यावर अचूक बाण सोडत २५६ पॉइंट मिळवून प्रथम क्रमांकासह सुवर्णपदकाची मानकरी ठरली. तर त्रिशा सावंत हिला रौप्य पदक वर समाधान मानावे लागले. अंडर-१४ मुलांमध्ये मलंक मिश्रा याने २६५ पॉइंट मिळवून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. तर ध्रुव लांडगे यांला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. येथे झालेल्या स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्याने पालकच नव्हे तर हितचिंतकही खूश आहेत. या खेळाडूंना सुरूवातीपासूनच तिरंदाजीची आवड होती. खेळात त्यांनी आपले कौशल्य दाखवून शाळेला बहुमान मिळवून दिला. या यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यश मालपाणी व प्रिन्सीपल संगीता राऊतजी यांनी कौतुक केले. प्रशिक्षक मयंक गोडसे यांनी मार्गदर्शन केले.

# फुटबॉल : पुणे संघ उपांत्य फेरीत



**पुणे :** चांगल्याच फॉर्मात असलेल्या पुण्याच्या संघाने सातारा संघाचा 9-0 असा धुव्वा उडवत जळगाव येथे सुरू असलेल्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) आंतर जिल्हा फुटबॉल ज्युनियर मुलींच्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत मंगळवारी, आर्या चौधरी (18वा, 21वा), याशिका तेजवानी (28वा, 30वा) आणि केया तेलंग (14वा, 16वा) यांच्या प्रत्येकी दोन तसेच इशानी कुलकर्णी (5वे), शर्वरी माने (26 वा) आणि अर्णा सिंधवच्या (40 वा) प्रत्येकी एका गोलच्या जोरावर पुणे संघाने मोठा विजय साकारला.

# गार्गी एज्युकॉन, मेव्हरिक्स लिजेंडस क्लब विजयी



कुंदन जाचक



संभाजी शिंदे

**पुणे :** कै.ला.सागर डोमसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित कै. सागर डोमसे प्रौढ(40वर्षांवरील) करंडक टी -20क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत गार्गी एज्युकॉन, मेव्हरिक्स लिजेंडस क्लब, रॉयल पासलकर या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सुरुवात केली. फोर स्टार मैदान हिंजवडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सलामीच्या लढतीत कुंदन जाचक(3-20) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर रॉयल पासलकर संघाने स्वयुश स्ट्रायकर्स संघाचा 5 गडी राखून पराभव करत शानदार सुरुवात केली. दुसऱ्या लढतीत संभाजी शिंदे (3-17 व 25धावा) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर मेव्हरिक्स लिजेंडस क्लब संघाने शंतनु शुटर्स संघाचा 6 गडी राखून पराभव केला. पराग सराफ(4-7) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर गार्गी एज्युकॉन संघाने दिक्षित रॉयल्स संघाचा 102धावांनी धुव्वा उडविला.

# 'कोद्रे फार्म्स करंडक' आजपासून आयोजन !!

**पुणे :** २४ स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेचे १० डिसेंबर २०२४ पासून आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १० डिसेंबर २०२४ ते ७ जानेवारी २०२५ या कालावधीत सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर होणार आहे.या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पर्धेचे संचालक आणि २४ स्पोटर्चे संचालक उदय म्हात्रे यांनी सांगितले की, क्रिकेटचे प्रशिक्षण घेणाऱ्या पुण्यातील वेगवेगळ्या क्लब, अ‍ॅकॅडमी यामधील १२ वर्षाखालील मुलांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. लहान वयात मुलांना व्यावसायिक आणि स्पर्धात्मक खेळाचा सराव व्हावा, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात येत आहे. २५-२५ षटकांचे सामने खेळविण्यात येणार असल्याने एक वेगळा अनुभव मुलांना मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्पर्धेसाठी वेलप्लेड अ‍ॅप, ओम इन्फोटेक, क्रिकस्टार रायझिंग स्पोर्ट्स आणि श्री साई गणेश ग्राफीकक्स् यांनी प्रायोजक्तव दिले आहे. साखळी आणि बाद फेरीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत पुणे आणि परिसरातील असे एकूण १६ संघ सहभागी झाले आहेत.

## प्रो कबड्डीत पुणेरी पलटणची दबंग दिल्लीकडूनही हार; दिल्लीचा ३०-२६ विजय

# पुणेरी पलटणचा बाद फेरीचा मार्ग खडतर, आशु मलिकचे एका चढाईत ५ गुण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वेगवान आणि खोलवर चढाई करणाऱ्या आशु मलिकच्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर प्रो कबड्डीच्या ११व्या पर्वात सोमवारी दबंग दिल्लीने घरच्या मैदानावर पुणेरी पलटणचा ३०-२६ असा पराभव केला. या विजयाने दबंग दिल्लीने बाद फेरीच्या आशा भक्कम करताना चौथ्या स्थानावर झेप घेतली. पुणेरी पलटण मात्र आठव्या स्थानावर कायम राहिले. यामुळे गतविजेत्या पुणेरी पलटणला आता उर्वरित प्रत्येक सामना जिंकला तरच या वेळी बाद फेरी गाठता येणार आहे.

सामन्याचे एकूण चित्र दोन्ही संघांच्या सावध पवित्र्यामुळे समान वर्चस्वाचे राहिले होते. पूर्वार्धात बचावपटूंनी आपल्या संघाचे आव्हान राखण्याचा प्रयत्न केला. उत्तरार्धात मात्र पलटणने चढाई आणि बचाव अशा दोन्ही आघाडीवर खेळ उंचावताना दबंग दिल्लीवर दडपण आणण्याचा चांगला प्रयत्न केला. मात्र, उत्तरार्धाच्या तिसऱ्याच मिनिटाला आशु मलिकच्या एका चढाईतील पाच गुणांनी सामन्याचे चित्र बदलले. त्यानंतरही पलटणच्या अबिनेश नंदराजन आणि मोहित गोयत यांनी दोनवेळा अव्वल पकड करताना त्या पाच गुणांचे दडपण झुगारले. मात्र, त्यानंतर आशु आणि महत्वाच्या क्षणी नविन कुमारला रोखण्यात पलटणची बचावफळी चुकली. सामना २१-२१ अशा बरोबरीत असताना नविनच्या एका खोलवर चढाईत पलटणचे दोन्ही कोपरारक्षक स्वयंचित झाले आणि आशुच्या पाच गुणानंतरही आव्हान राखलेल्या पलटणसाठी ही सर्वात मोठी चूक ठरली. ही संधी साधून नंतर आशु आणि नविनने चोख चढाया करुन दोन मिनिट शिल्लक असताना पलटणवर लोण चढवला. या क्षणी पलटणचा पराभव निश्चित झाला. या सामन्यातून पुण्याच्या गौरव खत्री आणि दिल्लीच्या योगेशने हंगामातील बचावातील गुणांचे अर्धशतक पूर्ण केले. आशु मलिकने केलेल्या १९ चढाईपैकी सहा चढाईतच १३ गुणांची कमाई केली. उत्तरार्धात दिल्लीला बाचावातील केवळ दोन गुणांचीच कमाई करता आली. पलटणकडून पंकज मोहिते (५) आणि मोहित गोयत (७) यांनाच चमक दाखवता आली.

उत्तरार्धात देखिल फारसे वेगळे चित्र नव्हते. कुणीच धोका पत्करण्यास तयार नव्हते. पण, उत्तरार्धातील तिसऱ्या मिनिटाला



आशुने आपल्या सफाईदार चढाईने पलटणचा बचाव भेदत पाच गडी बाद केले. पलटण या चढाईने मागे राहतील असे वाटले. मात्र, लोणची शक्यता त्यांच्या बचावपटूंनी फेटाळून लावली. प्रथम अबिनेशने दोन खेळाडूंत आशुची आणि काही वेळाने मोहितने अबिनेशच्या साथीत नविन कुमारची पकड करुन लागोपाठ अव्वल पकडीचे चार गुण मिळवून दिल्लीवर पलटवार केला. त्यामुळे उत्तरार्धाचे पहिले सत्र संपले तेव्हा दिल्लीची आघाडी २०-१८ अशी दोन गुणांची मर्यादित राहिली होती.